नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

दीपावली विशेषांक


२ ० ० १



मूल्य २५/-

अनुक्रमणिका

विनम्र श्रद्धांजली
कै. चंद्रकांत शं. कुलकर्णी



चंद्रकांत कुलकर्णी हे विदर्भ साहित्य संघाचे ज्येष्ठ सदस्य होते. मुळातच ग्रंथाशी असलेलं अतूट नातं केवळ आपल्यापुरतं न जपता त्यांनी ग्रंथांचं आणि आपलंही नातं अगणितांशी जोडलं. विदर्भ साहित्य संघाचं संदर्भ ग्रंथालय समृद्ध करून नागपूरातील प्रसार माध्यमे तसेच मराठी विषयातील स्नातक, स्नातकोत्तर विद्यार्थी व संशोधकांना संदर्भ देऊन मोलाचे मार्गदर्शन दिले. त्यांच्या ह्या निरलस सेवेची आज सर्वांना प्रत्यही आठवण होते. नवे ग्रंथ नवी समीक्षा या उपक्रमातून त्यांनी विद्यार्थ्यांतुन नवे समीक्षक घडविले. ग्रंथ वाचन संस्कृती त्यांनी झोपडपट्टीपर्यंत नेऊन पोहचवली. 'ग्रंथ सहवास' च्या रूपाने त्यांची स्मृती चिरंतन राहील. मराठी भाषेच्या व साहित्याच्या प्रसार-प्रचारातील त्यांचे योगदान मोलाचे आहे.

आचार्य अत्रे यांनी लिहिलेल्या मृत्युलेखांवर आधारित कार्यक्रम सादर करीत असतांनाच दि. १४ ऑक्टोबर २००१ रोजी ग्रंथसानिध्यातच त्यांचे निधन झाले. विदर्भ साहित्य संघाचा एक उत्तम कार्यकर्ता काळाच्या पडद्याआड गेला. विदर्भ साहित्य संघाची त्यांना विनम्र श्रद्धांजली.

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

ऑक्टोंबर / नोव्हेंबर / डिसेंबर २००१ वर्ष ५३ वे

अंक - ५३; ४ ते ६

मूल्य : पंचवीस रुपये

संपादक : डॉ. सुलभा हेर्लेकर

कार्यकारी संपादक : केशव जोशी

संपादक मंडळ डॉ. शोभा बुचे, डॉ. श्यामला मुजुमदार, डॉ. किशोर सानप, प्रा. [illegible], प्रा.अशोक थोरात, प्रा.तीर्थराज कापगते, प्रा.दिलीप अलोणे

प्रकाशक : सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ नागपूर - १२

अक्षर जुळवणी : श्रीअक्षर टाईप सेटर्स, नागपूर

मुखपृष्ठ मांडणी /मुद्रक स्पार्क असोसिएटस्, नागपूर.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
संपादक, 'युगवाणी' विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक , सीताबर्डी, नागपूर -१२
दूरध्वनी : (०७१२) ५२३९२९

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

संपादकीय

'युगवाणी' चा हा दिवाळी अंक प्रकाशित करताना आम्हाला आनंद होत आहे. कारण युगवाणी चे रसिक वाचक युगवाणीची आतुरतेने वाट पहात असतात. दृक् श्राव्य माध्यमाच्या प्रसारामुळे वाचन संस्कृतीचा ऱ्हास होत असताना, वाचकांची अभिरुची वाढावी आणि सुजाण, जागृत वाचकांनी कृतिशील व्हावं, समाज सुधारणेच्या, तसेच वाङ्मयीन संस्कृतीच्या संवर्धनाचे कार्य करावे हाच युगवाणीचा उद्देश आहे.

ह्या अंकात एकूणच कथा, कविता, समीक्षा यांचा विचार प्रामुख्याने आहे. लेखनकलेच्या मुळाशी जाऊन लेखनकला व ऋग्वेद हा वाचकाला विचार प्रवृत्त करणारा प्रा. राम शेवाळकर यांचा लेख महत्त्वाचा म्हणावा लागेल. काळाप्रमाणे कलाकृतीचे आकलन, विचार हेही बदलत जातात. बेडेकरांच्या रणांगण या कादंबरीचा अनुभव आजच्या युवकाला निराळा जाणवू शकतो. या पार्श्वभूमीवर समीक्षक डॉ. भा.ल. भोळे यांनी डॉ. रवींद्र शोभणे यांच्या 'उत्तरायण' या कादंबरीवर मांडलेले विचार, आपल्याला महाभारतातील व्यक्तींचे, विचारांचे, पुनःपुनः प्रश्न निर्माण करणारेच वाटतील ! सिद्धहस्त समीक्षक डॉ. उषाताई देशमुख आणि डॉ. आशा सावदेकर यांच्या लेखनानी अंकाचा दर्जा वाढवला तर सुप्रसिद्ध कथा लेखिका आशा बगे यांच्या कथेनी अंकास एक परिमाण मिळाले.

नवोदित लेखिका शुभदा मुळे, मालती निमदेव यांच्या लेखनाने त्यांच्यातल्या भविष्यातील प्रतिभेच्या खुणा स्पष्ट होतात. डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, प्रफुल्ल शिलेदार, उल्हास मनोहर यांच्या कवितानी रुजलेला हा मंत्र नुसत्या दिवाळीच्या शोभेचा अंक नव्हे हे वाचकांच्या लक्षात येईल. आपल्या जवळ संग्रहित करण्यासाठी या अंकाचे प्रयोजन राहील. वाङ्मयातील सर्व प्रवृत्तींना आपलसे करेल असं हे युगवाणीचं व्यासपीठ आहे. यामुळे पुढील काही अंकात दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रिया, स्त्री वाद यावर युगवाणीचे लिहिलेले साहित्य अपेक्षित आहे.

आजचा माणूस अंकातून त्यांच्या वाङ्मयीन कृतीतून दिसावा हीच युगवाणीची धारणा आहे. पाश्चात्य देशात स्त्रीवादी विचारांच्या दृष्टिकोनातून इतिहास, विज्ञान, समाजविज्ञान, चालीरिती परंपरा, संस्कृती, साहित्य, समीक्षा, शिल्प अशा सर्व विषयांचा अभ्यास चालू आहे. या सर्व विषयांचे 'युगवाणी' स्वागत करते. नवीन जाणीवा, नवीन प्रश्न, साहित्यातून याचे उमटलेले चित्र या सर्वांचाच वेध युगवाणीने घ्यायचा आहे. वाचकांच्या, लेखकांच्या विश्वासावरच युगवाणीचे भविष्य घडवायचे आहे ते आशादायी असेल असा विश्वास वाटतो.

- सुलभा हेर्लेकर

अनुक्रमणिका

लेखनकला आणि ऋग्वेद

● राम शेवाळकर

'ऋग्वेद' हा आदिग्रंथ केवळ मुखपरंपरेमुळेच आजतागायत अविकृतपणे टिकून राहिला, ही वस्तुस्थिती आहे. गेली हजारो वर्षे त्यात कानामात्रेचाहि फरक पडलेला नसून, पाठभेदांचीहि पाळी आलेली नाही. सूक्तकारांनी ऋग्वेदाच्या क्रमपाठ, घनपाठ, जटापाठादि या वेगवेगळ्या पाठपरंपरा रुढ केल्या, त्यामुळे मुख्यतः ऋषीवर्गाने तो प्रथम कंठस्थ केला व नंतर वेगवेगळ्या पाठपद्धतीनुसार त्याचा इतरांमध्ये प्रसार केला. त्यामुळे हे प्राचीनतम ज्ञान अबाधितपणे आजच्या पिढीपर्यंत सुखरूप पोचू शकले आहे. ज्ञानकोशकार डॉ. केतकरांनी आपल्या भारतीय समाजशास्त्रावरील विवेचनात हे श्रेय मुक्तपणे मान्य केले आहे.

पण यातूनच वेदकाली लेखनकला अस्तित्वात आलेली नसावी, असा समज प्रचलित व्हायला मदत झाली. पाश्चात्य अभ्यासकांनी हा समज परिपुष्ट केला. दुर्दैवाने ऋग्वेद संहितेत 'लिख्' या धातुपासून व्युत्पादित असा एकहि शब्द सापडत नसल्याने, जॉर्ज बुल्हर सारख्यांना १८८५ मध्ये त्या समजाचे निष्कर्षामध्ये रूपांतर करण्याचे साहस करता आले. भारतीय पुरातत्वज्ञांचा या निष्कर्षांवर विश्वास बसणे स्वाभाविकच होते. सर्व ऋचांचे आधी सूक्तकारांना दर्शन झाले व मग त्यांनी त्या मुखोद्गत केल्या. म्हणून त्या ऋषींना 'मंत्रद्रष्टे' ही संज्ञा मिळाली. खरे म्हणजे कुणाहि प्रतिभाशाली कवीला कवितेचे जे पहिले स्फुरण होते तें अंतर्दर्शनाच्या स्वरूपाचेच असते. तो विशिष्ट भावानुभव व त्याला लाभलेली लयबद्ध आकृती कवीने अगोदर मनोमन

अनुभवलेलीच असते. ही सूक्ते तोंडीच रचली गेली व कंठाच्याद्वारे त्यांचे संगोपन व मागाहून प्रसारण झाले. ऋग्वेदातील वसिष्ठांनी रचलेल्या मंडुक सूक्तामध्ये याचा पहिला आधार मिळाला. त्यामुळेच डॉ. बुल्हरचा निष्कर्ष सर्वमान्य व्हायला मदत झाली. पं. गौरीशंकर ओझा यांनी १९१८ साली प्रकाशित केलेल्या निबंधात यजुर्वेद व अथर्व संहितेत 'लिख्' धातुपासून उत्पन्न झालेले शब्द उद्धृत केले आहेत. पण ऋग्वेद संहितेचा पाठिंबा त्यांनाहि मिळविता आला नाही.

१९११ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकातील 'अल्फाबेट' या सदरामध्ये बाकी बुल्हरनी केलेली कसरत अविश्वसनीय ठरविण्यात आली आहे. कारण ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळातील बासष्टाव्या सूक्तात, गायीच्या कानावर आठ हा आकडा घातल्याचा उल्लेख आलेला आहे. १८८१ मध्ये बॅबीलोन येथे सापडलेल्या एका इष्टीकेवर वैदिक माहेश्वरी अक्षरवाटिकेने अर्ध-संस्कृत भाषेतील 'अक्खेझराख नु औहर्म्नुभ्यःददतु' असे वाक्य असून ते अ.बा. वालावलकरांना वाचता आल्याचे एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये त्यांनी एका लेखाद्वारे प्रकाशित केले.

तसेच १९४९ च्या मुंबईला झालेल्या प्राच्यविद्यापरिषदेत वालावलकरांनीच शिलालेखावरील अक्षर विकासाचा अभ्यास करून एक निबंध सादर केला. त्यात पाणिनी पूर्वकालीन चौदा माहेश्वरी सूत्रे अर्धेंदुलसित आकृतीच्या गटानुसारच असल्याचा महत्वाचा शोध लावला त्यावर त्यांनी १९५० मध्ये 'अशोक पूर्वकालीन ब्राह्मी' हे पुस्तकहि इंग्रजीमध्ये प्रसिद्ध केले. डॉ. हरिभाऊ वाकणकरांना पॅरीसच्या लूव्हर संग्रहालयातील सापडलेल्या इष्टिकेवर 'मत्र मात' या अक्षरांची मुद्रा सापडली. पश्चिमेकडील मरू नगर उत्खननात सापडल्याचा तो उल्लेख आहे. ख्रिस्त पूर्व ३००० ते २८०० हा त्या इष्टिकेचा काळ मानला जातो. हे वैदिक माहेश्वरी लेखनाचे दुसरे प्रमाण मानावे लागते. तिसरे प्रमाण डॉ. वाकणकरांनाच १९८७ मध्ये मध्यप्रदेशातील शिवपुरी जवळच्या भडकानाला गुहेत सापडले. नागपूरच्या श्री. श्रीपाद चितळे ह्यांनी त्याचे वाचन केले आहे.

ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातील गौतम ऋषीच्या सूक्तात 'अतक्षत्' म्हणजे कोरीव लेखनाचा उल्लेख आहे. "सनाय ते गोतम इंद्र नव्यम्। अतक्षत् ब्रह्म, हरियोजनाय" (हे अश्वारुढ इंद्रा, आम्ही केलेले नवीन स्तोत्र आम्ही गौतम वंशी कवि कोरून काढीत आहोत.) ऋग्वेदाच्या पहिल्या मंडळातील १६४ च्या सूक्तामध्ये सुद्धा सदृश उल्लेख आहे. 'गौरीर्मिमाय सलिलानि तक्षति' (वीज आकाशातील जलमय ढगांवर अक्षरे कोरते.) ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडळातील अडतिसाव्या सूक्तात 'इनोत मा पृच्छ जनिमा कवींना मनोधृत सुकृतः तक्षत् अद्याम्' (कवीला कविता कशा सुचतात, व त्या कशा कोरल्या

जातात, हे विचारू नका.) पाचव्या मंडळातील चौऱ्याहत्तराव्या सूक्तात सुद्धा कोरीव लेखन या अर्थाने 'तक्ष्' धातूचा उल्लेख केला आहे.

पूर्वीच्या काळी लाकडी फलक, शिळा, इष्टिका, सुवर्णपत्रे, ताम्रपत्रे यावर कोरीव लेखन केले जात असे. त्यानंतर भूर्जपत्रे व ताडपत्रे यांच्यावर टोकदार साधनाने लेखन कोरले जाऊ लागले. आपण ग्रंथातील पृष्ठांना 'पाने' म्हणू लागलो, ते बहुधा भूर्जपत्र व ताडपत्रावरूनच आले असावे. त्यामुळे ऋग्वेद काळी लेखनकला अस्तित्वात असल्याचे निभ्रांतपणे मान्य करावे लागते. लेखनामध्ये संभाव्य असलेल्या स्खलनांमुळे ऋषींनी वेद कंठस्थ करण्याची दक्षता घेतली असावी. त्यामुळेच वेदांची आमूलाग्र शुचिता कायम राहू शकली.

अशा पाठपद्धतीमुळेच ऋग्वेदामध्ये पाठभेद व प्रक्षेपासारख्या भेसळीला वावच राहिला नाही. पाश्चात्य विद्वानांनी प्राचीन भारताचा इतिहास, शिलालेख, ताम्रपट किंवा वेदवाङ्मयाच्या आधारे लिहिला असता, तर तो अधिक विश्वसनीय राहिला असता. वेदातील ज्ञान लोकगंगेला समर्पित करण्याच्या उद्देशाने पुराणांची निर्मिती झाली. त्यामुळे त्यात लोकरंजनाला प्राधान्य मिळाले. इतिहास निश्चितीच्या दृष्टिने पुढे पुराणांचेच प्रामाण्य प्रश्नांकित झाल्याने इतिहासाच्या विश्वसनीयतेलाहि मर्यादा पडल्या. ऋग्वेदामध्ये 'ळ' हे अक्षर आले आहे. पहिल्या मंडळाच्या पहिल्या सूक्ताच्या पहिल्या ओळीत 'अग्निळ्हे पुरोहितम्' किंवा दहाव्या मंडळाच्या शेवटच्या १९१ व्या सूक्तातील पहिल्या ऋचेतच संवनन ऋषींनी 'ईळस्वदे' असा शब्द वापरला आहे. 'ळ' हा वर्ण उत्तरेकडील भाषांमध्ये आढळत नाही. प्रत्येक वर्णाची शुचिता शुद्धोच्चाराद्वारे सांभाळण्याचा कटाक्ष विशेषतः दक्षिण भारतात आढळतो. त्यामुळे अशा उल्लेखांवरून ऋग्वेदातील विश्वामित्र, भारद्वाज, काण्व, अत्रि व अंगीरस ही कुळे दाक्षिणात्य ठरतील. ऋग्वेदातील पहिल्या, तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या, सातव्या, आठव्या व दहाव्या अशा एकूण सात मंडळांमध्ये मिळून 'ळ' अक्षरयुक्त असे शब्द निदान पस्तीस ठिकाणी तरी आले आहेत. त्यावरून असे वाटते, की ती सूक्ते रचणारे उपर्युक्त पाच कुळातील एक्केचाळीस मंत्रद्रष्टे तरी दाक्षिणात्य असावेत, डॉ. केतकरांनी यज्ञकर्मासाठी उपयुक्त असा यजुर्वेद याज्ञवल्क्य मुनींनी दक्षिणेकडून उत्तरेकडे नेल्याचे केलेले प्रतिपादन या दृष्टिने चिंतनीय आहे.

- राम शेवाळकर, नागपूर

■■■

अनुक्रमणिका

एक रात्र मधे

● आशा बगे

देवकी घाईघाईनं फ्लॅटफार्मवर आली. उशीर झाला असेल म्हणून धावतच आणि गाडीचे दिवे दुरून दिसलेच. ते वेगानं जवळ यायला लागते. पहाटे साडेतीनच्या गाडीवर कुणाला घ्यायला येणारी ती एकटीच असेल असं वाटत होतं. पण तशी बरीच गर्दी होती. ते गाडीत चढणारेही असू शकतात असं वाटेपर्यंत गाडी प्लॅटफॉर्मला लागलीही. त्या वेगानं जणू आपण मागे सरकलो आहोत असे तिला वाटले. डबे समोरून सरकत जाताना एका डब्याच्या दाराशी तिला विद्याधर दिसलाच. उंचापुरा-प्रथम दिसली ती उंचीच मग तो दिसला. ती एकदम धावली. त्यानेही हात हलवला. गाडी थांबली. तो उतरला. ती घाईनं समोर गेली. त्याच्या हातातली सुटकेस घेण्याचा प्रयत्न करत म्हणाली.

"बस इतकंच सामान ?"

"एका दिवसाला किती हवं !"

दोघं चालायला लागली. पण गर्दीत अडकली.

"पहाटेच्या वेळी पहा नं कसली गर्दी !" ती म्हणाली.

"आपणही त्या गर्दीचा एक भाग आहोत म्हटलं !" तो हसून म्हणाला आणि वेगाने लांब लांब टांगा टाकत गर्दीतून घुसायला लागला.

"थांब नं, विद्या मी मागेच राहिले." ती म्हणाली. पण तो गर्दीच्या दुसऱ्या टोकाला पोचला होता. त्याला गाठून ती म्हणाली, "हे काय ? मी तुला घ्यायला आले आहे. हे तर लक्षात घेशील !"

"सॉरी" तो म्हणाला. "अगदीच तूच कशी आलीस पण ?

मला वाटलं संस्थेचे कुणी नाहीतर तुझा ड्रायव्हरच येईल."

"म्हणजे माझी अपेक्षा नव्हती तुला ?" तिनं विचारलं.

"खरं म्हणजे तुझीच होती. तू नसती आलीस तर थोडा खट्टूही झालो असतोच."

"थँक्स" ती म्हणाली.

बाहेर गाडी पार्क केली होती. तिथवर जाताना मग देवकीच्या लक्षात आलं की विलक्षण थंडी आहे. विलक्षण, त्या थंडीत जणू बर्फाचे कणच आहेत आणि सोबतीला वरून चंद्रही. त्याचा पिठूर प्रकाश तिच्या कारवर आजूबाजूला. विद्याधर आणि तिच्यावरही सांडला आहे आणि हे सगळं म्हणजे ही थंडी, चंद्र, मुद्दाम काही नवीन हेतू मनात धरून बरसत आहे. आपण एकतर थंडीचा किंवा चंद्रप्रकाशाचा अविभाज्य भाग तरी आहोत किंवा ते मग आपल्याकरताच मुद्दाम ठरवून पडते आहे. थंडीने तिने दोन्ही हात छातीशी गुंडी करून घेतले. त्याने अंगावरची शाल मागे घरंगळली. विद्याधरने थबकून ती तिच्या अंगावर लपेटून दिली.

"शाल का काढलीस ? थंडी नाही वाजत ?" त्याचं लक्ष गेलं. ती जराशी कापत होती.

"देवकी ऽ" म्हणत त्याने अंगातला कोट काढला तिच्या अंगावर टाकला.

"अरे तुला ..."

"आत स्वेटर आहे माझ्या." तो म्हणाला. ती गाडीत शिरली.

"ठीक आहेस आता ?" त्याने विचारले.

"मघाही ठीकच होते." तिनं गाडी सुरू केली.

"थंडीची कशाला आलीस ?"

"झोपलेच तर नाही मी. पुन्हा नसते आले तर त्या लोकांनी तुला घेरलं असतं. मला कुठे सापडला असतास तू."

"पण मी येणार तर तुझ्याकडेच होतो नं. हे व्याख्यानाचं आमंत्रणही त्याकरता घेतलं. आजकाल मी सहसा कुठे जात नाही. पण हे निमंत्रण तुझ्या शहराचं होतं. म्हटलं जाऊन यावं शेवटलं एकदा."

"का शेवटलं का ?" ती म्हणाली तसा तो किंचित चपापला. हसला.

"लांब किती ! पुन्हा आजकाल फारशी व्याख्यानं स्वीकारीत नाही. मग एखाद्याच विषयाची अशी तयारी करणं आजकाल सोपं वाटत नाही. आपलं चिंतन असतंच मूलभूत. पण त्याला अभ्यासानं उजाळा द्यायचा असतो. तो अभ्यासच आजकाल होत नाही."

"पूर्व पुण्याईच्या बळावर..."

"मला अशी वेळ मारून न्यायला आवडत नाही. तुला माहीत आहे..."

"हो" ती पुटपुटली. "आज कोणता विषय"

"महाभारताची नायिका."

"किती दिवस तुम्ही हे विषय पुरवणार ?"

"मुळातील झरे संपे आटेपर्यंत. महाभारत हा अक्षय झरा आहे. पुन्हा त्यातल्या स्त्रिया या एक कोडंच आहेत. अनेक वर्ष झाली गुंता सुटत नाही. मग तशी स्त्री हीच व्याख्यानाचा विषय वाटते..."

"प्रातिनिधिक की वैयक्तिक ?" तिने मान वळवून हसून विचारले.

"दोन्ही ! म्हणशील तर तूही" तो हसत म्हणाला.

"मी ! हं माझ्याबद्दल काय आहे ? काय सापडेल. कुठली वेगळी पार्श्वभूमी नाही. कसली फ्रेमच नाही."

"का ? कुठल्याही फ्रेमचा विषय नसणं ही सोपी गोष्ट आहे." तो हसत म्हणाला.

"मग कधी देतोस माझ्यावर व्याख्यान ?"

"तू मला बोलव. चांगलं सन्मानानं वेगळं. हे काय वाहत्या गंगेत..." तो हसला. पहिले विचारायचा राहिला तो प्रश्न आता विचारतो, "कशी आहेस ?"

"तुला कशी वाटते ?" तो बोलला नाही. "तू मात्र जरा उतरला आहेस. पूर्वी उंचीच्या बरोबरीनं तू भरलेलाही होतास. आता नुसता उंच." तिला आठवलं मघा गाडीच्या दारात दिसली ती त्याची फक्त उंची... त्याचे रुंद भरदार खांदे ओघळलेत... मग काही विचारायच्या बोलायच्या आत घरच आलं. तिने सफाईने गाडी आत घेतली. तिची सफाई त्याच्या लक्षात आली. मोठा बंगला फॉरेस्ट ऑफिसरचा. सुधीर सिनियर पोस्टवर होता. बंगला सामसूम. मोठे विस्तीर्ण आवार. घरापर्यंत रेखल्यासारखा नेलेला रस्ता, खूप झाडं. देवकीला पूर्वीपासून झाडांचा शौक आहेच. गाडीतून उतरल्यावर तो म्हणाला.

"किती सुंदर प्रकाश पसरला आहे ग चंद्राचा."

"आता दिसला तुला ?" अशासारखं देवकी हसली.

"चहा नं ! आलं घालून."

"चहाच. पण आलं नको आणि एकदम गरम पीत नाही मी. दूध थंडच."

"विद्या, अरे." ती पहातच राहिली.

"तुला किती गरम चहा लागतो ते.."

"वयानुसार.." तो हसत म्हणाला.

"असं कोणतं वय झालं तुझं म्हणून."

"चौपन्नावं सुरू आहे म्हटलं.."

तिनं चहा आणला. "झोपायचं आहे ?" तिनं विचारलं. "झोप नाही येणार. पण थकलो जरा. माझी खोली दाखव. पडल्याने बरं वाटेल." तो म्हणाला.

ती थोडी खट्टू झाली. हे त्याच्या लक्षात आलं तेव्हा सावरून म्हणाला, "अग गाडीत सुरुवातीला झोपच नाही. मग जरा लागली तर झोप लागून तर नाही जाणार या टेन्शननी आलीच नाही. कसल्या अपरात्री गाडी येते."

"आपणही रात्रभर जागेच तर आहोत ! पाठसुद्धा टेकली नाही." तिला वाटलं.

"पाणी आणून ठेवते." तिनं पाणी आणल्यावर त्यानं दोन तीन गोळ्या पाण्यात घेतल्या पावडर करून.

"गोळ्या कसल्या घेतोस ?" तिनं विचारलं आश्चर्याने.

"अशाच. वय..."

"वयाचं काय सांगतोस विद्या तू.." अशासारखं तिनं त्याच्याकडे पाहिलं.

"आणि गोळ्या गिटकता नाही येत तुला ?"

"माझ्या आईची हीच तक्रार होती लहाणपणापासून.." तो म्हणाला. आणि थकून तिच्यासमोरच पलंगावर आडवा झाला. दिव्याचा उजेड डोळ्यावर येत होता तर डोक्यावर हात ठेवून. तिने दिवा मालवला. पांघरूण पायथ्याला होते. ते अंगावर दिले. तो जागाच होता तरी त्याने ते करू दिले. ती हलकेच खोलीबाहेर आली. तिला झोपायचे नव्हते. झोप जराही डोळ्यात नव्हती. तिने झाडांकडे पाहिलं. झाडं थंडीनं आकडली होती का ? असली तरी चंद्रापासून ऊब घेत असतील. माणूस निसर्गाच्याकडून काही घेत नसेल पण निसर्गात मात्र एक दुवा असेल परस्परात. पूर्वी सुधीरबरोबर किती भटकली, हिंडली. आलापल्लीचे ते दाट जंगल पाहिले. झाडं बोलायची तेव्हा आपल्याशी एक मूक संवाद होता. आपल्यात आणि त्यांच्यात आता त्यांची भाषा कळेनाशी झाली. ते वेगळं सांगू पाहतात. आपण वेगळं समजतो. मघापासून विद्याधरनं वय वय लावलं. ते वयच का कारण असेल. व्हरांड्यात थंडी होती. पण आत जावेसे वाटतच नव्हते. मघा विद्याधरने त्याचा अंगावर टाकलेला कोट. तिला आठवण आली. तिनं कोचावरच टाकून दिलेला तो कोट पुन्हा अंगावर घातला. व्हरांड्यातूनच मग थंडीला आणि बाहेरच्या चंद्रप्रकाशाला ती अनुभवत राहिली. हळूहळू चंद्रप्रकाश विरत गेला. त्याचा दुधी रंग विरळ झाला. तो आता जाणीवपूर्वक काही ठेवूनच तिच्याकरता तिच्याच अंगणात पडतो आहे. असे यावेळी वाटले नाही. आत खोलवर कळ उठली. काय मोठेसे मागतो माणूस ? किती थोडे हवे असते ! किती लहानशा गोष्टीवर स्वतःची मुद्रा शोधायची असते. तिला एकदम भरून आले. निसर्ग तटस्थ अलिप्त आहे. तो नाही कुणाला काही मागत. कुणाकडून

कशाची अपेक्षा करत. एखाद्या सनातन सुंदर स्वयंभू शिल्पासारखा तो फक्त असतो. त्याचे घडणे कळत नाही. त्याचे असणे तेवढे समजते. आपण त्याचे घडणे पाहिलेच नाही. म्हणून त्यापासून आपण दूर आहोत आणि त्याच्या असल्याची कुठलीही अवस्था आपल्याच एक अंश असे होत नाही. देवकीला एकदम अस्वस्थ वाटले. वाटले हे सगळे विद्याला सांगता आले पाहिजे. तो आज महाभारतावर बोलणार आहे. त्यातल्या नायिकेवर. द्रौपदीवर त्यात तो काही नवे सांगेल का ? काय असेल त्याच्याजवळ नवे ? ताजे. प्रत्येक क्षणी वेगळं भासणाऱ्या थंडीसारखे या चंद्रप्रकाशासारखे..... तो दुधी प्रकाश सरला. पहाटच सरली. रस्त्यावरचे दिवे विझले. अद्याप आवारातले होते. आता प्रकाशाला चाहूल आली. पक्ष्याची किलबिल, झाडाची सळसळ, रस्त्यावरील वाहनाचे आवाज, क्वचित हायवे वरून जाणारा ट्रक.. आता त्या प्रकाशाला त्याचे स्वतःचे रूप नव्हते का ? बघता बघताच तिचा डोळा लागला.

.... जाग आली तेव्हा सुधीर तिला उठवत होता. समोर व्हरांड्याच्या जाळीतून ऊन तिच्या अंगावरच आले होते. तिच्या अंगावरच्या कोटाकडे त्याने विचित्र नजरेने पाहिले. ती गडबडीने उठली. विद्याधरचा कोट अंगातून काढला. गोंधळून ती सुधीरला काही म्हणणार होतीच. पण तिला वाटलं या गोष्टीला काही स्पष्टीकरण नाही. वेलीला फूल लागावे तितकी ही गोष्ट सहज आहे.

"तुझे गेस्ट आलेत ?" रुधीरने विचारले.

"हो. विद्याधर आला."

"गाडी राईट टाईम होती ना."

"हो."

"ड्रायव्हर थांबला होता नं."

"नाही."

"नाही ? असं कसं."

"मीच नको म्हटलं."

सुधीरने आश्चर्याने तिच्याकडे पाहिलं. तिनं चहाचा ट्रे आणला. तेव्हा म्हणाला, "पाहुण्यांना उठवत नाही का ?"

"झोपू दे. थकला होता. दिवसभर आहेच पुन्हा." ती म्हणाली. मग तो म्हणाला माहीत असलेलंच. बोलून झालेलंच.

"मीनू येतेय पुढच्या वीक मधे."

"हो." ती म्हणाली.

"पण काय ते आठव्या महिन्यात प्रवास नसतो नं करायचा गं ?"

"नववा लागतो तो पर्यंत." ती म्हणाली.

"निखिल येतोय सोबत ?"

"हो." ती म्हणाली. मीनू सुधीरची अत्यंत लाडकी, हुशार इंजिनियर. जावईही तसाच. मीनूला इथे सोडून तो मग बंगलोरचा नवा जॉब घेतोय. मल्टीनॅशनल कंपनी आहे. मीनू देवकीचीही लाडकीच आहे. एकच मुलगी पण सुधीर मीनूच भरून मिरवतो. एकट्यात, चार चौघांसमोरही हे तिला आवडत नाही. ज्यावेळी देवकी कधी त्याच्यापासून या संसाराच्या अविरत चक्रापासून थोडी मनानंच का होईना पण दूर जाऊ पाहते. त्यावेळी सुधीर नेहमीच मीनूचा खुंटा पुन्हा पुन्हा बळकट करून घेतो. आताही तो तेच करतोय. आपले, आपल्या मुलीचे यश हे असे वारंवार तोंडी लावण्यासारखे असते. हेच देवकीला मानवत नाही....

नऊ वाजता सुधीर नेहमीसारखा निघाला.

"जेवायला येऊ शकशील का दुपारी ? हेच जेवण विद्याधरचे घरी आहे. रात्री तर.."

"बघतो. प्रयत्न करतो पण व्याख्यानाला नक्की येतो." तो म्हणाला.

"थांबू का तुझ्याकरता ?"

"नाही. मी डायरेक्टच येतो.."

म्हणून सुधीर घाईघाईनं गेलाही. ती एकटी उरली. नेहमी सुधीर गेल्यावर उरते तशी. पण आज तिला एकटे वाटले नाही. विद्या आला होता. किती दिवसांनी ही भेट ! खूप बोलता येईल. नेहमी मुकेच असतो आपण या घरात. नवरा ऑफिसला निघून गेल्यावर दिवसभर सामान्य गृहिणीसारखे मागे राहतो आपण. मनातले शब्द वापरताच येत नाहीत. पूर्वी निदान चित्र काढत होतो. कथा कादंबरीचे अनुवाद करत होतो. बंगालीतनं. आता तेही सोडले. हा झाडांचा शौक तेवढा आता लावून घेतला नवा. इथे बदली झाल्यावर तेच पुरते... माळी आला कामावरचा. स्टाफ आला तेव्हा तिने आंघोळ करून घेतली. ड्रेस न घालता साडी नेसली. फिक्कट निळी. मोठ्या बॉर्डरची. अशी साडी विद्याला आवडत होती. आता ती मनातही नसेल त्याच्या. तिला वाटले. दहा वाजल्यावर मात्र तिचा धीर निघेना. किती वेळ झोपून राहणार हा ! मग संस्थेचे लोक येतील. त्याला घेरतील. आपल्याकरता तो उरणारच नाही. ती काहीशा उत्सुकतेनंच आता त्याच्या खोलीत आली. तो अद्याप गाढ निजला होता. त्याच्या पलंगाशी जाऊन उभी राहिली. त्याचा तोच निरागस चेहरा, चेहऱ्यावर उन्हाची तिरीप आली. तिने जरा ओणवं होऊन पडदा सरकवला. तो झोपेतही थकलेलाच वाटला. माहीत नाही ती थकावट किती दिवसाची साचलेली असेल.. पण चेहरा त्या थकव्यातही रिक्त नव्हता. उठून बसल्यावर

काही तरी करण्यासारखे असणारच. असा चेहरा यांच्या जगण्याचा हेतू, प्रयोजन निश्चित आहे. मुलगा गेला. सोळा-सतरा वर्षांचा मुलगा गेला अपघातात. डोंगराएवढे दुःख. पण याचा कणा मोडला नाही. हा प्रत्येक क्षण जगत आला जसा याचा एक क्षण दुसऱ्याशी जोडलेला. या सगळ्या अनंत क्षणांची मग मालिका. यात ती कुठे आहे तरी का ? असणार तरी आहे का ? मग लक्षात ठेवून त्याच्याकरता ही साडी नेसली ती तरी का ? ती हलकेच तिथून जायला लागली तो त्याने आवाज दिला, "देवकी" ती वळली.

"उठलास का ?"

"आताच उठलो. तू पडदा सरकवताना जाग आली."

"सॉरी."

"अग उठवायलाच हवं होतं." तो उठूनच बसला.

"नाहीतर काय ! किती वेळ झाला. तू माझ्याकडे काय झोपायला आलास ?"

"बापरे दहा ?" तो म्हणाला मग आठवून म्हणाला, "सुधीर.."

"तो मघाच गेला."

"अरे, त्यांची भेट राहिली. मी झोपेची गोळी घेतली होती. झोप लागत गेली."

"का, गोळी का ?"

"घेतो आजकाल मधून मधून."

त्याचा चहा करताना तोही स्वयंपाकघरात स्टूल ओढून बसला.

"झोपेच्या गोळ्यांची सवय नको लावू. आणि विद्या एखाद्या चांगल्या डॉक्टरला दाखवून दे."

"कशासाठी ?"

"मी म्हणते म्हणून." ती म्हणाली.

"घर किती चकाचक ठेवलं आहेस."

"आम्हाला या गोष्टी सुचतच नाहीत. तुझ्यात एक वेगळी दृष्टीच आहे देवकी."

"फक्त तीच दृष्टी आहे. बाकी काय ?"

"असं का म्हणतेस ?"

"अरे कधी कधी याचाच कंटाळा येतो. एक पडद्याचा सेट मळला की तो धुवायला काढून दुसरा लावावा तसं आयुष्यभर पुरणारं काही जवळ हवं होतं असं मनात येतं. मग हे चकचकीत घर वगैरे माझं मलाच नको वाटतं."

"तू पूर्वी अनुवाद करत होतीस नं ? बंगाली साहित्याचे."

"मी ते बंद केले. वडील कलकत्त्याला होते दहा वर्ष. म्हणून बंगाली शिकले. ती भाषा आली. पण अनुवाद करण्यासाठी फक्त तेवढे पुरे नाही विद्या. तो लेखक, त्याचे

मर्म, त्याचा तळ, खोली सारे माहिती हवे म्हणून थांबले मी.''

''ते सगळं माहीत करून का घेतलं नाहीस.''

''तो पिंड कुठे माझा ? तू चित्र काढत होतीस.''

''तेही थांबवलं मी. माझ्या चित्रात सारख्या-सारख्या भिंती यायला लागल्या. चौकटी यायला लागल्या. रंग भडक व्हायला लागले. थांबलेच मग मी.''

''तुझ्यामधे एक क्रिटिक दडलेला आहे. तो स्वतःवरच प्रथम शस्त्र धरतो.''

''मोठे मोठे शब्द वापरू नको हं विद्या. मला काही जमलं नाही म्हणून मी थांबले. माझं सामान्यपण मला कळलं इतकंच.''

''अगं सामान्य असणं वाईट थोडं आहे. तू मी आपण सगळेच तर तसे आहोत.''

''तू नाहीस हं.''

''का ? मी कोणता मोठा तीर मारला ?''

''स्वतःला जगायला कारण तर पुरवलंस.''

''देवकी !'' विद्याधर उठून तिच्याजवळ येत म्हणाला. तिच्या खांद्यावर हात ठेवला. तिला आपल्याकडे वळवत होताच तर देवकी दूर झाली. तिनं कांदा चिरायला सुरवात केली.

''तू माझ्याकरता काही करत असशील तर नको करू. मला खूप रिस्ट्रीक्शन आहेत. पोळीचा कुस्करा दुधाशी नाहीतर साध्या वरणाशी. पातळ खिचडी, भात असंच मला चालतं.'' कांदा चिरता चिरता तिने बाजूला केला.

''का?''

''घसा खराब आहे.'' तो दूर ढगांच्या किनारी पाहत म्हणाला.

''काय हे विद्या किती दिवसांनी आलास आणि..''

''पण मला खाऊ पिऊ घालण्याचे प्लॅन तू कधी करूच नकोस. आपण बोलूच. खूप बोलायचं ठरवून आलो. हे व्याख्यानाचं निमंत्रणही त्या करिताच घेतलं.'

''खाणं पिणं काय रे. ते माधवीही करत असेलच. तुझ्या निमित्तानं झालं असतं इतकंच. कुणी आलं की उत्साह वाटतो.''

''का सुधीरला चालत नाही का ?''

''तसं नाही. करते कधी तरी. माधवी कशी आहे.''

''बरीच सुधरली. सुरवातीला शॉक, ओसरल्यावर. वेळ लागला. पण...'' मग जरा वेळाने तो म्हणाला, ''मी कॉलेजचा जॉब सोडला म्हणजे मला सोडावा लागला माधवीकरता.'' तिने आश्चर्याने त्याच्याकडे पाहिले. इतके वर्षाची सर्व्हिस..

''तिची आई वगैरे येऊन नाही राहिली का ?''

"सुरवातीला केलं ते सगळं. शेवटी आपले क्लेश फक्त आपलेच असतात नं !"

"मग सध्या"

"मी एक संस्था काढली स्त्रियांकरता. स्त्रियांनी स्वतःच्या पायावर उभं करता यावं हा उद्देश. जिला जे येतं त्याचा उपयोग करून घेतला. मुख्य म्हणजे माधवीलाच त्यात गुंतवलं. पंधरा वीस स्त्रिया संस्थेत आहेत. पुष्कळ प्लॅनस समोर आहेत. सगळेच पूर्ण होणारही नाहीत."

"माधवी बघते सगळं ? म्हणजे बघू शकते ?"

"नाही गं ! मी तिला टप्पा टप्प्यानी त्यात ओढतो. सकाळ पुरतं हे काम. दुपारी ते. रात्री ते. तेवढं ती करते. दुसऱ्या दिवसाचा विचार केला की तिला टेन्शन येतं. कधी कधी फक्त सकाळपुरताच विचार कर म्हणून मी सांगतो. आमच्या दोघांमध्ये फक्त एक दिवस असतो. उद्या नसतोच.."

तिने त्याच्याकडे पाहिलं. तो तिला यावेळी पूर्णपणे अगम्य वाटला. जवळचा पण अनोळखी, प्रत्येक प्रहराचा खळगा भरत जाणारा. हे सर्वस्वी आपल्या बाहेरचे आहे असेच तिला वाटले. याला हे का करावंसं वाटलं. कसं सुचलं असेल ?

मग तिचे विचार जणू समजून घेऊनच तो म्हणाला, "मला देवकी, स्त्री हीच मुळात खूप ताकदीची वाटते. तिची प्रचंड खोल समज. सतत ओझं वहात नेणारं मन. हे एखाद्या न नांगरलेल्या भूमीसारखंच राहिलं. त्यात डोकावून पहाताच आलं नाही कुणाला."

"या सगळ्या स्त्रियांत तू माझाही अन्तर्भाव केलास"

"हो.' तो तिच्याकडे पहात हसत म्हणाला.

"माझ्यासारख्या लोणच्याच्या फोडीसारख्या घरात संसारात मुरलेल्या सामान्य."

"देवकी मला मुळात स्त्री ही सामान्य वाटतच नाही आणि तुझा तसा आग्रहच असेल तर तीच माझा विषय आहे असं समज."

देवकीच्या डोळ्यात एकदम पाणी यायला लागलं. ते थोपवून ती म्हणाली, "तू आंघोळीला जा. तुझे लोक येतील मग."

"येऊ दे. मला उशीरा आंघोळ आवडते."

"तिथेही तसंच करतोस. माधवी ओरडत नाही."

"नाही गं आता आमची नाती बदलली आहेत." तो हसून म्हणाला. तिला एकदम काय बोलावं ते सुचत नाही. मग ती म्हणाली, "मी नेहमी तुझ्या घराची कल्पना करते. खूप पुस्तकं, खूप ग्रंथ, त्यांचा अस्ताव्यस्त पसारा पूर्वीसारखा पुस्तकांचा गठ्ठा बाजूला करून तिथेच कसातरी कोंबलेला तू. घरात खिडक्या दारांना पडदे नाहीतच.

कुठल्याही कोपऱ्यातून आभाळाचा निळा रंग दिसू शकेल असं. खरं तर मला हेवा वाटतो या साऱ्यांचा. पूर्वी मी तुमच्या घरी आले की, तुझी आई तक्रार करायची. बघ ग ! कसा पुस्तकांत घुसला आहे. सकाळपासून खाणं नाही, अंगाला पाणी नाही. तूच बघ जरा बाहेर काढ. सगळे कसे संपले नाही ?"

"संपले कुठे देवकी ! त्याची जागा नव्या गोष्टींनी घेतली. संपते कुठे काही. फक्त बदलते."

"तरी पण विद्या बदल फार मोठा असला तर संपतेच म्हणायचे."

"नाही." तो तिच्याकडे पाहत म्हणाला. बाहेर गाडीचा आवाज आला. तसं तिने त्याला बळेच न्हाणीघरात ढकलले. तो आंघोळ करून बाहेर आला आणि मग तिला सापडलाच नाही. लोक येत राहिले. चहा होत राहिला. बिस्किटं फरसाण, काजू, बर्फी प्लेटस् भरल्या. रिकाम्या झाल्या. तिचे नेहमीचे सुनसान घर गजबजले. चर्चा रंगल्या, वाद झडले. तो बोलत होता. लोक ऐकत होते. लोक बोलत होते तो ऐकत होता. जेवायची वेळ टळून गेली. दीड वाजला. त्याने काही खाल्ले नव्हते. लोक गेले.

जेवायला बसतांना ती म्हणाली, "तू चांगला बोलतोस हे मला माहीत आहे. पण तू इतका लोकप्रिय असशीलस वाटलं नव्हतं." तो हसला. जेवणानंतर तो झोपायची तयारी करू लागला.

"झोपणार आहेस ?' तिने नाराजीने विचारले.

"थोडं गोळ्यांनी झोपावसं वाटतं."

"कसल्या सारख्या गोळ्या घेतोस."

"उठव मला. मी जास्त झोपलो तर." त्याने सांगितले.

तिने त्याला पावणे पाचला उठवले. बाहेर हॉलमधे त्याच्याकरता लोक खोळंबून होतेच. तो पलंगावर उठून बसला तिच्याकडे पहात हळूच म्हणाला, "देवकी"

"हं" ती हुंकारली.

"कालपासून एक वेगळा फील येतोय." तो मध्येच बोलायचा थांबला.. तिच्याकडे पहात म्हणाला.

"तू इतकी आसपास आहेस ! रात्री झोपण्यापूर्वी माझ्या अंगावर पांघरुण घालताना, झोप उघडल्यावर आपण सारखे बोलतो आहोत. वाटतं की मधे काही घडलेलंच नाही. पूर्वी जसे आपण जवळ होतो तसेच आताही.."

तिला काही सुचलं नाही.

"खरं म्हणजे देवकी अमेय गेल्यापासून स्त्रीचा हा असा इतका निकट वावर.."

देवकीनं खाली मान घातली. तिचा श्वास फुलला. तो उरात मावत नाहीसे वाटले.

ती हळूच म्हणाली.

"बाहेर लोक आले आहेत. तयार होऊनच ये बाहेर. सहाला व्याख्यान" आणि ती गेलीही.

एवढे ओपन थियेटर तुडुंब भरले होते. थंडी विलक्षण होती तरी जाणवत नव्हती. इतकी माणसं दाटी वाटीनं बसली होती. ती बघत होती. ऐकत होती. त्याचा करून दिलेला परिचय, त्याच्या डिग्र्या त्याचा व्यासंग, त्याचे अवार्डस. हा एवढा मोठा माणूस याच्याकरता तरी सारे सोपे का राहिले नाही ? मुलगा, माधवी.. सारे खळगे भरत जगतात. त्याच्या तरी वाट्याला ते नको. विद्याधर बोलायला उठला. साधा असा पैजामा. अंगात गरम जाकीट. टेबलावर शाल, श्रीफळ, गुच्छ, अंगावर नेहमीची राखाडी रंगाची शाल. हळूहळू त्याच्या स्वराने साऱ्या अवकाशाचा ताबा घेतला. मग शब्द आले आणि मग साराच एक मोठा शोध होऊन गेला. वेगवेगळे काही उरले नाही. उभी केलेली द्रौपदी ही वेगळीच भासली. ती असामान्यच होती. पण तिच्याशी स्त्रीचे फार जवळचे नाते होते. तिच्यासारख्या सामान्य बाईचेही. तो मघा म्हणाला होता.

"देवकी मला मुळात स्त्री ही सामान्य वाटतच नाही. पण तुझा तसा आग्रहच असेल तर तीच स्त्री माझा विषय आहे."

देवकीच्या अंगातून एक अननुभूत लहर उमटली. नखशिखान्त तो खळगे भरत होता ! नाही, तो जणू कलश भरत होतो. मनाचे तळ भरावेत तसे. ती आवेगाने थरथरू लागली. पावणे दोन तास चाललेला तो अस्खलित ओघ थांबला. प्रथम टाळ्या वाजवणेच कुणाला सुचले नाही. मग एक अस्पष्ट टाळी वाजली जशी पावसाची धार. बारीक. मग टाळ्या वाजतच राहिल्या. तिचे लक्ष गेले. गर्दीच्या टोकाला सुधीर उभा होता. तो व्याख्यानाला आला याचाच तिला फार आनंद झाला. तिने तिचा हात हलवला. मग ती विद्याधरकडे जाऊ लागली. पण तिला त्याच्यापर्यंत पोचता येईना. त्याच्याकरता निरोप ठेवून ती सुधीर बरोबर घरीच गेली.

"फार चांगलं बोलला तुझा मित्र." सुधीर म्हणाला.

"हो." तीही म्हणाली.

"तू जेवायला का थांबली नाहीस. त्यानं थांबवलं नाही ?" सुधीरनं विचारलं. तिलाही मग वाटलं खरंच विद्यानं औपचारिक तरी म्हणायला हवं होतं की थांब तूही. सुधीरलाही आग्रह करायला हवा होता. एवढया आपल्या घरी उतरला.

"सुचलं नसेल." ती पुटपुटली.

"ही सगळी मोठी माणसं आपल्यापुरतं पहातात." सुधीर म्हणाला. ते मात्र तिला पटलं नाही. तो तिच्याकरता कुठे मोठा होता. पण ती काही बोलली नाही.

रात्री अकराला विद्याधरला लोकांनी आणून सोडले. थोडावेळ ते लोक थांबले अजून बोलणं सरलं नसल्यासारखे एकात एक मिसळलेले विषय निघाले. मग सगळ्यांनी निरोप घेतला. परतीची गाडी पुन्हा उत्तर रात्रीची तीन चाळीसची होती. लोकांनी स्टेशनवर पोहचवून देण्याबद्दल म्हटले पण तो अगदी अकृत्रिमपणे म्हणाला, "तशी गरज नाही. देवकी आहे नं !"

"कॉफी करू ?" सर्व गेल्यावर देवकीने विचारले.

तो नको म्हणाला तेव्हा ती आग्रहाने म्हणाली, "घे नं. थंडी आहे. सुधीरही घेईल."

"तुम्ही लोक गरम घेऊ शकाल. मला ते चालणार नाही. तुम्ही घ्या कॉफी. पण खरं म्हणजे देवकी मला थोडं खायचंच आहे. तिथे काही जमलं नाही. खाण्याचं नाटक केलं बस. सकाळची पोळी असली तर दुधाशी कुस्करून..." विद्याधर म्हणाला.

तेव्हा मघा सुधीरबरोबर आपणही त्याच्याबद्दल वेगळं वाटून घेतलं. याची तिला क्षणमात्र खंतच वाटली. तो तिच्याशी कुठेही औपचारिक नव्हता. खरं म्हणजे तो तिचा पाहुणासुद्धा तर नव्हता. तो तिचा जुन्या ऋणानुबंधाचा जणू सनेही होता. थकलेला, भागलेला, खूप दिवसांनी काही निमित्ताने जसा काही थोड्या विश्रांतीला आलेला आणि वेळ संपल्याबरोबर परत जाणारा. तिला दाटून आल्यासारखेच झाले.

बारा साडेबारापर्यंत सुधीरही गप्पा करत बसला होता. त्या गप्पांत विद्याधरचे व्याख्यान होते. तसा सुधीर स्वतःही होता. त्याचे व्यावसायिक करीयर होते. त्याची मुलगी, जावई होते. ती अस्वस्थ झाली. सजल्या, धजलेल्या घराचे रंगसंगती साधलेले पडदे त्यांनी बाहेरचे आभाळ झाकून टाकावे तसे ते सुधीरचे बोलणे. त्याने पडदाच सरकवला. बाहेर छान चंद्रप्रकाश आहे. ती म्हणाली. कोणी काही बोलले नाही. सुधीर उठला. जांभई देत त्याने निरोपच घेतला विद्याधरचा. पण उठव म्हणाला. ड्रायव्हरला थांबवले आहे हे सांगितले.

व्हरांड्यात थंडी जाणवत होती. ती शटर्स बंद करायला गेली तेव्हा विद्याधर म्हणाला, "असू दे. जाळी हवं तर पाड." आणि व्हरांड्याच्या पहिल्या पायरीवर बसला. खालीच.

"थंडी वाजेल विद्या." ती म्हणाली.

"नाही वाजणार." तो शाल पांघरत म्हणाला. तीही त्याच्या बाजूला बसली. खालच्या पायरीवर. रातराणीचा मंद वास जाणवला. चेटूक केल्यासारखा चंद्राचा प्रकाश सर्वदूर शिंपडलेला... पायरीवर ठेवलेल्या कुंड्यांची पाने ही त्या प्रकाशाच्या पट्ट्यात होती. आतला दिव्याचा उजेड मात्र निरर्थकच वाटत होता. ती तो दिवा मालवून पुन्हा

पायरीवर बसली खाली.

"काल हा सगळा प्रकाश माझ्याकरताच पडला आहे, माझ्यावर, माझ्या माणसांवर वस्तूंवर असे वाटत होते. सकाळी मात्र एकदम वेगळेच झाले. आता आपले जगण्यातले सगळे हेतूच हरवले आहेतसे वाटते. आता मात्र वाटते की तू आणि मी या प्रकाशाचाच भाग राहिलो आहोत. नाही ?" तो हसला.

"मला तुझ्याकडे येता आले हे काय चांगले झाले देवकी !" तो म्हणाला.

"माझ्याकडे कुठे आलास ? व्याख्यानाला तर आलास !"

"ते निमित्त मला तुझ्याकडेच यायचे होते. लांबच्या प्रवासाला निघायचे आहे. त्यापूर्वी.."

"लांबचा प्रवास ? कुठे परदेशात..?'

"त्याहूनही लांब. परत येण्यासारखा नाही." ती विश्रब्ध विसावून बसली होती ती एकदम शंकित झाली. त्याच्याकडे पाहिलं. चंद्रप्रकाशाच्या जाळीच्या कवडशात तो दिसला. कृश, उतरलेला, खांदे ओघळलेला, गाल बसलेले, डोळ्यासभोवती काळं. तिला क्षणभर कळवळल्यासारखे झाले. खांद्यावरची शाल मागे घरंगळली. ती तशीच राहू देऊन तो म्हणाला, "कॅन्सर घशाचा... पाच-सहा वर्ष सगळं ठीक होतं. आता सेकंडरीज् सुरू झाला. तशी तब्येत बरी आहे. पण जवळ वेळ किती आहे हे कळत नव्हतं. मग तुझी आठवण आली..." ती खालच्या पायरीवरून त्याच्याजवळ बसली. जवळ सरकली "विद्या" तिचा आवाज थरथरला.

"पण मी जगायचं ठरवलं आहे. शेवटल्या थेंबापर्यंत उपचार करून घेईन. जितकी वर्ष महिने दिवस मिळतील तितके. बघ नं उतारवयात मूल व्हावं तशी माझी संस्था आणि माधवीही..."

"मी मी आहे नं. पाहीन" ती एकदम बोलून गेली. आवेगानं,... त्याचा हात पकडून आणि क्षणात सोडून देऊन तिचा हात त्याने धरला.

"पण देवकी मी जे सुरू केलं त्याच्या अस्तित्वाची बीजं त्याच्यातूनच पडावी, वाढावी. एक चक्र सुरू राहावे. इतके करता येईपर्यंत आयुष्य हवे आहे बस. इटस् सिंपली रिडिक्युलस देवकी ! जे इतके अनियमीत, बेभरोशाचे आहे. त्याला मी स्वतःच्या मनातले रूप देऊ पाहतोयू. ज्याचा आकार माहीत नाही त्याला चक्र म्हणतोय."

थंडी वाढत होती. दीड,दोन,अडीच,तीन बोलणे सरत नव्हते. तीन वाजता ड्रायव्हर उठवायला आला. अलार्म वाजला म्हणून. पण दोघं तयार होती. थर्मासमधे दूध, बरोबर बिस्किट तिने दिले. ड्रायव्हरने गाडी काढली. गाडीत बसण्यापूर्वी विद्याधरने शाल तिच्या अंगावर टाकली. तिला कळले ही त्याला आज मिळालेली शाल आहे.

अनुक्रमणिका

त्याचा गरम उबदार स्पर्श "काही राहिले का पाहून घे." ती म्हणाली. उगाचच तो गमतीने म्हणाला, "हे जाळीदार कवडसे आणि रातराणीचा वास."

"मग त्यासाठी निदान आज रात्री तरी मुक्काम करावा लागेल." ती म्हणाली.

तिने सुधीरला उठवले. त्याने निरोप घेतला.

"मी सोडायला जाते." तिने सांगितले.

गाडी राईट टाईम होती. ती आली दुरून गाडीचे दिवे जवळ येताना दिसले.

"मघा सांगायचा विसरलो. मी यावेळी तुझ्याकडे थंडीचं दव पडलेलं पाहिलं. झाडांच्या पानावर कारवर."

"ते नेहमीच पडतं थंडीत."

"हो. पण मला आज दिसलं. लहानपणी आईबरोबर उठायचो पहाटे, त्याच्यानंतर थेट आज."

"कमाल करतोस ! पहाटे कधी उठत नाहीस का ?"

"पहाटेचे दवबिंदू मोजता आले पाचच्या वर म्हणजे आयुष्य वाढत असंच आई म्हणायची." तो म्हणाला.

तिला वाटले आता आपल्याला रडू फूटणार पण गाडी धाड धाड करत आली. त्या वेगानं क्षणभर मागेच सरकली. गाडी स्थिर झाली. तो गाडीत चढला. काल गाडीतून उतरला होता. आज चढत होता. काल आला होता. आज जात होता. ती आवेगाने थरथरायला लागली. ती रडतेय हे तिच्याही आधी त्याच्या लक्षात आले तो गाडीच्या दारात उभाच होता तो खाली उतरला. तिला त्याने जवळ घेतले. थोपटले. खाली घसरलेली शाल तिच्या अंगावर लपेटून दिली. तिच्या कपाळावर ओठ टेकले.

"देवकी." तो कुजबुजला आणि गाडीत चढला. गाडीची शिटी झाली. गाडी हलली. रूळ रिकामे झाले. ती संथपणे स्टेशनबाहेर आली. ड्रायव्हर अदबीने उभा राहिला. दव पडले होते. थंडी विलक्षण होती. आभाळ लाल निळे, फिक्कट निळे आणि एका बाजूला तांबडे रंगत होते. कलश पुन्हा भरत होता कुणी भरून द्यावा तसा.

- आशा बगे, नागपूर

■■■

महानुभाव साहित्याचा उद्गोकार

● डॉ. उषा माधव देशमुख

॥१॥

साहित्याचे संशोधन ही एक अतिशय व्यापक अशी संज्ञा आहे. ही एक ज्ञानात्मक बुद्धिगम्य अभिक्रिया ठरते. इतर ज्ञानशास्त्राच्या साहाय्याशिवाय साहित्याचे संशोधन परिपूर्ण होणार नाही. उदा. स्थलकाल - निश्चितीसाठी इतिहासशास्त्राच्या ज्ञानाबरोबर गणित, खगोलशास्त्र यांचाही परिचय असला पाहिजे तरच शकसंवत्सर-मास-दिवस-तिथी-घटका-पळे यांचे निश्चित गणित मांडून काल निश्चिती करता येईल. साहित्याचे स्वरूप अतिशय व्यापक आणि भाषानिष्ठ असल्यामुळे तर अधिकच गुंतागुंतीने संशोधन करावे लागते. समाजशास्त्र, मानसविज्ञान, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, संस्कृतिशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, भूगोल इ. शास्त्राचा परिचय अभ्यास - संशोधनात गरजेचा असतो. केवळ एक कलाप्रकार म्हणून साहित्याचे संशोधन शक्य नसते. ते कार्य समीक्षा करते. उदा. दलित साहित्याच्या संशोधनासाठी भारतीय संस्कृती, जातिव्यवस्था, वर्णाश्रमधर्म विचार, तत्त्वज्ञान, समाजशास्त्रीय वैशिष्ट्ये, सांस्कृतिक वैशिष्ट्ये यांची जाणीव ठेवून दलित कवितेतील विद्रोहाचे, संतापाचे, उद्रेकाचे तथातथ्य चिंतन मांडता येईल. साहित्यनिर्मिती ही विशिष्ट काळात विशिष्ट स्थळी आणि विशिष्ट पर्यावरणात झालेली असते. अशा वेळी ती संशोधकापासून शतकांनी दूर असेल किंवा समकालीन असेल ! हे भान ठेवून संशोधकाला भाषेच्या लकबी, सांस्कृतिक पर्यावरण, विशिष्ट शब्दयोजना, व्याकरणाच्या लकबी यांचा विचार करून

काळ ठरविता येईल. एकाच ग्रंथकाराच्या इतर कलाकृतींचा तौलनिक अभ्यासही त्यासाठी करावा लागेल. ज्ञानदेव एक की दोन ? हा प्रश्न १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात प्रभावी ठरला पण ज्ञानदेव-ज्ञानेश्वरी सप्तशताब्दीच्या काळात 'अनुभवामृत', 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथातील प्रतिमा, प्रतीके, उपमा दृष्टान्त, शब्दांच्या लकबी, मांडणीची शैली, शब्दकळा, तेराव्या शतकातील मराठी भाषेचे व्याकरण विशेष या सर्व गोष्टींचा विचार अन्तर्गत आणि बहिर्गत पुराव्यांच्या साह्याने करून सर्व साहित्य ज्ञानदेवांचेच आहे या निर्णयाप्रत संशोधक आले. त्यासाठी महानुभाव, दत्त, नाथ, वैष्णव, भागवत या पंथांच्या साहित्याचा विचारविमर्श झाला आहे.

॥२॥

संशोधनात अनुपलब्ध असेल ते उपलब्ध करून देणे आणि जे उपलब्ध साहित्य असेल त्याचा प्रगतिशील अभ्यास मांडण्याची अपेक्षा असते. मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या सुदैवाने अशी फार मोठी परंपरा संशोधनाची मिळालेली आहे.

प्राचीन काळापासूनच संशोधनाला सुरवात झाली आहे. या संशोधनाच्या प्रेरणा भिन्न भिन्न स्वरूपी आहेत पण त्यामुळे आजवर जे उपलब्ध नव्हते ते उपलब्ध होऊ लागले. महानुभाव साहित्याच्या आणि वारकरी साहित्याच्या निर्मितीबरोबरच त्याचे संशोधन टीपग्रंथ, शब्दकोश, सरवळे, कंदग्रंथ, प्रतिशुद्धता या पद्धतीने होत राहिले. पण संशोधनाची खरी चळवळ सुरू झाली ती १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात होय. संस्कृत आर्ष काव्यांचे, महाकाव्यांचे संशोधन इंग्रज पंडितांनी केले. (मॅक्स मुल्लर) आणि त्यातून प्रेरणा घेऊन श्री.वि.ल.भावे यांनी इ.स. १८९८ साली 'महाराष्ट्र सारस्वत' असा एक दीर्घ शोध सिद्ध केला. भावे आणि राजवाडे यांनी महानुभावांच्या गुप्तलिप्या सोडवून घेतल्या. 'विविध ज्ञान विस्तार' या नियतकालिकाने संशोधनाला अधिक प्राधान्य देऊन, भाषाशास्त्र, व्याकरण, इतिहास, छंदःशास्त्र, नाट्यशास्त्र, भाषांतर, रूपांतर, अनुवाद, कोशनिर्मिती अशा विविध अंगांनी होणारे संशोधन प्रसिद्ध केले आणि त्यातून मराठी साहित्य-संशोधनाची एक परंपरा निर्माण झाली. हस्तलिखिते गोळा करून त्यावरून ज्ञानेश्वरी, तुकारामगाथा, विवेकसिंधू यांच्या एकत्रित संहिता छापल्या जाऊ लागल्या व त्यावर चर्चा होऊ लागली. एकीकडे इंग्रजी साहित्याची भाषांतरे आणि रूपांतरे होत होती तर दुसरीकडे मराठी साहित्य -संशोधनाकडे पंडितवर्गाचे लक्ष वेधले गेले. मुक्तेश्वराची चरित्रविषयक माहिती, स्थळकाळ - ग्रंथ - निश्चिती आणि ग्रंथांचा परिचय अशा स्वरूपाने शोध घेतला जात होता. शिवकाळ आणि संबंधित ऐतिहासिक कागदपत्रांच्या अभिमानातून बखरी, आज्ञापत्रे, दानपत्रे, करारपत्रे उपलब्ध होऊ लागलीत. मराठीचे मूळ शोधण्यासाठी ताम्रपट - शिलालेख यांचा शोध घेतला जाऊ लागला आणि टिळक

अनुक्रमणिका

- आगरकरांच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात वाङ्मयीन अस्मिता व्यक्त होऊ लागली ती संशोधनाच्या या प्रकारच्या प्रयत्नांतून. वि.का.राजवाडे, वि.ल.काळे, गुंजीकर ही संशोधकांची पहिली पिढी मानली तर म.म. वा. वि. मिराशी, के.ल.दप्तरी, नांदापूरकर, ग.ह.खरे, पिसुर्लेकर, प्रियोळकर ही दुसरी पिढी मानता येईल. डॉ. वि.भि.कोलते या दुसऱ्या पिढीचे संशोधक होते.

॥३॥

'साहित्य' हा एक विश्वसनीय, महत्त्वपूर्ण असा दस्तऐवज आहे याचे भान या काळाला आलेले होते. विविध ज्ञानमय नियतकालिकांचा जन्म, परंपरेविषयीचा अभिमान, महानुभाव लिप्यांची ओळख, राष्ट्रीय भावना, पारिभाषिक संज्ञा, कोश-निर्मिती, संत चरित्रांची मांडणी, ग्रंथ-संपादने, इतिहासाची साधने गोळा करण्याचा प्रयत्न, राजकीय प्रबोधन, विद्यापीठांच्या स्थापना व तेथील मराठीचा अभ्यासक्रम ठरविणे(मुंबई विद्यापीठ) त्यासाठी शोध संशोधनमंडळे आणि साहित्यसंस्थांची निर्मितीही. या शोधप्रक्रियेला पुढच्या काळात उपयुक्त ठरली. महाराष्ट्रात एक चळवळ उभी राहिली आणि संशोधक विचारवंत या दिशेने आपले योगदान देत गेले. त्यात डॉ. वि.भि.कोलते यांनी केलेले संशोधन महत्त्वपूर्ण तर आहेच पण संशोधनविद्येचा विकास आणि संपादनशास्त्राचे विशेष त्यांच्या संशोधित ग्रंथातून सिद्ध झाले आहेत. य.खु.देशपांडे, हरिभाऊ नेने, नी.ब.भवाळकर यांनी प्रामुख्याने महानुभाव साहित्य संशोधनाला विदर्भात सुरुवात केली. महानुभाव संप्रदायांची आणि चक्रधर परिभ्रमणाची व साहित्याची कर्मभूमी म्हणजे उभयगंगातीरावर म्हणजे विदर्भ मराठवाडा ही होती. वारकरी आणि महानुभाव दोन्ही संप्रदायाची वाढ या भागातच झाली. आणि त्यांचे मौलिक ग्रंथही याच विभागात निर्माण झाले होते. डॉ. वि.भि.कोलते यांचे महानुभाव साहित्य संशोधन असे पूरक आणि उपकारक ठरलेले आहे यात शंका नाही. त्यांच्यापुढे आदर्श होता तो अ.का.प्रियोळकर आणि म.म. मिराशी यांचा. विविध ज्ञानशाखा आणि ज्ञानशिस्ती यांच्याशी डॉ. कोलते यांच्या पिढीतील लेखकांचा आणि संशोधकांचा मूलगामी संपर्क होता. अनेक भाषांचा त्यांचा व्यासंग आहे. त्यामुळे अनेक ज्ञानशाखांत मूलगामी संशोधन करून विदर्भातील संशोधकांची एक पिढी सशक्तपणे आणि सखोल असे संशोधन करीत होती व त्यातून मराठी वाङ्मयाच्या नकाशात एक बलदंड परंपरा निर्माण झाली. संशोधकांचे संशोधन एकारलेले राहिले नाही. तर नाणकशास्त्र, पुराभिलेखाशास्त्र, संस्कृत आर्षकाव्य, स्थळकाळ निश्चितिशास्त्र, संपादनशास्त्र, हस्तलिखितवाचनशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान शास्त्र, संस्कृतिशास्त्र, खगोल गणितशास्त्र अशा प्रकारच्या विविध शास्त्रांच्या साहाय्याने संशोधकांच्या या पिढीने संशोधन ही

अनुक्रमणिका

अभिक्रिया व्यापक आणि संपन्न केली आणि ज्या काळात त्यांनी संशोधन केले त्या काळात आजच्यासारखी संशोधन आयुधे आणि संग्राहकांची मानसिकता नव्हती. त्या काळात अत्यंत चिकाटीने, जिकिरीचे हे संशोधन केवळ ज्ञानानंदासाठी आणि शोधतृष्णेतून केलेले आहे. व्यापक, चतुरस्र, बहुआयामी, वैविध्यपूर्ण असे संशोधन करणाऱ्या पिढीचे डॉ. वि.भि.कोलते हे एक महत्त्वाचे संशोधक ठरतात. संशोधनाच्या वेगवेगळ्या वाटा त्यांनी सिद्ध केल्या. वेगवेगळ्या पद्धती आत्मसात केल्या व वेगवेगळे सिद्धान्त मांडले त्याचा विचार केला पाहिजे. महानुभावांचा आचारधर्म आणि तत्त्वज्ञान यांचे पृथक्करण, स्पष्टीकरण आणि संश्लेषण शेकडो पोथ्यांचा आधार घेऊन मांडण्याचा प्रयत्न डॉ. वि.भि.कोलते यांनी अखेरपर्यंत केला. नामदेव तुकाराम हे त्यांचे आवडते प्राचीन कवी होते. त्यांवरील संशोधन त्यांनी केले. नाटकांच्या आवडीतून नाट्यसमीक्षा केली. कविता, कादंबरी, निबंध याही विषयांच्या चिंतनातून आपली समीक्षा बहुमुख केली. भाषेचा व्याकरणापासून सुलेखनापर्यंत मराठीच्या कक्षा रुंदावणारा अभ्यास सतत वाचकांसमोर, जाणकारांसमोर, ठेवला. वेळप्रसंगी त्यासाठी समाजात उतरून मोर्चे काढले आणि मराठी अस्मितेचा उद्घोष केला. ताम्रपट शिलालेखांचे वाचन करून अभ्यासपूर्ण ग्रंथ सिद्ध केले. महानुभावांचा आदिग्रंथ 'लीळाचरित्र' याची पाठसंशोधनात्मक संपादन शोधणी केली. अनेक महानुभाव संप्रदायाच्या सकळी, सुंदरी लिप्यांमध्ये अडकून पडलेली मौलिक काव्ये डॉ. कोलते यांनी संपादित केलीत आणि महानुभाव साहित्याचे दालनच उघडून दिले. असे बहुपेडी संशोधन डॉ. कोलते यांनी केलेले आहे.

॥४॥

पद्मश्री, विद्यारत्न, संशोधनमहर्षी, विद्यावाचस्पती, मराठी भाषेचे आणि साहित्याचे रसज्ञ समीक्षक, विदग्धपंडित, महानुभाव लिपी आणि साहित्य यांचे उद्बोधक, ज्येष्ठ पाठ संशोधक, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु यांचा जन्म विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील नरवेल येथे २२ जून १९०८ साली झाला आणि मृत्यू ८ एप्रिल १९९८ साली झाला. आणि कृतार्थ ज्ञानयज्ञाची सांगता झाली. डॉ. कोलते दीर्घायुषी होते व त्यांनी प्रत्येक दिवस काही ना काही संशोधन करण्यात कृतार्थतेने घालविला. अखेरच्या काळात त्यांनी आपले आत्मचरित्र 'अजूनि चालतोची वाट' हे लिहून महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक - सामाजिक जीवनाचा आलेखच स्पष्ट केला आहे. १९३१ ते १९६६ अशी पस्तीस वर्षे त्यांनी अध्ययन - अध्यापन केले. १९६६ ते ७२ अशी सहा-सात वर्षे नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून कार्य केले. विदर्भ साहित्य संमेलन १९४८, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय परिषद १९६२, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

भोपाळ १९६७, अशी अध्यक्षपदे डॉ. कोलते यांनी भूषविली होती. शासनाच्या अनेक कमिट्यावर शिक्षणतज्ज्ञ म्हणून आणि मराठी भाषा आणि साहित्य यांचे अभ्यासक म्हणून अविरत कार्य केलेले आहे. विदर्भ ही त्यांची कर्मभूमी असली तरी स्वकर्तृत्वाने त्यांनी महाराष्ट्रातील बिनीच्या लेखकांमध्ये, साहित्यिकांमध्ये स्थान मिळविले होते असे व्यासंगी अभ्यासक, संशोधक आणि चिकित्सक म्हणून डॉ. कोलते यांचा लौकिक होता आणि आहे.

॥५॥

डॉ. वि.भि.कोलते यांची ग्रंथसंपदा विपुल आहे आणि प्रत्येक ग्रंथ हा वैचारिक प्रगल्भतेने ओतप्रोत भरलेला आहे. मात्र आपल्या लेखनाची कारकीर्द डॉ. कोलते यांनी काव्य लेखनाने सुरू केलेली आहे. १९३३ ते १९९६ अशा प्रदीर्घ लेखन कालखंडात 'लव्हाळी' ते 'प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर' असा प्रदीर्घ ग्रंथप्रवास डॉ. कोलते यांचा आहे. शेवटच्या ग्रंथाच्या अर्पणपत्रिकेत 'सारस्वती जन्मभू विदर्भास' असे म्हटले असून आपली जन्मभूमी, कर्मभूमी, अभ्यासभूमी, शिक्षणभूमी हिला वंदन करून कृतार्थता व्यक्त केली आहे. डॉ. कोलते यांनी किती विविध प्रकारी लेखन केले हे खालील कोष्टकावरून लक्षात येईल.

डॉ. विभि.कोलते यांची ग्रंथसंपदा

१. कविता 'लव्हाळी' १९३३

२. नाटक 'स्वस्तिक' 'सोडचिठ्ठी' १९३८

३. अ) प्राचीन साहित्य - मीमांसा-

१) मराठी - प्राचीन मराठी साहित्य संशोधन १९६८

२) हिंदी - मराठी संतांचे सामाजिक कार्य १९५४

ब) प्राचीन साहित्याच्या अंतरंगात १९९५

४. आधुनिक साहित्य - मीमांसा-

अ) साहित्य संचार १९६५

ब) गिरिपर्णा १९८९

क) वेचलेले कवडसे ९५

ड) स्नेहबंध १९९४

५. आत्मचरीत्र 'अजूनि चालतोची लाट' १९९५

६. मराठी भाषा - व्याकरण - भाषा विचार

अ) मराठी दीपिका १९३७

ब) मराठीच्या अस्मितेचा शोध १९९२

क) इये मराठीचिये नगरी १९९६
७. महानुभाव साहित्य संशोधन
अ) महानुभाव संशोधन : १ १९६२
ब) महानुभाव संशोधन : २ १९८४
क) महानुभाव संशोधन : ३ १९९२
ड) महानुभाव संशोधन : ४ १९९५
८. पुराभिलेख संशोधन - महाराष्ट्रातील काही शिलालेख व ताम्रपट १९८७
९. प्रस्तावना संग्रह - धन्यतेची थाप १९९३
१०. चरित्रात्मक
अ) भास्कर भट्ट बोरीकर चरित्र व काव्यविवेचन १९३५
ब) श्री चक्रधर चरित्र १९५२
क) श्री चक्रधर शेवटचे प्रकरण १९८२
११. महानुभाव तत्त्वज्ञान १९४५
महानुभावांचा आचारधर्म १९४८
१२. महानुभाव साहित्याची संपादने
संपादने : पाठचिकित्सात्मक अभ्यास
उद्धवगीता (भास्करभट्ट बोरीकर) १९३५
स्थानपोथी (मुनिव्यास) १९३७
रुक्मिणी स्वयंवर (नरेंद्र) १९४०
श्री गोविंदप्रभु चरित्र (म्हाइंभट्ट) १९४४
वछाहरण (दामोदर पंडित) १९५३
शिशुपाळवध (भास्करभट्ट बोरीकर) १९६०
मूर्तिप्रकाश (मुनिकेशिराज) १९६२
सह्याद्री वर्णन (रवळोबास) १९६४
ज्ञानप्रबोध (विश्वनाथ व्यास) १९७३
पंचोपाख्यान १९७८
लीळाचरित्र (म्हाइंभट्ट) १९८२
आचारबंध (विश्वनाथ बास विडकर) १९८२
लक्षणबंद (दत्तराज मराठे) १९८५
नरविलाप स्तोत्र (भास्करभट्ट बोरीकर) १९८७
विचारबंद (अवधूत मुनी वाइंदेशकर) १९८९

अनुक्रमणिका

वरील पाठ संशोधनात्मक संपादने महानुभाव गद्यपद्याची आणि सैद्धांतिक ग्रंथांची संशोधने आहेत. त्यांतील मुकुटमणी म्हणजे बृहद् लीळाचरित्राचे संकलन आणि संपादन होय. या संकलन संपादनामुळे आधुनिक काळातील ज्ञानमहर्षी म्हाइंभट्ट म्हणजे डॉ. कोलते असे समजले गेले. वरील कोष्टकावरून डॉ. कोलते यांचा ज्ञानव्यासंग किती सशक्त आणि सखोल होता हे लक्षात येते. डॉ. कोलते यांच्या काही ग्रंथाच्या अनेक आवृत्या प्रसिद्ध झाल्या आहेत. यावरून त्या ग्रंथातील मौलिकता लक्षात येईल. एक चालते बोलते ज्ञानपीठ डॉ. कोलते यांच्या ठिकाणी वस्तीला होते. हजरजबाबी, तल्लख बुद्धिमत्ता, विलक्षण पाठांतर यामुळे त्यांचे लेखन, संभाषण आणि व्याख्याने अतिश्रुतिसुभग अशी होत असत. डॉ. कोलते यांच्या संशोधनाचा आणि चिंतनाचा परिसर किती व्यापक आहे हे स्पष्ट दिसून येते. प्राचीन आणि अर्वाचीन साहित्यावर त्यांची अभिरुची पोसली गेलेली दिसत असली तरी ते कवी हेते हे लक्षात घेऊन मीमांसा केली पाहिजे. त्यांची 'घड्याळ' ही कविता आजही बालमनाचे उन्मेष प्रगट करणारी अशी ठरते. महानुभाव गद्यपद्याचे आणि तत्त्वज्ञान आचारधर्माचे उद्‌बोधक म्हणून जसा त्यांचा लौकिक आहे तसाच अर्वाचीन साहित्याचे रसज्ञ समीक्षक आणि भाषा - वैज्ञानिक म्हणूनही त्यांचा लौकिक आहे.

॥६॥

सोबतच्या कोष्टकावरून लक्षात येईल की डॉ. कोलते यांनी काव्यलेखनापासून सुरुवात केली असली तरी त्याच काळात भास्करभट्ट बोरीकराचे चरित्र व काव्यविचार केलेला दिसतो आणि त्याबरोबरच शिशुपाळवधाचे पाठसंशोधनात्मक संपादनही केलेले आहे. पदवीपूर्व आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना शिकवता शिकवता डॉ. कोलते महानुभाव संशोधनाकडे वळलेले आहेत. त्यांचा पीएच.डी.चा विषय महानुभाव तत्त्वज्ञान हा होता. त्या संशोधनाबरोबरच 'महानुभावांचा आचारधर्म' या ग्रंथांची सिद्धता झालेली होती. मराठी भाषेचे सुलेखन सिद्ध करण्यासाठी 'मराठी दीपिका' या ग्रंथांची निर्मिती झाली आणि त्यात प्रतिष्ठित लेखकही भाषेची कशी मोडतोड करतात यावर भर दिला आहे आणि बहुजन समाज शिक्षणाचे संस्कार घेत असल्यामुळे त्याला सहज शक्य व्हावे म्हणून चिपळूणकरी लेखनाचे मराठीचे नियम सोपे करण्याची चळवळ डॉ. कोलते यांनी सुरू केली आणि लेखनाच्या नियमांसंदर्भात एक नवी वाट निर्माण केली. त्यासाठी अखिल भारतीय साहित्य संमेलनात आणि विदर्भ साहित्य संमेलनात अध्यक्षीय भाषणात लेखनाच्या सुलभीकरणाची प्रक्रिया कशी आवश्यक आहे यावर भर दिला. डॉ. कोलते यांचे भाषाविषयक संशोधन आणि भाषाविषयक आग्रह असा समाजसापेक्ष पद्धतीने प्रगट झालेला आहे. मराठी संस्कृती, मराठी अस्मिता आणि मराठी भाषा याविषयी ते

फार आग्रही होते. याचा अर्थ इंग्रजी भाषेला त्यांचा विरोध होता असे नसून किंवा राष्ट्रभाषेला विरोध होता हेही कारण नसून त्यापाठीमागे मातृभाषेतून शिक्षण हा आग्रह ठाम होता त्यासाठी नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु होताच सर्व पदव्यांचे आणि सर्व विद्यापीठीय कारभाराचे मराठीकरण डॉ. कोलते यांनी सातत्याने केले आणि त्याच्या परिणामातून महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, अमरावती, मराठवाडा, शिवाजी इत्यादि विद्यापीठातून राजभाषा आणि राज्यभाषा मराठीतून कारभार सुरू झाला.

स्वतंत्र मराठीच्या अस्तितवासाठी ते प्रयत्नशील राहिले ते अखेरपर्यंत. 'साहित्यसंचार' 'प्राचीन साहित्याच्या अंतरंगात' अशी त्यांनी प्राचीन अर्वाचीन साहित्याची मीमांसा केला असली तरी ते खऱ्या अर्थाने पूर्णतः रमले ते पाठचिकित्सात्मक संपादनात आणि महानुभाव साहित्य संशोधनात ! 'महात्मा रावण' 'तुकारामाचे वैकुंठगमन', 'ज्ञानदेव नामदेव संबंध' या विषयी त्यांची मने परंपरेपेक्षा वेगळी होती. पण आग्रही मतप्रतिपादनाच्या शैलीमुळे त्यांनी अनेक वेळा रोषही ओढवून घेतलेला होता. संशोधनात महानुभाव पंथ वैदिक आहे असे सुरुवातीला असलेले त्यांचे मत अधिक संशोधनाअंती हा पण अवैदिक आहे असे बदलले ते प्रांजळपणे त्यांनी मान्यही केले होते. डॉ. कोलते यांच्या चिंतनात असेच काही आग्रह आणि दुराग्रह यांचे प्रतिबिंब पडलेले दिसते पण त्यांतून व्यक्त होणारी ज्ञानलालसा व ज्ञानाचा अखेरपर्यंत केलेला पाठपुरावा चकित करणारा ठरला आहे. सारगर्भ विचार मांडणे हे त्यांचे वैशिष्ट्य त्यांच्या समीक्षणात्मक लेखनात आणि सामाजिक संदर्भ लेखनात प्रगट झाले आहे. बहुजन - समाजासाठी लोकाभिमुखता आली पाहिजे हा त्यांचा आग्रह समीक्षालेखनात दिसतो तर संपादन - संशोधनात मूलगामी रहस्योद्घाटन करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो अशा द्विध्रुवात्मक पद्धतीने डॉ. कोलते यांचे लेखन झालेले आहे. त्यापाठी ज्ञानतृष्णा महत्त्वाची ठरली. आणि अखेरपर्यंत हेच जीवनध्येय बाळगून डॉ. कोलते यांनी महानुभाव साहित्याचे संपादन संशोधन करून हे दालन समृद्ध केले आहे.

डॉ. वि.भि.कोलते यांनी संशोधन तीन अंगांनी केलेले आहे (१) उपलब्ध नाही ते उपलब्ध करून देऊन त्यांची संपादणी करणे (२) ताम्रपट शिलालेखांचे वाचन करून स्थळकाळ-शोधन करणे आणि (३) महानुभाव साहित्यातील समस्यांची चिकित्सा करणे . स्थळकाळ आणि लेखक यांची निश्चिती करून मांडणे यातच चक्रधरांचे अखेरचे प्रकरण, श्रीमुखदृष्टान्त आणि लीलाचरित्र इत्यादि अनेक विषय चर्चिले गेलेले आहेत. डॉ. कोलते यांच्या या परिघातील संशोधनाने जवळ जवळ समग्र महानुभाव साहित्य उजेडात आलेले आहे. त्यांच्या संशोधनाचे एक वैशिष्ट्य लक्षात घेतले पाहिजे ते म्हणजे इतर संशोधकांनी जर शोध घेतला असेल त्या ग्रंथाचे संपादन त्यांनी केलेले नाही.

उदाहरणार्थ 'स्मृतिस्थळ' आणि 'दृष्टांतपाठ' या दोन्ही ग्रंथाचे किंवा 'सूत्रपाठा'चे संशोधन संपादन त्यांनी केलेले नाही. वस्तुतः ते स्वतंत्रपणे करू शकले असते पण ही संशोधकाची जी ऋजुवृत्ती आहे ती लक्षात राहते. डॉ. तुळपुळे, डॉ. देशपांडे यांनी 'दृष्टान्तपाठ', 'सूत्रपाठ', 'स्मृतिस्थळ' संपादित केल्यावर त्या ग्रंथांना प्रस्तावना लिहिताना त्या ग्रंथातील त्रुटी आणि मर्यादा डॉ. कोलते यांनी दाखवून दिल्या आहेत. आणि त्यांच्या प्रयत्नांचे स्वागत केले आहे. उलटपक्षी आपल्या संपादित संहिता स्वीकारून ज्यावेळी इतर अभ्यासकांनी संपादने केली व ऋणनिर्देशही केला नाही. त्यावेळी संतापही व्यक्त केलेला आहे आणि अशा वृत्तीचा निषेध नोंदविला आहे.

१९३५ साली डॉ. कोलते यांनी 'उद्धव गीते'चे पाठ चिकित्सात्मक संपादन केले. याच वर्षात अ.का.प्रियोळकर यांचे 'नलदमयंती स्वयंवर' आणि मुक्तेश्वराचे 'आदिपर्व' प्रसिद्ध झाले. याच वर्षी का.ना.साने यांनी 'भाऊसाहेबांची बखर' पाठसंशोधनात्मक पद्धतीने संपादित केली. कृ.पां.कुळकर्णी यांनी 'विवेकसिंधु' संपादित केला. यावरून मराठी संशोधन क्षेत्रात पाठ संशोधनाचे एक नवे युग निर्माण झाले. श्री. ना. बनहट्टी आणि दा.सी.पंगू यांनी ज्ञानेश्वरीचे अध्याय संपादित केले आणि संशोधनक्षेत्रात एक नवे वारे खेळू लागले. डॉ. कोलते यांचा पीएच.डीच्या पदवीसाठी महानुभावांचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म हा अभ्यास सुरू होता. त्या चिंतनातूनच 'उद्धवगीते'चे संपादन आणि भास्करभट्ट बोरीकर : चरित्र आणि काव्यविवेचन हे ग्रंथ सिद्ध झाले. डॉ. कृ.पां.कुळकर्णी, अ.का.प्रियोळकर प्रा. श्री.ना.बनहट्टी यांची पाठसंशोधनाची पद्धती लक्षात घेऊन डॉ. कोलते यांनी विपुल पाठसंशोधन केले. त्यात त्यांनी मांडणीचे, निर्मितीचे, व्यवस्थापनाचे पूर्णपणे स्वातंत्र्य घेतले आहे. महानुभाव साहित्यातील प्रसिद्ध 'सातीग्रंथांपैकी' 'ऋद्धिपूरचरित्र' वगळता सहा ग्रंथांचे पाठसंशोधनात्मक संपादन डॉ. कोलते यांनी केलेले आहे. लीलाचरित्र एकांक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध यांना अन्वयी लावून वासनाभेद काढून टाकून अज्ञानलीळा आणि दृष्टान्तवचने यांची मांडणी करून या आदिग्रंथाचे संपादन डॉ. कोलते यांनी केलेले आहे. त्यातील काही लीला वादग्रस्त असल्यामुळे शासनाचा व महानुभाव सांप्रदायिकांचा त्यांना रोष ओढवून घ्यावा लागला आणि त्यांच्या लीळाचरित्राच्या प्रकाशनावर बंदी घालण्यात आली. पण त्यामुळे त्यांच्या संशोधकप्रतिमेला आणि तपस्येला बाधा आली नाही. त्यांच्या अखेरच्या जीवनटप्प्यात असे व्हायला नको होते याची हळहळ मात्र कायमची राहून गेली.

डॉ. कोलते यांचे महानुभाव साहित्य संशोधन म्हणजे एक अथक अशी ज्ञानतपस्याच होती. गावोगावी जाऊन महंतांना भेटून त्यांचा अनुनय करून, विश्वास

अनुक्रमणिका

संपादन करून ऐन उमेदवारीच्या आणि तरुणपणात डॉ. कोलते यांनी ही अलक्षित ज्ञानवाट चोखाळली. नुसत्या पोथ्या गोळा करून उपयोग नसतो तर गुप्तलिप्यांची उकल करणे आवश्यक ठरते. सकळा, सुंदरी, पारमांडिल्य अशा लिप्या उलगडून घेऊन पूर्ण पोथी, अपूर्ण पोथ्या यांची वर्गवारी करून, प्राचीन अर्वाचीन असे स्वरूप ठरवून वंशवृक्ष बांधावा लागतो. डॉ. कोलते यांनी सातीग्रंथापैकी रुक्मिणी सैंवर, सह्याद्रिवर्णन, वछाहरण, शिशुपाळवध, नरविलापस्तोत्र इत्यादि सर्व ग्रंथांची अशाप्रकारे मांडणी करून संपादनाला सुरवात केली. त्यामुळे डॉ. कोलते यांचे स्वतंत्र संपादनशास्त्र Science of Editing निर्माण झाले तसेच स्वतंत्र असे पाठसंशोधनात्मक संपादनशास्त्रही त्यांनी सिद्ध केले. त्यातून त्यांच्या तीव्र बुद्धिमत्तेचा आणि संशोधनवृत्तीचा प्रगल्भ आविष्कार झालेला दिसतो. पुनः ग्रंथ संपादनासाठी ज्ञातृनिष्ठ किंवा श्रेयनिष्ठ पद्धत योजिली असेल तरीही किंवा स्वतंत्र दोन्ही पद्धतींच्या मिश्रणातून पाठसंशोधन झालेले असले तरीही त्यांच्या प्रदीर्घ ग्रंथप्रस्तावनांचा एक स्वतंत्र घाट होता. एक स्वतंत्र रूपलावण्य होते आणि एक स्वतंत्र मांडणी व्यवस्थापन होते. विविध हस्तलिखितातील ओव्या निश्चित करणे, त्यातील पाठनिश्चित करणे, तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थितीचे भान जागृत ठेवून अन्वय लावणे, समकालीन साहित्याच्या संदर्भातून अर्थ निश्चित करणे, महानुभाव पोथ्यांतून आलेले स्थळकाळनिर्देश, यादव राजवटीचे संदर्भ, शकसंवत्सराचा मेळ घालणे त्यावरून कालनिश्चिती, स्थळ निश्चित करणे. उदाहरणार्थ चक्रधरांचा काळ निश्चित करण्यासाठी त्र्यंबकेश्वरच्या सिंहस्थपर्वणीचा उल्लेख, सिंघणदेवाच्या राजवटीचा उल्लेख, कैटचा उल्लेख हे सर्व तपासून आपली अनुमाने निश्चित केली असे प्रत्येक संपादनात दिसून येईल. संस्कृत ग्रंथांचा आधार, पंचांगशास्त्राचे सखोल ज्ञान, इतिहास संस्कृती आणि भूगोलाचे मार्मिक आकलन यांच्या साह्याने त्यांच्या एका एका ग्रंथांची प्रस्तावना म्हणजे संपूर्ण तो काळच सजग असा डोळ्यांसमोर उभा करण्याचा प्रयत्न असतो. इतर सांप्रदायिक आणि भाषिक संदर्भाने या प्रस्तावना परिष्कृत झालेल्या असतात. डॉ. कोलते यांनी एकूण पंधरा महानुभाव संहितांचे पाठसंशोधन केलेले आहे. या संपादनात दोन्ही पद्धती ते स्वीकारतात पण परंपरेपेक्षा वेगळ्या पद्धतीने, मनःपूत रीतीने. काही ग्रंथांत प्रतप्रमाणवादी शास्त्रीयपद्धती स्वीकारून तिच्यात इतर पोथ्यातील पाठपाठांतरे घालण्याचे स्वातंत्र्य त्यांनी घेतलेले आहे. तर लीळाचरित्राच्या संपादनात मात्र पुनर्निर्मितीतून नवरचना झालेली आहे. नमुन्यादाखल तिचाच विचार येथे करू या. मूळ लीळा चरित्र एकांक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध यांच्यासह अज्ञातलीळा, सूत्रे दृष्टान्त, श्रीकृष्णचरित्रातील लीळा, द्वापारीच्या लीळा, सह्याद्रलीळा, द्वारावतीच्या लीळा, यांनाही डॉ. कोलते यांनी स्थान दिलेले आहे. पाठचिकित्साशास्त्रात संहितेची

पुनःस्थापना करावयाची असते. पण प्रस्तुत महाग्रंथांत मनःपूत असे पाठनिवडीचे स्वातंत्र्य घेतले गेले आहे. दृष्टान्तपाठातील दृष्टान्त बसवितांना त्यांचे द्राष्टांतिक गाळलेले आहे. उदाहरणार्थ खाजे याचा, अन्नाचा, अमृताचा दृष्टान्त पूर्वार्धात १७५ या लीळेत बसविला आहे. पण द्राष्टांतिक गाळलेले आहे त्याचे स्पष्टीकरण दिलेले नाही. तसेच घटनानुषंगाने चक्रधर चरित्रातील लीळांचे व्यवस्थापन करण्याच्या प्रयत्नामुळे आणि संपादकीय स्वातंत्र्यामुळे मूळ लीळा चरित्राची संहिता उपलब्ध होत नसून ती डॉ. कोलते प्रत म्हणूनच लक्षात घ्यावी लागते. वास्तविक इतर कोणत्याही शोधनात डॉ. कोलते यांची वृत्ती राजवाड्यांसारखी आग्रही दिसत नाही पण लीळाचरित्राच्या संपादनात मात्र त्यांनी आग्रहीपणामुळे बांधणी केल्यामुळे काही पिढीपाठ, काही वाइंदेशकर प्रतीचे पाठ असे मिश्रण केलेले दिसून येते. त्यामुळेच पुढे वाइंदेशकर पाठातील सीतेचा व्यभिचार या लीळेमुळे लोकक्षोभ निर्माण झालेला होता. हा एक मुद्दा सोडला तर डॉ. कोलते यांचे महानुभाव साहित्य संशोधन हे हिमालयासारखे उत्तुंग आहे. त्यात माझ्या मनात बिलकूल शंका नाही.

बृहद्‌लीळाचरित्राची पहिली आवृत्ती १९७८ साली प्रसिद्ध झाली आणि दुसरी आवृत्ती १९८२ मध्ये प्रकाशित झाली. तिसरी आवृत्ती पुढे लोकक्षोभाच्या भोवऱ्यात अडकली होती. पहिल्या आवृत्तीतील चक्रधरांची वचने आणि दृष्टान्त यांचे स्थान दुसऱ्या आवृत्तीत बदलून पुनःस्थापना केलेली आहे. 'पुनरुक्तलीळा' या संपादनात गाळल्या आहेत. नवीनलीळा संहितेत अंतर्भूत केल्या आहेत. काही स्थानदृष्ट्या पुनर्व्यवस्थापन केले आहे. स्वामींची काही वचने व दृष्टान्त यांचेही पुनःस्थापन निराळ्या ठिकाणी केले आहे. त्यामुळे उत्तरार्धातील लीळांचे क्रमांक बदलले आहेत. अनुक्रमणिकेत निवेदन, आभार, संक्षेप, प्रस्तावना (आठ भाग ११५ पृष्ठे) असे करून लीलाचरित्र पूर्वार्धाची समग्रलीळांची सूची शीर्षकासह (५९२) दिलेली आहे. उत्तरार्धात ६५५ लीळा आहेत. श्रीकृष्णचरित्र - द्वापारलीला- ४८ अज्ञातलीळा १५१ अखेरीस पाच परिशिष्टे यात व्यक्तिसूची, स्थानसूची दृष्टान्तसूची, सूत्रसूची, शब्द कोश उपलब्ध करून दिलेला आहे.

प्रस्तावनेत, मराठीतील आद्यग्रंथ, आद्य मराठी गद्यगंथ, आद्य चरित्रग्रंथ (२) ग्रंथनिर्मितीचा इतिहास, संशोधन प्रामाण्य, म्हाइंभटाची लीळासंशोधन, लीळाचरित्राचे भाग, सर्वलीळांचे प्रथम संकलन मग विभागणी, एकांक स्वतंत्र भाग नव्हे, सैह्याद्र द्वापार, द्वारावती व अज्ञातलीळा, लीळाचरित्राचा लेखनकाळ, स्मृतिस्थळाचा पुरावा, मूळ लीळाचरित्र खालशाच्या धाडीत नष्ट, उपाध्ये हिराइसाकडून पुनर्लेखन, पुनर्लेखनाचा काळ, पिढीपाठ संशोधनाचा इतिहास, हिराइसापाठ, पारिमांडिल्य, तळेगावकर, वाइंदेशकर पाठ (३) गद्यपद्य ग्रंथाचे संपादन, ज्ञानेश्वरी लीळाचरित्र संपादनाचे निरीक्षण,

अनुक्रमणिका

सर्व पाठांच्या पोथ्या दुर्मिळ साधनसामग्री, पूर्वार्ध प्रती (बारा) उत्तरार्ध प्रती (सात) अज्ञात श्रीकृष्णचरित्र अज्ञातलीळा, सूत्रपाठ, दृष्टान्तपाठ, (४) संपादनाचे ध्येयधोरण, सैह्याद्र लीळांचे पुनःस्थापन, द्वरावती लीळा, अज्ञातलीळा, प्रकरणवश वचनांचे पुनःस्थापन, दृष्टान्ताचे पुनःस्थापन (५) संहिता-मुद्रणाचे स्पष्टीकरण (६) म्हाइंभटाचे चरित्र, ग्रंथकर्तृत्व, म्हाइंभटाचे काव्य (७) चक्रधरचरित्र पूर्ववृत्त, द्यूतक्रीडा, रामयात्रागमन, शक्तिस्वीकार, पर्वतीक्रीडा (८) समारोप अशी सर्वांगीण दीर्घ प्रस्तावना करून ग्रंथारंभ झालेला आहे. याच पद्धतीने डॉ. कोलते यांची सर्व संपादने झालेली आहेत. त्यातून विषयाची सर्वंकषता आणि परिपूर्णता लक्षात येते. यासाठी महानुभावांच्या टीपाग्रंथांचाही आधार घेतलेला दिसतो. अतिशय कष्टाने आणि बौद्धिक आयामाने डॉ. कोलत्यांचे सर्वच पाठसंपादन-ग्रंथ नटलेले आहेत; उदाहरणार्थ दत्तराज मराठे यांचा लक्षणबंद, अवधूत मुनींचा विचारबंद, विश्वनाथ व्यास बिडकर आचारबंद या अखेरच्या संपादनातही दिसून येते. दीर्घ विस्तृत सर्वांगीण प्रस्तावना आणि ग्रंथाच्या शेवटी सर्वांगीण परिशिष्टे या धाटणीने सर्व ग्रंथ सिद्ध झालेले आहेत. लीळा आणि लक्षणांसाठी भीष्माचार्यांचे वार्तिक आणि प्रत्येक शतकात निर्माण झालेले टीपाग्रंथ, हस्तलिखितातील संदर्भ आणि ताम्रपट शिलालेखातील काळ यांचे संदर्भ घेऊन संहितासिद्धी केलेली आहे.

सातीग्रंथांपैकी शिशुपाळवधाचे उदाहरण घेतल्यास ३५ पृष्ठांची दीर्घ प्रस्तावना तीन शिशुपाळवधाची भावेप्रत, संपादन-सामग्रीसाठी उपलब्ध झालेल्या आठ पोथ्या, त्या कुणाकडून मिळाल्या, पूर्ण आहेत की अपूर्ण, सुरूवात आणि फलश्रुती काय आहे समाप्तिलेखाची शहानिशा या पद्धतीने अ प्र, च प्रत असे वर्गीकरण केलेले आहे. त्यापुढे संपादनाची भूमिका, ओळी संख्या, टीपग्रंथ, लेखनकाळ (शकाची ओवी प्रक्षिप्त), श्रुतिस्मृतिवृद्धाचार मार्गरूढी, स्मृतिवृद्धाचार-अनुल्लेख व स्थानांतर, शिशुपाळवधाची वृद्धाचारातील आख्यायिका, अन्वयस्थळातील मतांतर, वाइंदेशकरांचे आचार्यत्व, पंथीय तत्त्वज्ञानाचे स्वरूप, वाङ्मयसौंदर्य, रसाविष्कार, भाषाभेदानुवाद, लेखनकाळ, भास्करभट्टांचे चरित्र आणि ग्रंथकर्तृत्व, आचार्यपद, शेवटचे दिवस, समारोप. अशा पद्धतीने सर्वांगपरिपूर्ण तपशीलबहुल प्रस्तावना प्रत्येक ग्रंथाला असते आणि ग्रंथाच्या सुरवातीला टीपाग्रंथातील संदर्भ, विविध पोथ्यांतील पाठभेद देऊन शोधनाची पूर्तता केलेली असते. ग्रंथाच्या अखेरीस अर्थनिर्णायक टीपा आणि शब्दकोष विस्तृत असा दिलेला असतो आणि शोधग्रंथ परिपूर्ण झालेला असतो. एक नवे काव्य वाचकांच्या स्वाधीन केलेले असते.

पाठसंशोधनाच्या व्यासंगातून डॉ. कोलते यांनी पाठचिकित्साशास्त्राचे निकष कोणते असतात याविषयी एक दीर्घलेखही लिहिलेला आहे. अ.का.प्रियोळकर, श्री.

अनुक्रमणिका

ना.बनहट्टी, सुरेश डोळके, उषा देशमुख यांनीही मराठीतील पाठसंशोधनावर समग्रतेने विचारविमर्श केलेला आहे तर वसंत दावतर यांनी कोशरचना केलेली आहे आणि या दृष्टीने मराठीचे पाठसंशोधनशास्त्र प्रगत होत आहे. महानुभाव संप्रदाय आणि चक्रधरचरित्र हा डॉ. कोलते यांच्या संशोधनाचा केंद्रबिंदू आहे आणि त्या अनुषंगाने आचारधर्म, तत्त्वज्ञान, इतर आचार्यांचे वाङ्मय, परंपरा, सातीग्रंथ, स्थळ ग्रंथ, बंद ग्रंथ यांचे संशोधन झालेले आहे. डॉ. कोलते यांच्या सर्वच संशोधनात एक विशिष्ट सूत्रबद्धता असते. विषय मांडणीतील विलोभनीय व्यवस्थितपणा, विषयाला सर्वांगांनी आत्मसात् करून केलेली टीकाटीप्पणी, विषयाच्या आजूबाजूचा परिसर, त्याचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय तरंग आणि त्याचा चिंतनविषयाशी असलेला अनुबंध, त्यातील कठिण शब्दांच्या व्युत्पत्ती, शब्दकोश, टीपा, हस्तलिखित पोथ्यांची वर्णने, त्यांचा वंशवृक्ष व ग्राह्याग्राह्यता अशा सर्व शक्यता स्वीकारून हा शोध परिपूर्ण झाला असतो. दीर्घ व्यासंगाशिवाय आणि इतर ज्ञानशिस्तीच्या परिचयाशिवाय हे शक्य नसते. य.खु.देशपांडे, नी.ण.भवाळकर, हरिभाऊ नेने यांच्या संस्कारातून संशोधनाची सुरुवात करणारे डॉ. कोलते यांनी नंतरच्या काळात फार मोठा पल्ला गाठला आणि स्वतःची मुद्रा महानुभाव-संशोधनावर उमटविली. गद्यग्रंथ असो किंवा काव्यग्रंथ असो त्यांची संपादनाची चौकट निश्चित झालेली असते. पाठसंशोधनविद्येला डॉ. कोलते यांनी भारदस्त आणि भरीव स्वरूप दिले यात शंका नाही. इंग्रजीत ज्याला हाय्यर क्रिटिसिझम म्हणतात, ती हाय्यर क्रिटिसिझम संहिता-निश्चितीच्या संदर्भात डॉ. कोलते यांनी मराठीमध्ये आणली आहे. संपादित ग्रंथ आणि त्यातूनच सिद्ध झालेले चरित्रग्रंथ, काव्यसमालोचनपर ग्रंथ या साऱ्या महानुभाव-साहित्य-संशोधनरुपी वटवृक्षाच्याच वेगवेगळ्या फांद्या ठरतात. इतकेच नव्हे तर महानुभाव संशोधन खंड १ ते ४ म्हणजे महानुभाव-साहित्य-संशोधनातील सुटलेल्या दुव्यांचा धांडोळा घेणाऱ्या या महावृक्षाच्या फांद्या ठरतात.

महानुभाव पंथाचे साहित्य उपलब्ध करून देणे, त्याचे पाठसंशोधन करून संपादने प्रसिद्ध करणे, पंचकृष्णांचे व्यक्तित्व आणि तत्त्वज्ञान यांची आचारधर्मासह मांडणी करणे हे ध्येय ठेवून डॉ. कोलते यांनी संशोधन केलेले असले तरी ते करताना जे प्रश्न आणि समस्या अनुत्तरित राहिल्या त्यांचा शोध चार खंडांतून डॉ. कोलते यांनी घेतला आहे.

पहिल्या खंडात 'महानुभाव पंथ की परमार्ग' महानुभावांची प्रार्थनातत्त्वे, महानुभावांचे दोन आम्नाय, महानुभावपंथाचे अलौकिकत्व, महानुभाव आणि जिझियाकर, महानुभाव काव्यातील काही नवीन छंद असे महत्त्वाचे शोधालेख आलेले आहेत. दुसऱ्या खंडात चक्रधरांचा निर्वाणशक आणि चक्रधराचे आचार्य कोण ? हे

महत्त्वाचे लेख आहेत . यातूनच पुढच्या काळात 'श्री चक्रधर : शेवटचे प्रकरण' १९८२ हा ग्रंथ सिद्ध झाला. याच खंडात, धवळे, वछाहरण, दृष्टान्तपाठ, रुक्मिणी स्वयंवर, भास्करभट्टाचा पूजावसर दामोदराचे पद्मपुराण, अन्वयस्थळ या संदर्भातील शोधचिंतन एकाग्रतेने व तितक्याच तीव्र बौद्धिकतेने डॉ. कोलते यांनी केलेले आहे. तिसऱ्या खंडात चक्रधर स्वामी, शेवटचे प्रकरण, श्रीमुख दृष्टान्त आणि लीळाचरित्र, महानुभाव विदुषी, कटकै, असे महत्त्वाचे लेख आहेत. काही ग्रंथप्रस्तावना संगृहीत केलेल्या आहेत आणि चौथ्या खंडामध्ये 'चक्रधर व त्याचा संप्रदाय' 'अर्वाचीन मराठी आणि महानुभाव पंथ', महानुभाव आणि महाराष्ट्र, महानुभाव प्रकाशनातील दोन दीपस्तंभ, महंत बाळकृष्णशास्त्री, महंत कारंजेकर, महंत मुरलीधरशास्त्री, महंत नागराजबाबा या आधुनिक महंतांचे कार्यकर्तृत्व विशद केले आहे आणि दोन उद्‌घाटनपर भाषणेही या ग्रंथात आहेत. या चारही खंडात (१) चक्रधर विषयक (२) संप्रदायविषयक (३) लीळाचरित्रविषयक (४) आचार्य महंतविषयक (५) संहिता-विषयक असे वर्गीकरण करता येते. मूलगामी शोधवृत्ती आणि परस्पर विचारमांडणी हे या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. लीळाचरित्रातील आणि धवळ्यातील एका एका शब्दासाठी समग्र शोधनिबंध सिद्ध झालेला आहे. यावरून डॉ. कोलते यांची ज्ञानतृष्णा लक्षात राहते.

श्री. चक्रधर शेवटचे प्रकरण या संदर्भातील डॉ. कोलते आणि डॉ. सुरेश डोळके यांचे सत्यशोधनाचे प्रयत्न कसे अटीतटीचे असतात आणि संशोधकाची ज्ञानतृष्णा कशी पराकोटीची असते. यांच्या वादप्रवादात्मक ग्रंथातून दिसून येते, त्यामागे असते ती निखळ ज्ञानतृष्णा यात शंका नाही.

ताम्रपटांच्या आणि शिलालेखांच्या संशोधनाने डॉ. कोलते यांच्या संशोधनास एक नवा आयाम मिळाला आहे. पाठसंशोधनात साधनचिकित्सा म्हणून एक उपविभाग मानला जातो. त्यात लिपीविचार महत्त्वाचा ठरतो. डॉ. कोलते यांनी लिपिविन्यासशास्त्राच्या साह्याने प्रवरसेनाचा ताम्रपट, वजीरसेनचे दोन ताम्रपट, चालुक्तनृपती विजया दिव्याचा ताम्रपट, नेसरी आणि झरिका येथील ताम्रपट यांचे वाचन करून त्यांचा स्थळकाळनिर्णय करून ते प्रसिद्ध केले. ताम्रपटांप्रमाणेच शिलालेखांचेही वाचन संशोधन डॉ. कोलते यांनी केलेले आहे. डोंबिवलीचा शिलालेख, पवईचा शिलालेख, पारंड्याचा शिलालेख, रोहिणखेड हिस्सेबोराळ आणि मलकापूर येथील शिलालेखांचे वाचन, संपादन, संशोधन आणि प्रकाशन डॉ. कोलते यांनी केले ते मूलतः मराठी भाषेची प्राचीनता आणि मराठी साहित्याची मूलभूमी शोधण्याच्या प्रेरणेतून केलेले आहे. यातूनच त्यांच्या 'महाराष्ट्रातील काही शिलालेख आणि ताम्रपट १९८७ साली' हा ग्रंथ सिद्ध झाला. रोहिणखेडच्या शिलालेखाच्या अभ्यासासाठी चिंतन करीत

अनुक्रमणिका

असतानाच 'प्राचीन विदर्भ व आजचे नागपूर' यांचे संशोधन सुरू असलेले दिसते. त्यात विदर्भाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, विदर्भातील प्राचीन कवी, प्राचीन रोहिणखेड, लोणार, मेहकर, वाशीम, कारंजा, वाई, कुंडिनपूर, केळझर, पवनार, पौनी यांचे प्राचीनतम वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

'मराठीच्या अस्मितेचा शोध' आणि इये मराठीचिये नगरी', या दोन्ही ग्रंथांतून मराठी भाषाविषयक चिंतन अत्यंत तळमळीने डॉ. कोलते यांनी केलेले आहे. 'मराठी दीपिका' पासूनच भाषिक अभिमान व्यक्त झालेला होता व त्यांच्या या विचारसूत्रात सातत्य होते. त्यासाठी त्यांनी समाजमन तयार केले. मराठी अस्मिता जागृत केली आणि मराठी विद्यापीठाची मागणी ही शासनदरबारी नोंदविली. या चिंतनातून बहुजन समाजांच्या उत्थानासाठी त्यांनी जे जे प्रयत्न केले त्यांपैकी हा एक महत्त्वाचा प्रयत्न ठरतो आणि भाषिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी पूर्ण हयातभर प्रयत्न केलेले दिसतात.

'स्नेहबंध', 'वेचलेले कवडसे' आणि 'धन्यतेची थाप', हे संशोधनात्मक ग्रंथ नसले तरी त्यातून डॉ. कोलते यांची प्रसन्न वृत्ती लक्षात येते. 'स्नेहबंध' मधील लेखांतून त्यांच्या संपर्कातील व्यक्तींचे, स्नेह्यांचे, गुरूंचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. 'साहित्यसंचार' मध्ये आधुनिक नाटक, कादंबरी, कथा यांचा परामर्श घेतलेला आहे. इतकेच नव्हे तर 'संगीत सौभद्र' या नाटकाच्या प्रयोगाला शंभर वर्षे झाली त्या विषयीही विस्तृत लेख त्यांनी लिहिला कारण शंभराव्या वर्षातील हा प्रयोग नागपूर मुक्कामी झाला होता.

आपल्या जन्मभूमीविषयी, कर्मभूमीविषयी आणि मातृभाषेविषयीचा नितांत आदर डॉ. कोलते यांच्या सर्वच ग्रंथलेखामागील प्रेरणास्तोत्र आहे. त्यांचे आत्मचरित्र म्हणजे विदर्भातील शंभर वर्षांचा सांस्कृतिक आणि सामाजिक दस्तऐवज आहे. उत्तुंग हिमालयासारखे संशोधन करणाऱ्या विदर्भातील संशोधकांच्या परंपरेतील डॉ. वि.भि.कोलते हे एक महत्त्वाचे लेखक संशोधक ठरतात. चतुरस्रता हा त्यांच्या लेखनाचा गुणधर्म असला तरी ते स्थिरावले ते महानुभाव साहित्य संशोधनात ! महानुभाव साहित्याचे आधुनिक म्हाइंभट्ट असेच त्यांना म्हणता येईल !

- उषा देशमुख

■■■

अम्लान अनुभवांचा परिसस्पर्श :
प्रकाश नारायण संत यांचा 'लंपन'

● डॉ. आशा सावदेकर

१९६४ पासून सत्यकथेसारख्या प्रथितयश नियतकालिकामधून प्रकाश नारायण संत यांनी कथालेखनाला सुरुवात केली. ती कथा वाचताना सारखे जाणवत होते की ही कथा रूढ चाकोरीत बसणारी कथा नाही. त्यात कथन आहे ; पण कथापणात ललित लेखन इतके विरघळून गेले आहे की मनात संभ्रम निर्माण व्हावा की हे ललित लेखन की ही कथा. प्रकाश नारायण संत हे कलात्मक निर्मितिशीलतेचा अभूतपूर्व वारसा घेऊन जन्माला आलेले आहेत. एक विलक्षण ताजेपण आणि कोवळेपण घेऊन त्यांचे लेखन फुललेले आहे. एक लोभस टवटवीतपणा घेऊन त्यांचा 'लंपन' हा नायक बाल्य, किशोर, कुमार अशा अवस्थांमध्ये मनाचे सूक्ष्म तरंग प्रकटवीत वाढताना दिसतो. 'वनवास' (१९९४), 'शारदा संगीत' (१९९७) आणि 'पंखा' (२००१) अशा तीन संग्रहांमधून या लंपनकथा येतात. पौगंडावस्थेत होणारे त्याच्या भावस्थितीतील सूक्ष्म बदल तर ह्या कथांमधून दिसतातच पण सामाजिक आणि सांस्कृतिक कालभानावर वेगळ्या शैलीतून प्रकाश टाकण्याचे कार्य ह्या कथा करतात. 'लंपन'चे मन गोठवून कालातीत होते आणि एक 'मॅड' विश्व चलच्चित्रपटासारखे आपल्या डोळ्यासमोरून सरकत जाते. छोट्या छोट्या अनुभवांना अम्लान आणि अनाघ्रात अशा भाबड्या भावनांचा परिसस्पर्श होताच ते द्विजन्म पावून झळझळतच कथेत उमटतात. त्यातील तपशील साधे आणि मोजके असले तरी या परतत्त्वस्पर्शाने ते खऱ्या अर्थाने 'प्रसरणशील' बनतात. त्यात वापरलेली बेळगावकडची,

दोन भाषांच्या संमिश्रणाने लवचीक बनलेली बोली त्या रम्यधूसर भावविश्वाला वेगळाच रंग देऊन जाते ; व जन्मजात गोड अनुभूतीचे एक वेगळेच रसायन या ललितकृतींमधून प्रत्ययास येते. त्या कथेला घटना-प्रसंगाचे वावडे नाही ; पण ती फक्त त्यात गुंतत नाही. घटनाप्रसंगाची उतरंड रचत बसण्यापेक्षा त्यांना वळसा घालून आंतरिक मानससाक्षात्काराकडे अलगद अंगुलिनिर्देश करणे हे तिचे सत्त्व आहे.

प्रकाश संतांच्या कथेतील निवेदक-त्याला अनुरूप असे निवेदन, त्यातील रस, रंग, गंध, स्पर्श संवेदनांचे विश्व आणि वेगळी अशी प्रतिमासृष्टी ही लेखकाच्या प्रयोगशीलतेमधील महत्त्वाची अंगे आहेत. हे निवेदन म्हणजे बाल्य व तारुण्य यांच्या सीमारेषेवरील सगळ्या अनुभवांचे अंतर्नाद नोंदविणारे विश्व आहे. ते एकसुरी, एकस्वरूपी नाही. नाट्यपूर्ण संवादात्मकतेची जोड लाभलेले लंपनच्याच तोंडून अवतरलेले निवेदन ही त्या विश्वाची कळ आहे. त्या अनुभवांचा रंगच ताजा आणि कोवळा राहिला आहे तो याचमुळे. 'वनवास' संग्रहातील 'ओझं' या कथेची सुरुवातच या निवेदन वैशिष्ट्याच्या दृष्टीने निरखून पाहण्याजोगी आहे.

शाळेतला शेवटचा तास चालला होता. सगळ्यांच्याच पोटात कावळे ओरडायला लागले होते. कधी कधी शाळेच्या शेजारी असलेल्या झाडावर चाललेला कावळ्यांचा दंगा हा आमच्या पोटातूनच आल्यासारखा वाटायचा. .. हेडमास्तर म्हणजे हेडमास्तरच असल्यानं ते शाळेतून बाहेर पडायच्या दारासमोरच हातातली ती मॅड छडी आपल्याच पायावर आपटत उभे होते. त्यांचं सर्वांवर बारीक लक्ष असतं. हे सर्वांनाच माहीत असल्यानं रडण्याचे आणि ओरडण्याचे आवाज जोरात येत नव्हते. माझ्या शेजारी बसलेला कणबर्गी गंग्या मला हळूच म्हणाला, "शिवाजी महाराज जरी आपल्या वरगात असते तरी त्यास्नी या वर्गातसून अजाबात पळून जाता आलं नसतं. फाटकात मास्तरास्नी अलगद घावले असते." (वनवास : पृ.१) पण पुढे लंपनला महाराजांनी पळून जाण्यासाठी बोलवलेले मिठाईने भरलेले पेटारे दिसू लागतात. भुकेबरोबरच घराची, स्वयंपाकखोलीची आठवण येते. वास, स्पर्श, चव अशी संवेदनाची छोटी छोटी विश्वे एकातून एक निर्माण होणाऱ्या वर्तुळांसारखी फिरू लागतात. त्यातील प्रतिमाही लंपनच्या भावविश्वाशी घट्ट चिकटलेल्या असतात. लहान भावंडाची आठवण आलेला लंपन म्हणतो--- "दुधाच्या कपात साखर घालून ते ढवळून झाल्यावर एक लहानसा खळगा पडतो ना, तसा एक छोटा खळगा मनीच्या गालावर हसताना पडायचा." (वनवास : पृ.५) आईच्या मायेची उबदार दुलई त्याला सारखी आठवते.

प्रकाश संताच्या या विश्वात सर्वांत महत्त्वाची संवेदना कोणती असेल तर ती गंधसंवेदना. लंपन वासाबद्दल खूप खूप सांगत राहतो. त्याला आईने छातीशी घट्ट धरल्यावर

येणारा तिच्या 'पदराचा वास' आठवतो. आई घरात येऊनही तिच्या मैत्रिणींच्या आणि धाकट्या भावंडाच्या वाट्याला जास्त येते तेव्हा त्याला 'हे सगळे लोक माझ्यापासून आगगाडीच्या रुळासारखे दूर दूर जात आहे...' असे वाटत राहते. लंपनच्या कोवळ्या विश्वाची वेदनाही खूप धारदार नसली तरी त्याच्या गालावर पडणारा आईच्या डोळ्यातील पाण्याचा थेंब त्याला दिलासा देऊन जातो. लंपनच्या त्या विश्वात आई, बाबा, भावंडे यांच्या दूरतेची वेदना आहेच. आजी आजोबा यांची माया त्याला मिळते पण त्याच्या विश्वातील 'आदम'चे स्थान असणारे बाबा आणि आदिदेवता 'ढाणाई'सारखी आई त्याला हवी आहे ; ती असोशी त्याला सोडत नाही.

त्याची मैत्रीण सुमी त्याला भेटली की मात्र त्याच्या संवेदनविश्वात डोळ्यांना खूप महत्व प्राप्त होते. 'वीज' या कथेत ती डोळ्यांची जादू मूर्त होते. "...समोर बसलेली सुमी मधूनच माझ्याकडं पाहत होती. तिनं माझ्याकडं पाहिलं की तिच्या डोळ्यात दोन लहानसे दिवे दिसत होते... मध्येच ती माझ्याकडं पाहून डोळे वटारत होती आणि मध्येच ते तिरपे करत होती... मध्येच ते मिचकावत होती. खरं म्हणजे मला काही समजतच नव्हतं... पाण्यात उडी मारल्यावर खाली गेलं म्हणजे कसं वाटतं तसं वाटत होतं सारखं सारखं." (वनवास : पृ ३५) कथेच्या शेवटी विजेला भ्यालेल्या लंपनला त्यालाच शोधायला आलेली सुमी दिसते. "... मी मॅडसारखा सुमीकडं पाहतच राहिलो. पहिल्या-पहिल्यांदा सुमी माझ्याकडं अगदी टक लावून पाहत होती... पण नंतर नंतर ती सारखी सारखी दुसरीकडं पाहायला लागली..." (वनवास : पृ.४१) त्या कथांची भाषा, विशिष्ट शब्द निवेदकाच्या भावविश्वाशी सुसंबद्ध आहेत. जसे आजोबा लंपनला एखादी गोष्ट 'एकोणीस गुणिले एकोणीस अधिक एक' वेळा सांगतात. घराचे 'दरवाजेबुवा' उघडे असतात ; इत्यादी.

'अर्थ' सारखी कथा तर एक विलक्षण अलवार अनुभव समूर्त करते. लंपन सुमीकडे जातो तेव्हा ती आरशासमोर उभी राहून गाणे गुणगुणत केस विंचरत असते. ती सुमी छान दिसते आहे अगदी "गोष्टीतल्या राजकन्येसारखी. तिचे ते सोनेरी केस... किती छान !" असे लंपनला वाटत असतानाच त्याला भास होतो - 'खिडकीपलीकडं गडद निळा समुद्र आहे आणि त्यावर माझं जांभळं जहाज नांगरून पडलं आहे. मी सोनेरी केसांच्या राजकन्येला सोडविण्यासाठी या किनाऱ्यावरील घरात शिरलो आहे.' आजीआजोबांना कारण सांगताना मात्र तो सुमीला एका शब्दाचा अर्थ विचारायला गेलो होतो असे सांगतो. तो शब्द आजीसमोर उच्चारताच मात्र आजीचे तोंड सुरू होते, आजोबांचा आवाज नसतो आणि लंपनचे डोळे रडून रडून दुखायला लागले आहेत, घसा पण दुखायला लागला आहे. ही संपूर्ण कथात पौगंडावस्थेतील नव अनुभवांची चाहूल देणारा अनुभव

सूक्ष्मपणे कोरताना दिसते : सगळे विश्वच इथे लंपनच्या डोळ्यांनी टिपलेले आहे. म्हणून निसर्गही भव्य रूपात दिसत नाही, शेतेही भव्य दिसत नाहीत. चिमुकल्या चौकोनांसारखी दिसतात. 'कुणीतरी येऊन लहान कप्पे कप्पे पाडून गेल्यासारखी ती शेतं.' त्या शेतांच्या काठावर दिसणारा बेडूक लंपनला शाप मिळालेल्या राजपुत्राची आठवण करून देतो. आईवाबांकडे मोठ्या गावात जाऊन लंपन टारझनचा सिनेमा पाहून येतो मग झाडांवर झुलताना टारझनचेच विश्व अस्तित्वात येते.

शाळेचे वर्णन करताना लंपन शाळेच्या वासाचे वर्णन करतो. "कालचे पोरांचे सगळे वास रात्रभर भिंतीत आणि वर्गातल्या जमिनीत विरघळून गेल्यासारखे. रोजरोज अशा वासांचे थरच्या थर शाळेच्या भिंतीवर आणि जमिनीवर बसत असणार. त्यातले ते वास सकाळी प्रत्येक वर्गात उदबत्तीतून बाहेर पडणाऱ्या धुराप्रमाणे हळूहळू बाहेर पसरत असणार..." (वनवास : पृ.१०५) झाडाखालचा 'पानांचा, बाळचिंचासारखा आंबूस वास', तळ्यापलिकडच्या वाऱ्याने आणलेला 'एक खूप खूप जुना वाटणारा, हिरवा वास...' यातून लंपनची गंधदुनिया प्रकटते. बाबांच्या खोलीतले 'नव्या -जुन्या पुस्तकांचे, अत्तराच्या बाटल्यांचे सिगरेटच्या पाकिटांचे' वास त्याला आठवतात. 'सगळ्यांचा मिळून एक वास --- बाबांची आठवण आणणारा' सहलीला गेलेल्या लंपनला तिथला वास 'हिरव्याच रंगाचा असावा' असे वाटते. 'त्या हिरव्या रंगाच्या वासातूनही सुमीच्या केसांतील सोनटक्क्याच्या फुलांचा वास येत होता. खरं तर त्या सर्व हसण्याला आणि ओरडण्याला सोनटक्क्याच्या फुलांचा वासच असावा, असं वाटत होतं.' (वनवास : पृ.१४७)

तारुण्याच्या उंबरठ्याखाली समज हळूहळू दर्शविण्यासारखी झालेली मनाची अवस्था आणि 'हळूहळू काहीतरी समजल्यासारखे वाटणे' इथे स्मरणसाखळीतून जाणवत राहते. म्हणूनच ही कथा बालकथा नसते किंवा नुसती मानसशास्त्रीय पिंजण मांडणारी कथाही उरत नाही. एका टप्प्याकडून दुसऱ्या टप्प्याकडे जाताना कोवळ्या संवेदनांच्या आंतरिक व सूक्ष्म घडामोडींचा वेध घेणारी ही कथा आहे. त्यात केवळ कथन येत नाही; संवेदनानुभूतींचे त्याच वयातील डोळ्यांनी घेतलेले ते दर्शन आहे. म्हणूनच कथेची लवचीकता लक्षात घेऊन ललित बंधामध्ये महत्त्वाचे ठरणारे संवेदनांचे विश्व प्रकाश संतांनी आपल्या कथेत विरघळवून घेतलेले दिसते. 'आदम' कथेत ढाणाईच्या देवळात आईबाबांबरोबर गेलेला लंपन बाबांच्या बोलण्याने भारावलेल्या अवस्थेत देवळाच्या गार भिंतीवर हात ठेवून चालत राहतो. तिचे टोचणारे खडबडीतपणही त्याला छान वाटते. इथे स्पर्शसंवेदनेपेक्षा शारीरमानस गुंतागुंतीचे अनुभवांचे रूप जाणवत राहते. कमी प्रकाशात दिसलेले ते देवीचे डोळे लंपनला बाबांचे पत्र वाचतांनाही आठवत राहतात.

'समज' कथेतील सुंदर केसांची तुंगभद्रा गॅलरीत येऊन उभी राहिली की त्याच्या शाळेत असलेला क्रिकेटचा कॅप्टन असलेला केबी लंपनकडे येतो. त्याचे रहस्य शेवटी त्याला कळते आणि स्त्रीपुरुषसंबंधाचे नवे स्वप्निल आकलन लंपनच्या मनात पाझरू लागते. प्रकाश संताच्या कथेत घटनांपेक्षा अनुभवांची गुंफण महत्त्वाची असते ; जिला अनुभवरचनेच्या आतूनच स्फुरलेला एक विलक्षण आकार असतो. ही एक कथामालिकाच आहे; जिचा नायक एकच आहे. पण अनुभवाच्या नवनव्या परिसरात, वेगवेगळया व्यक्तींच्या संपर्काने तो अधिकाधिक वेगळा भासतो. त्याच्या व्यक्तित्वाभोवतीचे आंतरिक, भावनिक, कौटुंबिक, सामाजिक आणि सांस्कृतिक थर पापुद्र्यापापुद्र्याने हळूहळू उलगडत जातात आणि समोर उभे राहाते ते अनुभवाचे निखळ, नितळ, सोलीव रूप जे शब्दांच्या चिमटीत पकडणे विलक्षण अवघड काम आहे.

'शारदा संगीत' (१९९७) या दुसऱ्या संग्रहात कथेचे रूप दीर्घ झालेले दिसते. आता लंपनचे भावविश्व मर्यादित उरले नाही. ते आता गतिशील कंपनांच्या रूपात जाणवते आहे. लेखक त्या संग्रहाच्या प्रास्ताविकात म्हणतात - "नाद, गंध, रंग आणि स्पर्श अशा विविध माध्यमातून त्या वयातील मुलाच्या नव्या कोऱ्या मनाला भिडणारे हे पहिले, वहिले अनुभव आणि त्यातून उमटणारी अतिसूक्ष्म संवेदनांची ती धावती वलयं. मनात खोल कुठेतरी झिरपून राहिलेलं हे सर्व कधीतरी अचानकच वरती उफाळून आलं आणि येतच राहिलं. त्याच्या त्या स्वतःच्याच अशा गतीनं माझ्या मनात चित्तवृत्ती उल्हासित करणारी एक स्पष्ट अशी गुंज सुरू झाल्यासारखी झाली."

सरस्वतीच्या हातात कायम दिसणाऱ्या त्या वीणेचा आवाज कसा असेल हा एक मला लहानपणी सतावणारा प्रश्न होता. आता असं वाटतं, की मला ऐकू येणारी गुंज त्या झंकाराच्या जवळपास जाणारी असेलही.

ती गुंज शब्दांत पकडणं, तिची सरगम करणं तसं कठीणच. पण प्रयत्न करून पाहायला हरकत नव्हती.

तर असं हे 'शारदा संगीत.' (प्रास्ताविक : पृ. ८)

प्रकाश संत यांना जाणवणारी ही गुंज वेगवेगळ्या पातळीवरील आहे ; आणि महत्त्वाचे म्हणजे ती फक्त गोड गुंज नाही. त्यात वास्तवाचे करालपण आहे, सुंदर अनुभवाला चिकटून येणारी कुरूपता दाखवण्याचे बळही आहे आणि फसवणुकीचे, लबाडीचे वेगळे जगही आहे. आता गंधाचे जगही विशाल झाले आहे, ते व्यक्तिगत उरले नाही तर निसर्गात सामावले आहे. 'क्लासशेजारी चंब्या कुळकर्णीच्या घरातल्या चाफ्याच्या झाडावर एकतीस हजार फुलं फुलली होती. त्यांचा वासच या रस्त्यावरच्या

उन्हाला येत होता.' (शारदा संगीत : पृ. १८) 'परचक्र' कथेमधली चोरी, फसवणूक म्हणजे लंपनचे रखरखीत वास्तवात पडलेले पहिले पाऊल आहे.

जे आगगाडीचे जग मायेचे उबदार जग होते तेच जग लंपनला क्रौर्याचे, वेदनेचे दर्शन घडवते. आईबाबांनी हलवलेले हात आगगाडीचे वाटणाऱ्या लंपनला रेल्वेगेटजवळ भाजी विकणारी शेवंता भेटते. तिला वाचायची आवड आहे. सासरी सगळे अंगठेबहाद्दर. मग आजी शेवंताला घरकामाच्या निमित्ताने बोलावते आणि पुस्तकाच्या जगाशी तिची जवळीक घडवते. पण तिचा सासरा-नवरा दारूसाठी वारंवार पैसे मागायला तिथे येतात म्हणून शेवंता लंपनकडे येणे बंद करते. एका अपघातात पुलावर पडलेला गुढघ्याखालचा पाय लंपनला दिसतो. त्यातील जोडवी, मासोळी, साखळी तो ओळखतो. गेटवरचा रामगुंडा त्याला सांगतो - "...आगगाडीच काय ? ती येणार - जाणार. माणसाच्या मर्जीवरच तिचं सगळं. आपलं काय ते आपनच ठरवायचं बाबा." लंपनच्या रुळाबद्दलच्या, सुंदर कल्पनांना पहिला तडा जातो. मग पुढे गाणे म्हणणाऱ्या कुसुमशी त्याची मैत्री होते. रुळावरून तो तिच्या घरी गाणे शिकवायला जातो ; पुढे तिची पत्रे पोचवतो, तीच गाडी तिला तिच्या प्रियकराबरोबर दूर घेऊन जाते. तिचे लंपनला पत्र येते- "माझ्या आयुष्याचा तालही मला या रुळांमुळंच सापडला.मी आनंदानं या नव्या तालावर चालत राहीन." लंपनच्या कितीतरी आठवणी रुळांशी जडलेल्या. 'आवाज आणि वासांसकट'; कथा पोटात घेतलेल्या ललित लेखनासारखी ही कथा भासते. लंपनला उखाण्याचा अर्थ सांगताना आजी म्हणते-

आगगाडीच्या रुळांवर उदबत्तीचा वास
उदबत्तीचा वास
पमीचा नवरा मॅट्रीक पास
मॅट्रीक पास

---अशा उखाण्यांना काही अर्थ नसतो. तर आई त्याला समजावते "...आगगाडी आणि आगगाडीचे रूळ म्हटल्यावर तुझ्या मनात खूप विचार यायला लागतात की नाही ? निरनिराळ्या आठवणी यायला लागतात. .." लंपनला ते पटते. लहान गावातल्या साध्या सरळ आयुष्यांच्या रेषांना दुःखाच्या, वेदनांच्या, सुखाच्या कितीतरी रेषा मिळालेल्या त्या ठळक आठवणी आणि त्यांना जोडणारे अनुभवांचे सूत्रबद्ध रूप अशी ही मांडणी आहे.

'रानी का बाग' कथेतही साध्या चित्रांचा खोक्यातला सिनेमा प्रत्येक वेळी वेगळा भासतो तसे अनुभवांचे रूप- कॅलिडोस्कोपसारखे लंपनला दिसत राहते. चंब्याची बाग, त्यातून 'विठ्ठल विठ्ठल' असा येणारा आवाज, चंब्याच्या मागल्या अंगणातील विहिरीचे

अनुक्रमणिका

पाणी, तिथले डोंगरी आवळे असे हे अनुभवांचे सरकते विश्व. 'डोके पिंजल्यासारखे' वाटायला लावणारे.

'घसरगुंडी' मध्ये घसरगुंडी हेच विविध अनुभवांचे केंद्र आहे. त्यावरून मनीचे 'परीसारखे' घसरणे तर बिट्ट्याचे 'वाऱ्याने इकडं तिकडं हलणाऱ्या फुला'सारखे. पावसाचे पाणीही घसरगुंडीवरून घसरत असणार अशी कल्पना करून लंपन म्हणतो -- "..पोरांच्याप्रमाणंच पुन्हा पुन्हा घसरण्यासाठी आकाशात जात असणार की काय ? तसंच काहीतरी असणार. पाण्याची घसरगुंडी मस्तच." घसरगुंडी हे इथे प्रतीकच बनलेले. कधी ती चंद्राच्या प्रकाशात रुपेरी दिसते. भर उन्हात ती एकटी 'दोन्ही हात जमिनीला टेकून बसलेली दिसते.' तिच्यावरची बिड्यांची थोटके, गुंड मुलांचे पत्ते खेळणे, वास्तवाच्या रखरखत्या उन्हाचा प्रत्यय देते. लंपनने मात्र घसरगुंडीची सांगड म्हापसेकर मास्तरांनी मुलतानी वाजवून घेतला त्या अनुभवाशी घातलेले. '...त्यातले ते स्वर हार्मोनियममधून येताना मला असंच काहीतरी वाटलेलं. आपण हवेत घुसलेल्या त्या स्वरांच्या बरोबरच तरंगत तरंगत वर उंच उंच जात आहोत. पण नंतर हलकेच खाली येणार आहोत अलगद... अगदी तसंच वाटलेलं. चांदण्यात त्या रुपेरी गुंडीवरून घसरताना म्हणजे वर जाताना.'

(शारदासंगीत : पृ.११६)

'शारदासंगीत' ही या संग्रहातील शेवटची कथा. ध्वनींची कथा; ऐकलेल्या, न ऐकलेल्या. लंपन म्हणतो- "पेटीतून येणारे आवाज मला ओळखीचे, माझ्या मित्रांसारखे वाटत होते. त्या आवाजांचा एखाचा झराच वाहत आहे आणि त्यातले शिंतोडे आपल्या अंगावर उडत आहेत असं मला वाटत होतं." (शारदासंगीत : पृ.१३०) मास्तर वर्गात सतार घेऊन येतात त्या वादनाने --- "माझ्या डोक्यावर एक भिजलेलं झाड आहे आणि वाऱ्यानं त्याच्या फांद्या हलल्यानं त्या झाडाच्या पानांवरून सातशे पाण्याचे थेंब अचानक माझ्या अंगावर पडत आहेत असं मला वाटतं." (कौव : पृ. १३१) असा अनुभव लंपनला येतो. सगळे राग शिकतांना लंपनच्या डोळ्यापुढे काही दृश्ये उभी राहतात. ते जणू काय त्या रागाने आवाहन केलेल्या भावनांचे मूर्त रूपच आहे. यमन राग वाजवताना त्याला वाटते, - "दूरपर्यंत काळवंडलेलं सपाट मैदान आहे. रात्र झालेली आहे आणि एकदम मोठ्ठाच्या मोठ्ठा केशरी चंद्र त्या मैदानाच्या कडांवरून हळू हळू वर येतो आहे." (तत्रैव पृ. १३०) वसुधा होळेकरी त्याला सांगते की, "पावसाची सर इकडून तिकडं जावी" तशी तुझी बोटे फिरतात. तर वसुधाचे पेटी वाजवणे लंपनला 'झाडांच्या खोडांवरून तुरुतरु धावणाऱ्या मुंगळ्यांसारखी' धावताना भासावे तसे दिसते. तिथेच त्याला अनुभव येतो तरुणांच्या गुंडगिरीचा आणि बारक्या पोरांच्या सहकार्यांचा. दोन्ही टोकांच्या अनुभवांनी

लंपन अधिक वाढतो, समृद्ध होतो.

'पंखा' (२००१) हा प्रकाश नारायण संत यांचा तिसरा अगदी अलिकडे प्रकाशित झालेला कथासंग्रह. यातील काही कथाच फक्त दीर्घावलेल्या आहेत. असे का घडले असावे याचा विचार केला तर लक्षात येते की अनुभवांचा गोफ जिथे जटिल रूप धारण करतो तिथे ह्या कथा नेहमीपेक्षा दीर्घ झालेल्या आहेत. लंपनची येथील वाढही फक्त वयाच्या टप्प्याची नाही ; ती आंतरविश्वाशी संबंधित आहे. कुठल्या तरी एका सर्वसामान्य अनुभवाशी नवा वेगळा अनुभव जोडत जाण्याची किमया प्रकाश संतांनी 'शारदा संगीत' मधील दीर्घकथांमध्ये घडवली होती. 'पंखा' मध्ये एकाच अनुभवाला चिकटून येणाऱ्या भिन्नरूपी अनुभवांकडे लेखकाने आपले लक्ष वेधलेले दिसते. 'पंखा' मध्येही संवेदनांनी गजबजलेले विश्व आहे, तीच 'मॅड' भाषा आहे, त्यालाच शोभेल अशी शैली आहे आणि दर्शन, श्रवण, स्पर्श, गंध यांनी विनटलेली प्रतिमासृष्टी आहे. 'भोपळ्याच्या फुलांसारखं पिवळंधमक ऊन' आहे, सगळीकडे पसरलेल्या उन्हाला आणि 'चमकणाऱ्या भिजलेल्या पानांना कसला तरी छान वास' येतो आहे. सुमीच्या तोंडी येणारा 'चावट' शब्द आहे ; ज्याचे नाते पुढे आजीशी जुळते आणि तोच शब्द उच्चारून लाजणाऱ्या स्त्रीला काय म्हणायचे आहे ते लंपनच्या विश्वाला हळूच आत शिरताना दिसते. ही कथा म्हणूनच अनुभवाच्या अंगानेही खळखळणाऱ्या झऱ्यासारखी ललितबंधाचे रूप स्वतःत मुरवून वाहताना दिसते. 'पान' सारखी कथा म्हणूनच नाजुक भावनांचे दर्शन घडते.

...पुढचं काही सुचायच्या आतच मागून 'फलक फलक' असा आवाज आला आणि माझे डोळे मिटले. म्हणजे कुणीतरी हातानं झाकले. कुणी म्हणून विचारायचं कामच नाही. एकाच वेळी एकशे अकरा लोकांनी माझे डोळे झाकले तरी त्यातले सुमीचे हात मी केव्हाही ओळखून दाखवेन. शिवाय आणि तो कपड्यांचा आवाज ! पण सुमीला एकदम ओळखलेलं आवडत नाही. म्हणून मी म्हणालो,

"आज्जी.."

"अं..हं!"

"आजोबा.."

"अऽऽहं."

"बाबूराव..." मी मुद्दाम म्हणालो.

बराच वेळ "अं...हं.." ऐकू येईना आणि हातही डोळ्यांवरून निघेना. सुमी रागावली असणार.

खरं म्हणजे मला ते सहजच काढता आले असते. पण तसेच छान वाटत होते.

(पंखा : पृ. ६)

सुमाने "चावट कुठला !" असे म्हटले आणि आजोबांचा वारंवार उल्लेख केल्यावर आजाही "चावट" म्हणते. मग लंपनला 'मस्तच वाटलं.'

'सफाई' या कथेतही बाबूराव मधील बदल टिपणारा वाढाळू वयाचा लंपन आपल्याला दिसतो. त्याला आलेली कानडीतील पत्रे ; अत्तर, इस्त्रीचे कपडे असा थाट ; 'चाळीसदा' भांग पाडणे यामुळे आजीला 'बाब्याचे लक्षण ठीक नाही' असे वाटू लागते. मग बाबूरावबरोबर 'गोरिपिट्ट' बाई दिसते. गावातले लोक त्यांना 'राघू-मैना' म्हणू लागतात. मग एक दिवस बाबूराव घरातून नाहीसा होतो. खूप दिवसांनी मळक्या कपड्यांनी घरी परततो, आजी आजोबांच्या पाया पडतो; आणि घरातला एक होऊन जातो. लंपन मात्र स्त्रीपुरुषसंबंधातील फसवणुकीच्या काळ्या बाजूचा ठसा मनावर उमटवून घेत एकदम मोठा होतो.

'डग' कथेमध्येही दुंडाप्याचा मोडका टांगा, त्याच्या एका चाफ्याने सतत हलणे असा अनुभव येतो. जो दुंडप्याच्या दारिद्र्याशी जुळलेला आहे. लंपनला ते आवडत नाही. आजोबा मात्र त्याला सांगत राहतात की "टांगा कसा दिसतो यापेक्षा टांगेवाला कसा आहे ते महत्त्वाचं असतं." त्यांच्या मते टांगा 'भुक्कड' असला तरी टांगेवाला 'फक्कड माणूस' आहे. लंपनच्या वर्गातला सण्ण्या हा दुंडप्पाचा पोरगाच असतो. त्याच्या माळ्यावर बसून लंपनने 'वीरधवल' वाचलेले. त्याच तबेल्यात नेहमीच्या घोड्याबरोबरच एक म्हातारा लंगडा घोडा आहे. सण्ण्या म्हणतो- 'ओट्याला आज्जा बसतोय तसा तबेल्यात हा मोतीसाब' टांग्याचे वाशिंग करायला जाताना मोडक्या टांग्यावर पाच माणसे आणि दोन घोडे यांचे पोट आहे हे साहेबाला माहीत आहे असे म्हणून चांगले कपडे घालून, टांगा सजवून 'झॅकपॅक करून साहेबाला बटर मारायचं.' हे दुंडप्पाचे तत्त्वज्ञान आहे. एका आजीबाईकडून टांग्याचे भाडे दुंडप्पा घेत नाही. त्याचेही एक तत्त्वज्ञान आहे.

"म्हाताऱ्या माणसाचं डोकं जुन्या टांग्याच्या चाकासारखं असणार सोडा. जरा डग मारणारच. आपणच त्यांना सांभाळून न्यायचं.. कुठे चाक सरळ फिरणार...कुठे डग् मारणार. पण डग् असली म्हणून काय कोण चाक फेकून देणार म्हटला काय ? नाव सोडा. तसंच चालविणार." (पंखा : पृ.४०) एखाद्या ललितबंधासारखे हे टांगेवाल्याचे, टांग्याचे, त्याच्या घराचे, परिस्थितीचे त्याहीपेक्षा त्याच्या फार मोठ्या माणूसपणाचे चित्र या कथेत मण्यांसारखे ओवले गेले आहे. त्यातून प्रकटते नवे अनुभवाचे ठसे उमटवून घ्यायला सज्ज असलेले लंपनचे मन. जातीपातीचे बंधन न मानणारे, तारुण्याच्या चाहुलीने अलवार झालेले आणि नवे अनुभव शोधून घेण्यासाठी एखाद्या स्पंजसारखे सिद्ध असलेले हे मन. एका निर्भर, मुक्त सखोलतेचा प्रत्यय ! लंपनच्या जाणिवेची ही सगळी घाटदार

अनुक्रमणिका

वळणे प्रकाश संतांनी सूक्ष्मपणे टिपलेली आहेत. त्यातून जडतेलाही हृदयबंधाचे बळ मिळाले आहे. झाडे, इमारती, रस्ते, पूल यातून ते प्रकटत राहते. वास्तवाच्या लख्ख दर्शनातून नवे भान येऊन होणाऱ्या गहन संस्कारांचीच ही चित्र आहेत.

सायकल चालवायला शिकणाऱ्या लंपनच्या विश्वातील वास आणि नाद टिपता टिपता 'पॅच' सारखी कथा त्याला अनुभवाची खोली प्रत्यक्ष दाखवून जीवननिष्ठ व्यवहाराची कल्पना देताना दिसते.

"ओला टॉवेल अंगाभोवती टाकावा तसा समोरून येणारा वास माझ्या अंगाभोवती कुणीतरी गुंडाळत आहे असं वाटत होतं... हिरव्यागार शेतातून येणाऱ्या किंवा उंच झाडांच्या पानातून येणाऱ्या आवाजासारखाच आवाज. माझ्या कानातूनच नव्हे तर डोळ्यातूनही येत आहे, असं वाटायला लागलेलं.." (पंखा पृ.४२) त्यातील प्रतिमासृष्टीही बालवयातील कथांनी जोपासलेल्या मनोवृत्तीतून फुललेली. सायकलवरून पडलेल्या लंपनचा अनुभव म्हणूनच असा येतो- "सीतेच्या स्वयंवराच्या वेळी रावणाच्या छातीवर ते मॅड धनुष्य पडलेलं आणि मग ते रामानं 'लील्या' की कसं ते उचललेलं हे आमच्यासारख्या सगळ्या पोरांना नीट माहीत. पाप् ते धनुष्य छातीवरून उचलल्यावर त्या रावणाला कसं वाटत असणार. ते मात्र आता कुठं मला नीटच समजलं." (पंखा : पृ. ४८)

प्रकाश संतांच्या लंपनविषयक कथांच्या यशाचे खरे रहस्य या 'लंपनशैली'त सामावले आहे. ज्यात 'दगडसाहेब', 'फुटबॉलसाहेब', आहेत; सिंदबाद, राम, रावण अशा कल्पना आहेत आणि संवेदनांची एक वेगळी दुनिया आहे. म्हणून तर कासारगोड्या दुकानाचा सायकलच्या तेलाचा रबराचा, उदबत्तीचा आणि जमिनीचा 'असा कोणता तरी एकदम नवाच वास' लंपनला येतो आणि एकदम आवडतो. त्या कासारगोडचे मन कुठल्या एलसावर बसलेले पण वडिलांचा विरोध. मग तो आपले मन या मुलांजवळ व्यक्त करतो. शेवटी मात्र मामाच्याच मुलीशी लग्न करून तो आजीच्या पाया पडायला येतो. लंपनला त्याच्याकडून कळते हे परिवर्तन त्याच्या आजीनेच घडवलेले. कासारगोड आजीबद्दल म्हणतो- "त्यांनी आमाला सायकल पंच्चर झाल्यावर आमी काय करतो ते विच्यारल्या. सगळं डिटेलवार सांगितलो." तेव्हा त्यांनी म्हटल्या, "पंचर काढताना ट्युब रबराची असणार म्हणून प्याच रबराचा असणार. सोलूशनवर पॅच मारायचं टायमिंगबी महत्त्वाचं. बरोबर का नाही ? तसंच लग्न करताना मुलगी आपल्या जाती-धर्माची असावी. आईवडिलांना समाधान असेल तर सोलूशन आणखी पक्कं होणार. मग काय भीती ऱ्हाणार नाही." बायको हाच तो कासारगोडचा 'पॅच', एकदम कडक. (पंखा : पृ. ६०)

'शोध' ही कथाही एका अलवार मानसशोधाची. लंपनची बालमैत्रीण सुमी रस्त्याने जाताना दिसते तेव्हा तो वेगळ्याच दृश्यात गढलेला असतो, रस्त्यावरील झाडांच्या जाळीदार सावल्यांसाठी रांगोळीच्या यंत्रासारखे एखादे यंत्र तर फिरवले नसेल ना अशा प्रश्नात तो गुंग. खरे तर सुमी काहीतरी शोधत असणारी. पण लंपनचे त्यावर उत्तर आहे- --"आपण पोरींना काय सापडून देत नाही." म्हणून तो तिला काही विचारत नाही. घरी आल्यावर त्याला कळते सुमीची चेन हरवलेली आहे, जी ती सारखी ओठाजवळ धरते. 'मला तरी नेहमी असं वाटतं असतं की सुमीनं दातात हलकेच पकडलेली ती चेन गळ्यातल्या चेनपेक्षा जास्तीच चांगली दिसते.' एकीकडे सगळी पोरे मंत्राची पॉवर वापरून उत्तर देणाऱ्या मित्राच्या मामाला प्रश्न विचारतात. चारशे पावले उत्तरेकडे, डावीकडे दहा मिनिटे मग तीन फांद्यांच्या झाडाच्या बुंध्याखाली सापडेल असे उत्तर मिळते. सुमीबरोबर मास्तरांकडे जाताना ती त्याला विचारते की तू काही आलास माझ्या मदतीला ? सगळे आलेत पण --- 'ज्यानं यायला पाहिजे तो येणार नाही आणि उरलेले सगळे हजर.' सुमीचे बोलणे ऐकताच लंपनला 'मॅडसारखं छान वाटायला लागलेलं.' (पंखा : पृ.७४) तिच्या हाताला लागलेले पाहून लंपन विचारतो, तिला चंपाच्या घरी आवळ्याच्या झाडावर चढण्याचे आठवते. साखळी सापडते, ते आवळ्याचे झाड 'तीन फांद्यांचे' पाहून लंपन हसायचे विसरून जातो. इथे सुमा आणि लंपन यांच्यातील भावबंध अधिक खोल झालेले दिसतात. सुमीच्या साखळीबरोबरच एका सोनेरी भावबंधाचा शोधच लंपनला लागतो.

'नाणं' या कथेतही अण्णा हिंडलगेकरांचे व्यक्तिचित्रण साकारते. एक व्यवहारी टुरिंग एजंट, त्याचा देखणा चौकोनी संसार, स्वप्नातली गाडी आणि दोन राजकन्या. एकदा त्याच्या नव्याकोऱ्या बनलेल्या गाडीतून त्यांच्या घरातल्या सर्वांबरोबर लंपनही देवाला जातो. लंपन वर्णन करतो- "त्यांच्या सुंदर कपड्यांचा छान, खरपूस वास त्या गाडीत भरून राहिला होता... सगळेच कायकाय बोलत होते. पण एकएकटे स्वतंत्रपणे बोलत होते असं वाटत होतं... माझ्या लक्षात आलं की अण्णा स्वतःच स्वतःशी काहीतरी बोलत असणार, मनातल्या मनात..." (पंखा : पृ. ८७-८८-८९) एकदा अण्णांना पेटी वाजवून दाखवायला लंपन जातो. तेही भैरवी वाजवतात "...स्क्रूड्रायव्हर, पाने, हातोड्या असलं काय काय हातात आल्यावर हाताचा मऊपणा जाणारच." असे म्हणणाऱ्या अण्णांचे वादन व्यवहारात हरवून गेलेले. निघताना लंपनच्या हातात ते चांदीचे चकचकीत जड नाणे देतात. ते चलनी नसते. त्याला बाजारात किंमत नाही. कथेतील त्या नाण्याचे स्थान मात्र प्रतीकात्मक आहे. ते कलात्मक अशा निर्भेळ आनंदाचे प्रतीक आहे. आजी म्हणते कुणाकडून पैसे घ्यायचे नाहीत. आजोबा मात्र म्हणतात की, "देणाऱ्याच्या मनात

अनुक्रमणिका

किंमतवान" असणारे ते नाणे परत केले तर अण्णांना वाईट वाटेल. अण्णा गाव सोडून निघून जातात. कथेच्या शेवटी लंपन म्हणतो--- "आजोबा म्हणाले ते अर्धंच बरोबर होतं. त्याची दुसरी बाजू मला नीटच समजलेली. ते नाणं घेणाऱ्यालाही किंमतवान वाटणारच." (पंखा : पृ. ९३) इथे प्रकाश संतांची कथा अलवार, मृदु तरीही टोकदार रूप धारण करते. कोवळ्या मनाला खऱ्या मूल्यनिष्ठांची ओळख पटण्याचा हा क्षण आहे. तो परंपरेच्या आधारावर उभा असला तरी त्याला पुढे वाहून नेणारे खांदे आधुनिक आहेत. प्रकाश संताच्या कथेला अमूर्त असा आशय मूर्त करायचा असतो, जे माहीत नाही त्याचाच अनुभव द्यायचा असतो ; हेच ह्या कलावंताचे सामर्थ्य फार मोठे गजबज असलेल्या या कथा व्यक्तीव्यक्तींमधील संबंधातील भावनांच्या गुंत्याला हात घालीत राहतात. व्यक्तीपेक्षाही लक्षात राहते ते व्यवहाराच्या रगाड्यात हरवून गेलेले हळुवार असे कलाप्रेम पुन्हा सापडले की रुक्ष, ओबडधोबड माणसेही कशी.

हळुवार होतात त्याचे दर्शन. व्यवहारापेक्षा हा कलानंद मोठा आहे. हे ठाऊक असूनही जगण्याच्या धावपळीत आता तो मिळवण्याचा विचार करणेही अशक्य असते. मग ते नाणे चलनी नसलेल्या आणि गुळगुळीत न बनलेल्या अस्सल कलासक्ततेचे प्रतीक बनते.

'पूल' या कथेतला पूलही काहीसा प्रतीकात्मक आहे. पावसाने वेढल्यावर येणारा एकटेपणा आणि त्यातून घडलेले एका वेगळ्या अनुभवाचे दर्शन हाच या कथेचा आत्मा. पावसाचे वर्णन लंपन करतो- 'कोसळणाऱ्या पावसाच्या धारा, त्यातून अंधुक दिसणारी समोरची झाडं, घरं, विजेचा खांब.. सगळ्यांचे रंग धुऊन टाकल्यासारखे. गेलेले. लाल नाही, हिरवा नाही, निळा नाही... पिवळ्याची गोष्टच सोडा ! फक्त एकच सणसणीत रंग ! सगळ्या रंगाचं भस्म करून टाकल्यासरखा रंग तो...' (पंखा : पृ. ९५) अशा जखडलेपणाच्या काळातच लंपन आजोबांबरोबर खानापूरला जायला निघतो. आपली गाडी 'चोरवाटेनं पळून जाणाऱ्या कैद्याप्रमाणे' निघाली आहे असे त्याला वाटते आणि मागचे डबे घेऊन जाणारे इंजिन 'चिन्या कामतच्या मोत्या कुत्र्यासारखे पाठ आणि कंबर हलवत निघालेले आणि मागून उरलेले डबे शेपटीसारखे वळवळत येणारे.' (पंखा : पृ. १०३) खानापूरला ज्यांच्या घरी आजोबांचे काम असते ते घर 'कुबट वासाचे' असा लंपनचा अनुभव. शेजारच्या घरी त्याच्या बरोबरीची मुले असल्यामुळे लंपनची रवानगी तिकडे होते. प्रकाशाने भरलेले रंगीत पडद्यांचे ते घर 'कुठला तरी सुंदर वास' भरून राहिलेले असे. तिथे फोनो असल्यामुळे 'बाहेरच्या पावसासारखा हाही एक गाण्यांचा पाऊस घरात पडायलाय असंच झालेलं.' त्यांच्या गच्चीवरून दिसायची वळसे घेणारी मलप्रभा नदी आणि तिच्यावरचा तो पूल. तिथे मिळालेले मित्र सुहास, विभाकर

आणि त्यांचे ते प्रकाश भरले घर यांची आठवण पुलाशी चिकटून गेलेली. म्हणून तो रात्रीही दिसत राहतो. 'नदीचे दोन काठ जोडणारा.' लंपनच्या मनातही मैत्रीचा एक पूल तयार झालेला ; त्यामुळे सगळे काही सुंदर असल्याचा भास त्याला होऊ लागतो. मनाच्या वाढीचा आणि नवे नाते जोडण्याच्या अनुभवाचे ते एक प्रतीकच ठरते.

'झांज' मध्येही एक काव्यात्म असा श्रवणानुभव गोड अशा जीवनानुभवाला चिकटून आलेला आहे. तारुण्याची चाहूल लागण्यापूर्वीच्या जगात कपडे, भांग, दिसणे यांचे निर्माण होणारे गोड आकर्षण लंपनच्या मनात निर्माण झालेले. एका लग्नाला गेल्यावर त्याला काही प्रश्न पडतात, आणि घरच्या अनुभवातून काही उत्तरेही सुचतात. त्या मूर्ताकडून अमूर्ताकडे जाण्याचा, अमूर्ताची चाहूल घेण्याचाच प्रयत्न या लेखात दिसतो. कुठले कोण खंडेराव आणि कुठली कोण कमळी आता लग्न झाल्यावर ते एका घरात राहणार. मग त्याला वाटते- "आई-बाबा किंवा आजोबा आज्जीकडं पाहिलं तर एक गोष्ट सणसणीत लक्षात येईल. ते एकमेकांशी भांडतात, रागावतात. पण नंतर शेवटी ते मित्रच राहतात. एकमेकांकडे पाहून हसत असतात. त्यांचं घर हे हसणारं दार आहे असंच कुणालाही वाटेल." (पंखा : पृ. ११९) आजी म्हणते तशा ह्या 'ब्रह्मदेवानं मारलेल्या गाठी" "आईबाबांची, आजोबा आज्जीची, तशीच ही खंडेराव-कमळीची ? मग माझीही गाठ कुणाशी तरी मारलेली असणारंच त्यानं. कुणाशी ? कोण असेल ती ? आणि कशी? कमळीसारखी ? माझे पायच लटपटायला लागल्यासारखे झाले... एवढ्यात सिनेमात नारदमुनी दिसायला लागायच्या आधी किंवा कळ लावायचं काम झाल्यावर ते नाहीसे होताना झांजेचा जोरदार आवाज होतो, तसा आवाज झाल्यासारखा वाटला. मी इकडं तिकडं पाहिलं... बँड बंद होता. मग तो झांजेचा आवाज ? माझ्या कानातनं आलेला ? की आणखी कुठून." (पंखा : पृ. ११९)

हा आवाज पुन्हा पुन्हा होत राहतो. एक गोरीपान गळ्यात मोत्यांची माळ आणि कपाळावर बिंदी अशी मुलगी समोर येते तेव्हाही घडते. फराळ करताना ती मुलगी पुन्हा दिसते. लंपनला प्रश्न पडतात. 'न हसता रोखून पाहणारे डोळे. टोकदार नाक. कोण ही? विचारायचं कामच नाही. सुमी ! मी कशी ओळखली नव्हती ? ती हसत नव्हती म्हणून? ती हसत का नव्हती ? आणि मीही का हसत नव्हतो ?" (पंखा : पृ. १२१) लंपनला जे कळत नाही ते रसिकांना मात्र कळते. होनावर आणि संप्याच्या चुलत बहिणींबरोबर तो आहे. म्हणून सुमी चिडलेली. लंपनवर आपलाच हक्क आहे हे दाखवण्यासाठी ती त्या मुलींवर चिडते. कमळीचे डोळे पुसणे पाहून लंपनला लग्न म्हणजे रडारड असते का असा प्रश्न पडतो. मग त्याला आईबाबा भेटतात. बाबा त्याला 'हँडसम' म्हणातत. 'हँडसम म्हणजे तू छान दिसतोस." असे म्हणणारी सुमी, तिचे कान लाल झालेले आणि 'ती

झांज पुन्हा एकदा कानात वाजल्यासारखी झालेली. लंपन आणि सुमी यांच्या आरस्पानी जगात जागृत झालेल्या कोवळ्या भावना आणि नवखे आकर्षण यांचे हे अलवार दर्शन.

प्रकाश संतांच्या कथा म्हणूनच कथेच्या रूढ चाकोरीत बसणाऱ्या नाहीत. व्यक्तिदर्शनाचेही रूप अधिकाधिक सूक्ष्म आणि तरल नाट्यपूर्ण झालेले दिसते. निवेदनाचाही स्वतंत्र विचार करावा अशी भावोत्कटता आणि तटस्थता त्यात एकरूप झालेली दिसते. पाहुण्या या कथेच्या सुरुवातीला आलेले निवेदन त्या दृष्टीने पाहण्याजोगे आहे.

आई-बाबांच्या घरी सुट्टीत आलं की नुसती मजा असते. आई आणि बाबांचा आवाज सारखा सारखा ऐकत राहावा असा सबंध घरात तो कधी कधी वाऱ्यावरून तरंगत येणाऱ्या छोट्या मऊ मऊ पिसांसारखा, फिरत राहणारा. सुट्टीचा कंटाळा ? नावच सोडा. सुट्टी कधी संपली समजणारच नाही. परत आणि सुट्टी संपून आज्जीच्या गावाला जातानाही वाईट वाटायचं कामच नाही. तिथेही तशीच पिसं असल्यासारखी. आजोबा, आज्जी तर आहेतच. शिवाय माझे ते मॅड मित्र ! एकापेक्षा एक. शाळेतले आणि गल्लीतलेही! (पंखा : पृ. १२५)

आई-बाबा, आजी-आजोबा, शाळा आणि मित्र यांच्यापलीकडे जग नसलेल्या लंपनला नव्या जाणिवा आता सूक्ष्म रूपाने भेटू लागल्या आहेत. त्या जाणिवा जणू त्याचे दार ठोठावू लागल्या आहेत. स्त्री-पुरुषसंबंध, त्यातील ताण, माणसांचे स्वभाव, वागणे-बोलणे याविषयीचे अनेक प्रश्न आता लंपनच्या मनात पिंगा घालू लागले आहेत. निमामावशी आणि तिची मुलगी सरला त्याच्या घरी पाहुण्या येतात. आई-निमामावशी यांचे हसणे-बोलणे आणि रडणेही त्याला स्त्रीमनातल्या एका आतल्या कप्प्याचे दर्शन घडवून जाते त्याचाच हा अनुभव ! सरला त्याच्याशी बोलताना कोणीतरी कुणाला का दुखवले असे प्रश्न विचारत राहते. जो दुखवतो त्याला कठोर म्हणते. मग लंपनलाही प्रश्न पडू लागतात- कुणी कुणाला दुखवू नये असं तिला वाटत असणार ? का पण ? कशासाठी? दुखवायचं म्हणजे काय ? आणि दुखवायचं नाही म्हणजे तरी काय ? (पंखा : पृ. १३२-१३३)

मावशी आणि आईच्या बोलण्यात जगातला आधार सुटलेल्या, मिळत नाही म्हणून विहिरी जवळ करणाऱ्या बायकांचा उल्लेख येतो. लंपूच्या डोक्यात चक्र सुरू होते... विहिरीत उडी मारताना त्यांना भीती वाटत नसेल ? कारण मग पाण्यात पडल्यावर पोहायचं, तसलं काय नसतंच. सरळ खाली खोल खोल जायचं असतं. त्या पाण्याचा तो हिरवा कुबट वास. पाण्यात खोल जाताना दुखत असेल ? त्या बायका स्वतःलाच का दुखवून घेत असणार ? (पंखा : पृ. १३६)

अनुक्रमणिका

लंपनच्या मानसविश्वाची ही खोलीच कथेचा कणा आहे. दुखवणे, दुखवून घेणे यातून निर्माण होणारी ही स्पंदने लंपनला अस्वस्थ करतात. त्याला त्यातील अर्थ मात्र नेमकेपणाने कळत नाही. लंपन म्हणतो--- मला मावशीचे शब्द समजत होते. पण अर्थ ? समजल्यासारखा आणि न समजल्यासारखा. बादलीतल्या पाण्यात हात बुडवून बाहेर काढल्यावर होतं, तसं. हातावर पाणी असतं. पण हातात पाणी नसतंही... (पंखा : पृ. १३७) सरलेकडून तिच्या घरात सारखी दुखवादुखवी चाललेली असते हे कळताच नवे भान जागरूक झालेले दिसते. मावशी आणि सरला खूप दागिने घालून हसत हसत आल्या. मग त्यांच्या मनात दडलेली दुःखे कळली. म्हणजे सुख हे केवळ दागदागिन्यात नसते. सरला म्हणते तसे लंपनचे आईबाबा आणि इतर भावंडे यांच्या एकपणात म्हणजे वेगवेगळ्या पाकळ्यांच्या एका फुलागत असण्यात आहे. लंपनला आलेले हे आपसूक शहाणपण कथेतून पाझरत राहते. प्रकाश संतांची प्रतिभा ते दर्शन बोधवादी पद्धतीने घडवीत नाही. त्या कथेलाही कोवळ्या मनाचा आणि तितक्याच कोवळ्या भानाचा स्पर्श होतो आणि अस्सल अनुभव सोलीव रूपात उभा ठाकतो.

पंखा ही कथाही एका मित्राच्या निमित्ताने येणाऱ्या एका भानाचीच कथा आहे. संवप्रसाद काकांशी बंगल्यासाठी भांडण सुरू आहे म्हणून लहानशा घरात राहतो, देवळात झोपतो, मास्तरांच्या घरी जागून त्यांची पुस्तके वाचून अभ्यास करतो. त्याच्या काकाच्या बंगल्यात कॅरम खेळणे, पैजा लावणे, भांडणे असे विश्व. कधी शर्यती. या गंमतीसाठी लंपन आणि त्याचे मित्र त्या काकांकडे-- सावकारांकडे जायला लागतात. ते जग बंधनाच्या पलीकडचे आहे ; तिथे चिंता नाहीत, फक्त गंमत आहे असे लंपनला वाटत असते. एक दिवस सावकारांची मुलगी रतन लंपनला भेटते. ती फी भरायला पैसे नसल्यामुळे शाळा सोडल्याचे सांगते. घरातल्या वस्तू विकून सावकार शर्यती, पैजा ही व्यसने करतात. रतनची मरणपंथाला लागलेली आई त्याला भेटायला बोलावते. ती लंपनच्या आईची मैत्रीण असते. मग लंपनला तीक्ष्ण प्रश्न पडतात की ही माणसे आपल्याला का आवडली ? त्यांच्यासारखेच जगावे असे का वाटले ? रतनही त्याला विचारते की तू या घरात का येतोस ?

या अनुभवाला चिकटून त्याआधी एक वेगळा अनुभव प्रकाश संत यांनी विलगपणेच योजलेला आहे. घराकडे जाताना वॅक्सिन डेपोपाशी लंपन येतो. तिथे गाई ठेवल्या असतात. त्यांच्या पोटावर चाकूने रक्ताच्या रेघा उठवून त्यात पू भरल्यावर देवीची लस तयार केली जाते ते लंपनला आठवते. त्या गाईंचे डोळे लंपनला आठवतात. त्यांना सोडवणेही मुलांना अशक्य. जनावरांनी लोळवले तर काय करणार. त्या डेपोभोवती झाडे, गवत, फुलझाडे होती. पण लंपन म्हणतो--- ...पण त्या सगळ्यामागं मला त्या

अनुक्रमणिका

गोठ्यातल्या प्राण्यांचे डोळे दिसायचे. पुस्तकात लिहिण्याप्रमाणं- कारुण्यानं भरलेले. आताही तेच झालं. आधीच ते का येतोस तू या घरात. हे वाक्य माझ्या डोळ्यात आता आणि ते डोळे ! (पंखा : पृ. १६२) रतनच्या आईचे डोळेही तर लंपनला स्वतःच्या आईच्या डोळ्यांसारखेच वाटलेले असतात. सांबप्रसाद बंगल्यात राहायला येतो. त्याच्या घरी गेल्यावर त्या शांत स्वच्छ घरातही लंपनला काहीतरी टोचल्यासारखं वाटत राहते; पण काय ते सांगता येत नाही. रतनही त्या घरात असते पण तिच्या आईची जागा रिकामी असते. एकदा शहापूरच्या जुन्या बाजारात लंपनला जपानी पंखा दिसतो. उघडल्यावर सुंदर देखावा मिटल्यावर बंद. विकणारा रतनचा बाप सावकार असतो. मोडक्या घरात राहणारा, लंपनकडे पाहून हसणारा. लंपनला मात्र कॅरम, शर्यती आठवतात.

एखादा पंखा उघडून ती सगळी त्यावरच असलेली चित्रं दिसत आहेत असं वाटायला लागलं. वाऱ्यासारख्याच त्या आठवणी वाटल्या मला. छानच. मग मला ती विहिरीच्या कट्ट्यावर बसलेली रतन आठवली. तिची आई आठवली आणि एकदम तो उघडलेला पंखा बंद झाल्यासारखा झाला. वाराही बंदच. (पंखा : पृ. १६९)

सावकाराकडचा तो कागदी पंखा तिथेच ठेवून हा आठवणींचा आणि जीवनाच्या द्विविध आकलनाचा पंखा घेऊन लंपन परत फिरतो. डग , पूल , झांज , पंखा या कथा काहीशा दीर्घावलेल्या वाटतात कारण त्यामध्ये असणारे अनुभव व्यामिश्र आहेत. ते सखोल तितकेच विशाल ; सर्वव्यापी तितकेच धारदार आहेत. जीवनात सहजपणाने न दिसणारे अंतःस्थ रूप दाखविणारे हे अनुभव तारुण्याच्या उंबरठ्यांवर उभ्या असलेल्या मनाला जीवनाचे विपरीत आणि अफाट भान देत आहेत.

ग्रंथ या शेवटच्या कथेतही पुस्तके वाचण्यासाठी आसुसलेला लंपन लहान गावात त्याची भूक न भागणे याबरोबरच पुस्तके वाचणारा व वाचनासाठी तहानलेल्याला पुस्तके पुरवणारा मन्याशेट भेटतो. मन्याशेटबद्दल लंपन म्हणतो - वाऱ्यावर मस्तपैकी तरंगत असलेला कागद आपण पकडलेला आहे. त्याच्यावर काहीतरी छापलेलं आहे. पण ती भाषा न समजणारी... (पंखा पृ. १८२) स्कॉलर मन्याशेटची खोलीही पुस्तकांचा वास असलेली. लंपनला त्या विश्वात प्रवेश मिळतो. मन्याशेटची आई सारखी वैभवाचे वर्णन करणारी आणि डोळे पुसणारी. मग लंपनला हा माणूस न वाचता येणाऱ्या जाडजूड पुस्तकासारखा वाटतो. मन्याशेट लंपनला सांगतो ..पुस्तक आणि रस्ता संपेपर्यंत पुढे पुढे. रस्ता संपला की पुस्तक संपल्यासारखंच. पण चालणारा संपला की रस्ता असला काय नसला काय, सगळं सारखंच. ग्रंथ आटपलाच मग... (पंखा : पृ. १८९)

एकाच ठिकाणी थांबू न शकणारा, रस्ते आपल्याला खुणावत आहेत असा हा मन्याशेट. त्याच्या ग्रंथ आटपला शब्दाचा संपूर्ण अर्थ लंपनला कळत नाही. पण तो

मन्याशेटच्या घरी जायचा नाद सोडतो. जाड पुस्तके न वाचता इतरांसारखी पुन्हा बारकी पुस्तके वाचायला लागतो. एक दिवस अचानक ग्रंथ आटोपला याच शब्दात त्याला मन्याशेटच्या मृत्यूची बातमी कळते. तो घरी परततो पण त्याच्या लहानशा मनात कालवाकालव झालेली. प्रश्न पडणे, जिज्ञासा निर्माण होणे, जे कळले नाही त्याबद्दल उत्सुकता वाटणे, हुरहूर निर्माण होणे अशी संवेदनांची आणि भावसंभ्रमाची अनेक कोवळी रूपे या पंखा संग्रहात विखुरलेली आहेत. एका विशिष्ट प्रदेशाची, विशिष्ट वयाच्या टप्प्यावरील ही स्मरणसाखळी नदी, आभाळ, पूल, रस्ता अशा वेगवेगळ्या निमित्तांनी आपल्यापुढे साकारते. ही केवळ स्मरणेही नाहीत कारण ती हरवलेल्या गोष्टींवर प्रेम करीत भारल्यासारखे सतत मागे पाहणाऱ्या वृत्तीची नाहीत. त्याची जातकुळी अशाच स्वरूपाची आहेत. ती एका सौंदर्यवादी (रोमँटिक) मनाची स्फुरणे आणि प्रस्फुरणे आहेत.

लंपनचे भावविश्व घडवणारे, समृद्ध करणारे अनुभव भेटतानाच त्याचे मन नकळतपणे त्याचा अर्थ लावण्याचा, त्यातील संगती आणि विसंगती शोधण्याचा प्रयत्न करते. यातच तो वाढतो आहे ; पण आपण मोठे झालो तर ही सगळी गम्मत संपून जाईल असे एक पुसट भयही त्याच्या मनात आहे.

प्रकाश नारायण संत यांनी १९५८ साली पहिली कथा लिहिली पण त्याच्या ह्या लंपन कथांचा काळ १९९० च्या आसपासचा. त्यामुळे या काळातील कथाप्रवाहाशी त्यांच्या कथेचा तसा संबंध नाही. कारण लंपनच्या भावविश्वाचे हे पुनर्रचन आहे. मला तर हे कथारूप पाहत असताना व्यंकटेश माडगूळकरांच्या व्यक्तिचित्रणे विरघळवून घेतलेल्या कथांची आणि कथापण मुरवून घेतलेल्या श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांच्या ललितलेखनाची आठवण होते. कारण लंपन अनुभवतो, त्यातून गवसलेल्या सूत्रातून भोवतालच्या माणसांचा आणि आपण व ती माणसे यांच्यातील संबंधांचा आपल्या परीने शोध घेतो. त्यात आजी-आजोबा-बाबूराव यांचे एक वर्तुळ असते, आई-बाबा-मनी आणि बिट्ट्या यांचे दुसरे तर त्याच्या सोंड्या, परळ्या, अळण्या, संप्या या मित्रांचे तिसरे जग, कृष्णा, तुंगभद्रा, रतन यांचे आणखी एक जग --- आणि या सगळ्या जगांची वर्तुळे आतून एकमेकांशी जोडलेली असतात. त्यात भोवतालचा परिसर असतो, झाडे असतात, घसरगुंडी, ग्राऊंड यांचे अचल जगं असते आणि त्याहीपलीकडचे आभाळ, नदी, पाऊस यांचे निसर्गरंग असतात. त्या सगळ्यांना कॅलिडोस्कोपसारखा प्रत्ययही बदलणारा आकार प्राप्त झालेला असतो. हे सगळे लंपनच्या अनुभवासकट जसेच्या तसे वाचकापर्यंत पोहोचविण्याचा प्रकाश संत यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे लंपनच्या निवेदनातून त्याच्या जगण्यातले सगळे प्रवाहीपण लेखक आपल्यापर्यंत पोहोचवू शकलेला आहे असे दिसते. लंपनला येणारी आजी-आजोबांची आठवण न टाळता

येण्याजोगी आहे. पण आदम च्या रूपात ज्यांना तो पाहतो त्या बाबांची आठवण त्याला उमलवून टाकणारी आठवण आहे. त्याला आईची आठवण येते ती मात्र त्याच्या मनातली हळवी जागा आहे. आईबाबा आणि मनी, बिट्टचा यांच्या फोटोत आपण नाही आणि आपल्यासाठी जागाही ठेवलेली नाही ही त्याच्या मनातली भावना महत्त्वाची आहे. म्हणूनच लंपन आजीआजोबांच्या सावलीत असूनही काहीसा एकटेपणाचा, तुटलेपणाचा झोंबणारा अनुभव घेताना दिसतो. म्हणूनच टारझन होऊन रानावनात झाडांवर उड्या माराव्याशा त्याला वाटतात. त्याला खूप काही समजते आहे आणि समजत नाही. सुमीशी असलेल्या त्याच्या मैत्रीत एक आधार शोधण्याचा भाव आहे. लंपन सारखी फुलांची, अनुभवांची संख्या सांगतो कारण त्यात त्याला एक लांबलचक न संपणाऱ्या वाटेची जाणीव होते आहे. ज्याचे मूळ त्याच्या एकाकीपणात, तुटलेपणात आहे. त्यामुळे पुढे जेव्हा नकाराचे अनुभव, मृत्यूचे अनुभव भेटतात. तेव्हा तो अधिक मोठा होत जातो. शेवंताचा अपघाती मृत्यू, मन्याशेटचे आकस्मिक मरण ही त्याची चांगली उदाहरणे आहेत. जुन्या माणसांचे जाणे --- नव्यांचे येणे यातून त्याची वाढच होते आहे.

या अभूतपूर्व जगाच्या प्रत्ययामुळे लंपन हाच निवेदनाचा, त्याच्या सोबतीला असणारे लेखक प्रकाश संत आणि कथनाचा धागा सांभाळणारा चित्रमय शैलीचा निरीक्षक अशा तिहेरी गोफातून या कथा अवतरतात. या मॅड जगाच्या मॅड खुणा लंपनच्या निवेदनात आहेत, त्याला पडणाऱ्या प्रश्नांमधून त्याचे भान अधोरेखित करीत राहणे ही लेखकाची भूमिका आहे. तर कमळीचे लग्न , मन्याशेटची पुस्तकांची दुनिया, सावकारांचे शर्यती पैजीचे जग हे मांडणारा त्रयस्थ निरीक्षकही या कथांमध्ये अलगद मिसळलेला आहे. मग तयार होते लंपनची विशिष्ट शैली ज्यामध्ये बोलीचे प्रदेशाशी घट्ट चिकटलेले रूप दिसते. यापेक्षा आमचं शाळा एकदम बेष्टं म्हणून सोड जा. असलं दंगा? कोण करायला जाऊ देत की. आमचं मास्तर कूट कुट्णार... (शारदा संगीत : पृ. ७३) असा गवताच्या पात्यासारखा सारखा इकडे तिकडे का करायलास ? (पंखा : पृ. ९५) या कथामालिकांना जिवंतपण बहाल करणारी रेखाटने अनिरुद्ध दीक्षित, प्रकाश संत, जुनुका देशपांडे, चंद्रमोहन कुलकर्णी यांनी केलेली आहेत. लंपनचे दृश्य जग आपल्याला दाखवण्याचे महत्त्वाचे कार्य या मंडळींनी केलेले आहे.

प्रकाश संत यांनी मराठी कथेत आणलेले हे लंपनचे विश्व याच विशेषामुळे विशिष्ट काळापुरते मर्यादित ठरत नाही. ते सार्वकालिक बनलेले आहे.

- डॉ. आशा सावदेकर, नागपूर

■■■

मातृभक्त

● सौ. शुभदा मुळ्ये

काय करावं या मुलाला ! आत येऊन आपल्या पाठीमागे दार बंद करून घेणाऱ्या प्रदीपकडे शालिनी नुसतीच पाहात राहिली. पण तिच्या पाहण्यात असलेला प्रश्न प्रदीपने बरोबर ओळखला. त्याला लॅच की ने दार उघडून आत येता येत असताना दारावरची बेल त्याने वाजवावी कशाला ! पुन्हा, बेल अशी वाजवत ठेवायची, की कुणाचा डोळा लागला असेल, तर तो खडबडून, दचकून, उठून बसलाच पाहिजे. तिच्या चेहऱ्याकडे पहात प्रदीप हसत हसत म्हणाला, काय मॉम, एकदम रागात ? एकही प्रश्न विचारला नाहीस ? हं हं ! पिन अडकली वाटतं ! बोलत बोलत तो आत निघून गेला.

हातातल्या पुस्तकात असलेलं खुणेचं बोट काढून घेऊन शालिनीने ते पुस्तक टीपॉयवर टाकलं. प्रदीप घरात आला, म्हणजे आता एक ओळ वाचणं शक्य होणार नाही. खाणं, चहा--सगळं पहावं लागणार आणि सोबतीला त्याची अखंड बडबड आणि तोंडी सतत पालुपद हं ! मग काय मॉम.

हे त्यांचं मॉम प्रकरण अगदी आवडत नाही शालिनीला. डाव्या खांद्यावरचा पदर उजव्या खांद्यावरून घेऊन डाव्या हातात असलेले त्या पदराचे टोक आवळत असणारी, केसांना रोज न चुकता चप्पचप्प तेल लावणारी ही बाई फक्त आईच असू शकते. कोण सांगणार याला ? आणि ते दुसरं पिन अडकली वाटतं ! दारातून बघून कसं ओळखलं प्रदीपने ? खरंच. त्याचं आईकडे इतकं बारीक लक्ष कसं असतं, हा विचारात पाडणारा प्रश्न होता.

दारातून आत येऊन पायातले बूट काढण्याआधी तो आपल्या मॉमच्या मनातलं झटकन् ओळखत असे. खाण्याची प्लेट हातात धरून पुन्हा तोच प्रश्न प्रदीपने शालिनीला विचारला, हं. मग, कुठे अडकली पिन ?

काही नाही रे. जरा वाचत होते. मग तर नक्कीच काहीतरी आहे. प्रदीप ठासून म्हणाला, मातोश्री, एखादी गोष्ट मनाला छळत असली, की तेव्हाच आपण भलत्या वेळी पुस्तक डोळ्यांपुढे धरून बसता. नाहीतर तुमची वाचनाची वेळ ठरलेली असते.

हं ! मनात डोकावणं वेगळं, पण सदोदित घाईगर्दीत असणाऱ्या या मुलाला आईच्या हालचालींचा इतका अचूक अंदाज ! प्रदीप खाणं संपवून प्लेट ठेवून आलाही. तरीही ही आपली तशीच विचारात. ती बसली होती, तिथेच येऊन तो तिच्या मांडीवर डोकं टेकून पडला. उगीचच भरून आल्यासारखं झालं शालिनीला. काही नाही रे ! तिने म्हटले, अरे, आपल्या घरात तुझ्या आजीची पेटी नाही का पडून वरच्या फळीवर वर्षानुवर्षे ? त्या पेटीची आठवण झाली बघ बाळा. तिचा आवाज गहिवरला.

प्रदीप चटकन उठून बसला. म्हणजे हार्मोनियम म्हणतेस ? ते जुनं डबडं ? मागेच मोडीत निघालं नाही का ते ? मॉम, तुला हवाय का हार्मोनियम ? बघून येऊ ? तो उठण्याच्या आविर्भावात म्हणाला. मग जसा काही एकदम उमज पडून तो बोलला, हं हं ! अन्यायग्रस्त नायिका असणार मॉम तुझ्या त्या हातातल्या पुस्तकात. मॉम, ते पुस्तक सोड आणि पेटीचाही नाद सोड. काळजीच नको करू तू . तू सध्या सुनेच्या शोधात आहेस ना ? मग एकच अट असू दे तुझी. म्हणावं, गाणं येत नसेल तर शिकून घ्यावं लागेल आणि पेटी वाजवता येणं तर मस्ट. ते यायलाच हवं. चांगला दबका ठेव हं आई सुनेवर. नाहीतर सून व्हायची शिरजोर आणि अन्यायग्रस्त तूच होऊन राहशील. बोलला न् स्वतःच मोठ्याने हसला प्रदीप.

नंतर कितीतरी वेळ तेच विचार शालिनीच्या मनात घोळत राहिले. आधीची ती सासूबाईंची पेटी तर जशी ठाण मांडून बसली होती डोक्यात. शालिनीच्या गळ्यात गाणं होतं. बोटांत कसब होतं. पण या घराला सुरांचं अगत्यच नव्हतं. ज्यांना आवडच नव्हती, त्यांच्याबद्दल शालिनी समजू तरी शकत होती. पण तिच्या सासूबाईंना तर गळ्यात गती होती ना ? त्यांना त्यांच्या आईने मुद्दाम आवडीने पेटी घेऊन दिली, तर त्या काळ्या-पांढऱ्या पट्ट्यांवरून सासूबाईंची बोटे फिरली असतीलच ना ! पण तरी त्या अशा वागल्या ? त्यांचा छंद त्यांनी का गुंडाळून ठेवला, की पेटी वाजवण्याचा त्यांनाच कंटाळा आला, याचा उलगडा त्यांनी कधीच केला नाही पण शालिनीला गाण्याची इतकी आवड असताना आपल्या पेटीला त्यांनी तिला कधी हात लावू दिला नाही. बरं. तिच्या

अनुक्रमणिका

गळ्याबद्दल त्यांना माहीत नव्हतं, असं तरी कसं म्हणता येईल ? शालिनीला या घरी जेव्हा दाखवायला आणली, तेव्हाच तिच्या वडिलांनी कौतुकाने सांगितलं होतं की, आमची शालू फार चांगली गाते. उत्तम कविता करते. स्वतःच्या कवितांना स्वतःच सुंदर चाली लावते. तिच्या काव्यगायनाचे कार्यक्रम होत असतात.

त्यावेळी सगळं प्रसन्न चेहेऱ्याने ऐकून घेणारी हीच का ती आपल्या सासरची माणसं ? शालिनीला नेहमी प्रश्न पडायचा. लग्न झाल्यानंतर तिला काव्यगायनाच्या कार्यक्रमासंबंधी विचारण्यात आलं, तेव्हा तिने स्वतःच्या सोयीप्रमाणे तारीख ठरवून टाकली. सासूबाई समोरच बसल्या होत्या. त्यांनीही काही हरकत घेतली नव्हती. संध्याकाळी मुलगा घरी आल्याबरोबर त्यांनी मुलाच्या कानी ही बातमी घातली मात्र; त्याचा मुलगा -प्रदीपचा बाप - एकदम नाराज झाला. लग्नाला फार दिवस झालेले नव्हते, म्हणून तो एकदम तिच्यावर खेकसला नाही, इतकेच. परस्पर ठरवून टाकलंस? त्याने शालिनीला विचारले. शालिनीला बोध झाला नाही. ती नुसतीच त्याच्याकडे बघत राहिली. अग, मला विचारलंस तरी का ? माझ्या परवानगीची गरज नाही वाटली तुला ? की, माझी, आईची, कुणाची किंमतच नाही तुला ? आई तर समोरच होती ना ? तिला तरी विचारलंस? इतकी स्वतंत्र आहेस तुझी तू ? प्रदीपचा बाप बोलतच सुटला होता.

त्या एका प्रसंगातून प्रदीपच्या वडिलांची खरी खरी ओळख पटली होती शालिनीला. तिने शब्द दिला होता, म्हणून तो काव्यगायनाचा कार्यक्रम केला तिने, मात्र तेव्हापासून कानाला खडा लावला. तसे पाहिले, तर तिचे कार्यक्रम चालू ठेवणे तिला काही अशक्य नव्हते. पण त्यासाठी खंबीरपणे विरोध पत्करायला तयार व्हावे लागणार होते. तिने तो विषय संपवून टाकायचे ठरवले. ठरवल्याप्रमाणे केलेही. पण म्हणून आवड मिटवून टाकता येते ? नाही कुठे बाहेर जायचं, तर ठीक पण घरात एवढा छान जर्मन मेकचा हार्मोनियम आहे. त्या सुरांना बोलते करायला कसली हरकत ? आपल्या तारुण्यसुलभ उत्साहाने एक दिवस शालिनी पेटी काढून बसली. छान बैठक जमवली. एक हात भात्यावर आणि दुसऱ्या हाताची तीन बोटे मध्यम षड्ज, पंचम आणि तार षड्जावर सहजपणे स्थिरावली. आपोआप डोळे बंद झाले. तो स्वरनाद कानामनात घुमला. स्थिर झाला. सहजतेने ती बोटे उचलली गेली आणि काळ्या-पांढऱ्या पट्ट्यांवरून सफाईदारपणे फिरून त्या बोटांनी निःशब्द स्वरतानेचे एक भेंडोळे भिरभिरून दिले. त्या नादाने लुब्ध झालेली शालिनी स्वतःचा स्वर आणि शब्दसुद्धा द्यायला तयार झाली सुरांना. पण त्याआधी तिथे विसंवादी सूर उमटला. रचले जाऊ पाहणारे स्वरशिल्प मोडीत निघाले आणि विसंवादी सूर जे काही निनादले, त्याने शालिनी मोडून पडली. पण तसे मोडून

पडतानाही तिला एक साक्षात्कार झाला. म्हणजे, या घराला स्वरांचेच वावडे आहे तर ! एका व्यक्तीची 'बागुलबोवा' म्हणून सर्वांना दहशत बसवण्याचे काम कुणी पार पाडले होते, याला महत्त्व नव्हते. तिथे शालिनीने दुसऱ्याच्या वस्तूला न विचारता हात लावण्याचे महापाप केले होते. आधी तिने स्वतःचा निर्णय स्वतः घेऊन एक गुन्हा करून ठेवलाच होता. ती घटना जरा कुठे मागे पडण्याच्या प्रयत्नात होती, तर तेवढ्यात शालिनीने पुन्हा दुसरी चूक करून ठेवली होती. घरातल्या प्रत्येकाच्या दृष्टीने ती एक संशयित गुन्हेगार ठरली होती.

तुरुंगात गेल्यावर आणि तिथे राहून आल्यावर तिथल्या अंधारालाही माणूस इतका सरावतो म्हणतात, की सुटका झाल्यानंतर बाहेरचा उघडा स्वच्छ सूर्यप्रकाश त्याला असह्य होतो. उघड्या खिडक्यां-दारांमधून येणारा भणाण वारा सोसवेनासा होतो आणि तो स्वतःला कोंडून घ्यायला धडपडतो.

या असल्या कल्पना शालिनीला सुचायला लागल्या, तेव्हा तिच्या मुलीसाठी स्थळे पाहण्याची वेळ आली होती. प्रदीप बारावीला होता. ते दिवस शालिनीला कधी विसरू शकणार नाही. तेव्हा ती घरात संशयित उरली नव्हती. घरातला सगळा कारभार तिच्या इच्छेने, तिच्या तंत्राने चालत होता. बारीक-सारीक गोष्टीत प्रदीपच्या वडिलांना तिचा सल्ला लागत होता आणि प्रदीपची आजी तर शालिनीने उठा म्हटल्यावर उठत होती आणि 'बसा' म्हटल्यावर बसत होती. पण शालिनी तटस्थ होती. तिने एकदाच त्या हार्मोनियमला हात लावल्यावर ती बाजाची पेटी, तिचा हात लागणारच नाही, अशी उंच माळ्यावर टाकून देण्यात आली होती. त्या घटनेपासून शालिनी केवळ एक चालते बोलते यंत्र बनून त्या घरात वावरत होती. जीव ओतून जोपासलेली गायनकला आणि स्वतःचा जीव की प्राण असणाऱ्या तिच्या कविता -- दोन्ही गोष्टीची मनाच्या बासनात गठडी वळून, ते बोचके स्वतःला सापडणार नाही इतक्या आतवर तिने दडपून टाकले होते. मनही नको. मनाला गुंतवणारे उद्योगही नकोत. बस ठरलं. उद्योगच नसला की मनाचे व्याप, ताप, संताप--सगळेच नाहीसेच होतील.

शालिनीने स्वतःकडून प्रामाणिकपणे कसोशीने प्रयत्न केला होता. वाचायला तसं फारसं काही नसेच. फक्त रोज येणारं वर्तमानपत्र असायचं. आपली सगळी कामंधामं आटोपल्यानंतर रात्रीच्या वेळी शालिनी त्या पेपरमधलं अक्षर न् अक्षर वाचून काढीत असे. तो वेळ खास तिचा असायचा. अशावेळी मात्र तिचं ते दडपलेलं मन उसळी मारून उठत असे. त्या मनात कवितेची ऊर्मी उठायची. कवितेच्या त्या ओळी तिला मग काही म्हणजे काही सुचू देत नसत. मग दुपारी घरात शांतता झाली की, कुणाच्याही लक्षात येणार नाही अशा बेताने शालिनी आपल्या मनातल्या कवितेला व्यक्तरूप देत असे.

एवढेसे ते कवितेचे चिठोरे, पण त्या चिठोऱ्यात तिचे ब्रह्म साठवलेले असे.

दिवस उलटत गेले. पालटतही गेले. मुलं मोठी झाली. सासूबाईंना एक विचित्रच दुखणं जडलं. कुठलीही आकृती त्यांना डबल दिसायची. खरं तर उपचाराने गुण येत होता, पण आपल्याला असं का झालं, या कल्पनेनेच ती बाई खचून गेली. जरा उठायचं असलं, तरी शालिनी जागे. जागेवर येऊन बसवायलाची तीच अशी उठता बसता ती बाई शालिनीवर अवलंबून राहू लागली. शालिनीचे समजुतीचे बोलणे सासूबाईंना दिलासा देऊ लागले. नजर कधी स्थिर-नेहमीसारखी असायची. कधी तीच नजर एकाचे दोन करून दाखवायची. त्यामुळे सासू नेहमी धास्तावलेली आणि इतरांच्या डोळ्यांतून पाणी काढण्यात धन्यता मानणाऱ्या त्या बाईची नजर सदैव पाणावलेली राहू लागली. कर्तेपण शालिनीकडे आले, तरी अलिप्तपणे अंगीकृत कार्य पार पाडत राहणे चालू राहिले शालिनीचे. फरक एवढाच झाला की, मुलीलाही वाचनाची हौस म्हणून लायब्ररीची पुस्तके घरात येऊ लागली. आपलं चिठोरं इथे तिथे हरवण्याऐवजी एखादा कागदाचा चतकोर लायब्ररीच्या पुस्तकात ठेवून दिला, की फुरसतीच्या वेळी, मूड आला की, किंवा वाचता वाचता कविता छान आकाराला येऊ लागली. बिनबोभाट चालू होते हे. मुलगी लग्न होऊन सासरी गेली, तरी आईच्या कवितांची --तिच्याच लायब्ररीच्या पुस्तकांच्या सहकार्याने चालू असलेल्या त्या कवितांची गंधवार्ताही त्या मुलीला कधी लागली नाही.

प्रदीपचं तसं नव्हतं. बारावीच्या अभ्यासासाठी घरात त्याचा बराच वेळ जायचा. एरवी अभ्यास, क्लासेस, खेळ यातच जाणारा त्याचा सारा वेळ ! थोडासा घरच्यांच्या-- विशेषतः आईच्या -- वाट्याला येऊ लागला त्यातला. मुळात त्याचा ओढा शालिनीकडे जास्त होता. आजीच्या सेवेत ती किती गुंतलेली आहे, हे त्याने त्याच काळात पाहिले. सगळ्यांचे व्यवस्थित करण्यात कितीही दमली, तरी ती इतकी प्रसन्न कशी राहू शकते, याचे त्याला फार नवल वाटायचे आणि त्याहून आश्चर्याची गोष्ट त्याला पाहायला मिळाली. ते म्हणजे वाचता-वाचता त्याची आई चक्क लिहीत होती. घाईघाईने काहीतरी लिहून झालेही आणि आपण त्या गावच्याच नाही, अशा बेताने शालिनीचे वाचन पुन्हा सुरू झाले होते. कुणी पाहिले असते, तर वाचनात ही बाई अगदी तल्लीन झाली आहे, असाच त्याचा ग्रह झाला असता. स्वतःचा अभ्यास सुरू असतानाही सारखा-सारखा तो त्या दिवशी आईच्या वाचनावर लक्ष ठेवून होता.

त्या पुस्तकातला कागद घेऊन आईने काय लिहिले, ते शोधून काढणे त्याला वाटले तेवढे सोपे गेले नाही पण तसे ते काम फारसे कठीणही नव्हते. पुस्तक सहज कुणाच्या हाती लागणार नाही, एवढ्याच खबरदारीने ठेवले गेले होते. इंग्लिश मीडियममध्ये

शिकलेल्या त्या मुलाने त्या कागदावरची अक्षरे मन लावून वाचली. आपल्या आवडत्या देवाची प्रार्थना जितक्या श्रद्धेने केली जाऊ शकेल, तितक्या अगत्याने वाचली. त्या अक्षरांनी बनलेले शब्द त्याच्या त्या एकाच वाचण्यात त्याच्या पक्के लक्षात राहिले आणि मग दिवसभर त्या शब्दांचा पाऊस शालिनीवर पडत राहिला. ती नुसते ऐकत होती. पण त्याला काही विचारावे किंवा आपण काही खुलासा करावा असा वेळ मात्र त्याने तिला मिळू दिला नाही. झिमझिमत्या पण पकडता न येणाऱ्या पावसासारखे तिच्याच कवितेतले ते अधले मधले काही सुसंगत तर काही त्याने मागे-पुढे उच्चारलेले विसंगत शब्द. त्याच्या त्या उच्चारणात केवढा आनंद होता ! जसा काही त्याने कोणतातरी एक नवीनच शोध लावला होता.

त्या रात्री घरात निजानीज झाल्यावर त्याची आई रोजसारखी वाचायला येऊन बसली, तेव्हा तो साळसूदपणे आईकडे आला. "मॉम, हे घे," असं म्हणून त्याने आपला हात पुढे केला. त्या हातात एक लेटरपॅड आणि सोबत एक सुंदर पेन होते.

हातातले पुस्तक टाकून देऊन शालिनी एकदम उभी झाली. तिने त्याला अगदी जवळ घेतले. तिच्या डोळ्यांमधून सरसरसर अखंड अश्रू ओघळू लागले. प्रदीप गोंधळून गेला. "व्हॉट्स रॉंग वुईथ यू, मॉम ?" त्याने विचारले. तेवढ्यात त्याच्या आजीच्या "शालिनी, शालिनी" अशा हाका ऐकू आल्या. सध्या त्याच्या आजीला पुन्हा कोणत्याही वस्तू दोन दोन दिसायला लागल्या होत्या आणि शिवाय नुकत्याच सासरी गेलेल्या नातीची आठवण काढून आजीबाई वेळी अवेळी डोळे गाळत होत्या. शालिनी सासूच्या तैनातीत गुंतली. ती वेळ तर निघून गेली. पण विषय अर्धवट सोडेल, तर तो प्रदीप कसला ? इतकी सुंदर पोअेम (त्याच्या मॉमने इतक्या झटक्यात लिहून संपवली, ती पोएम सुंदर असणारच) जर आपली मॉम बघता-बघता लिहून जाते, तर तिची ही काही पहिली पोएम असणं शक्यच नाही. मॉमकडे अशा पोएमसचा साठा असायला हवा. पण त्यासाठी तिने पेपर बिलाचा कागद निवडावा ? लिहून झालेली कविता कुणाच्या नजरेला पडू नये यासाठी तिला इतके काळजीत का पडावे लागते ? तेही तिच्या या वयात ? तिला जावई आलेला असताना ? का असं ? कुणाला विचारावं ? त्याने स्वतःला सुचलं त्याप्रमाणे चांगल्यापैकी लेटरपॅड त्याच्या मॉमला आणून दिले होते. एक डायरीही. पण ममीच्या कविता झाल्याच, तर चिठोऱ्यावरच होणार, हे कसे कोण जाणे पण तो समजून चुकला. अंगभूत समजदारीमुळे तो विषय त्याने पुढे वाढवला नाही. नको ते प्रश्न विचारून त्याने त्याच्या मॉमला अडचणीत टाकले नाही किंवा आगाऊपणा करून वडिलांकडूनही कसला खुलासा मागितला नाही. आजीशी त्याचे सख्य फारसे कधीच नव्हतेच. पण तेव्हापासून त्याच्या मॉमचा तो निराळ्या दृष्टिकोणातून विचार करू लागला. त्याची अभ्यासाची वर्षे संपली.

नुकताच आवडीचा जॉबही त्याला मिळाला. त्याच्या अभ्यासाशी बांधल्या गेलेल्या मनाला मोकळेपणा आला आणि तेव्हापासून त्याच्या घरात असण्याने शालिनीला कधी न मिळालेला आनंद मिळू लागला. तो कुठूनही आला, की आपले घर उगवत्या सूर्याच्या कोवळ्या प्रकाशाने भरून गेल्यासारखे तिला वाटायचे. फार मागे राहून गेलेले हसते-खेळते दिवस प्रदीपच्या वागण्यामुळे तिला पुनःप्रत्ययाचा आनंद देऊ लागले. पण आता ती अल्लड निरागस कुमारिका नव्हती किंवा उत्सुक नवथर सूनही नव्हती. जगाचे राहो, पण घरातलेच टक्केटोणपे खाऊन तावून सुलाखून निघालेली परिपक्व नव्हे, निबर गृहिणी होती. तटस्थ वृत्ती हा तिचा स्थायीभाव झालेला होता. कुठला हळवेपणा उरला असेल, तर तो इतकाच की कुणाचे दुःख तिला बघवत नसे. विशेषतः तरुण मुलींवर अन्याय होतोय असे नुसते पहाण्यात जरी आले, तरी तिचे मन आतल्या आत प्रक्षोभक भावनांनी कोंदून जाई आणि तिच्या कवितेतल्या शब्दांना आरपार छेदून जाणाऱ्या भाल्याची धार येई. तिच्या मते हे सगळे तिच्यापुरते मर्यादित होते. तिच्या मनातल्या खळबळीचे तिच्या कवितांमध्ये होणारे प्रकटन हेही तिच्याचपुरते होते पण आता त्या भावमय आंतरविश्वाचा भेद घेऊन गेला होता. दुसऱ्या कुणी नाही, तिच्याच लाडक्या लेकाने केला होता. तिचे इतके दिवस इकडे-तिकडे दडपून ठेवलेले कवितांचे कागद त्याला मिळाले तितके त्याने शोधून काढले होते. आपल्या मॉमने त्या कविता प्रसिद्धीसाठी कुठे कुठे पाठवाव्या म्हणून तो तिच्या खनपटीस बसला होता पण तिने त्याला निग्रहाने नकार दिला. साफ धुडकावून लावले. मात्र त्याने दिलेल्या डायरीत सापडल्या तेवढ्या कविता सुवाच्य अक्षरात लिहून द्यायचे तिला कबूल करावे लागले. आपल्या आईच्या विचित्र दुखण्यापासून प्रदीपचे वडील ढेपाळले होते. त्यातून मुलगी सासरी गेल्यापासून त्यांना फार एकटे वाटत असे. त्याच वेळी आई - मुलाचे गूळ-पीठ पाहूनही आपला रुबाब किंवा दरारा दाखवण्यासाठी डाफरणेही त्यांना जमेनासे झाले. त्याशिवाय ते स्वतःच स्वतःच्या प्रत्येक गोष्टीसाठी शालिनीवर अवलंबून होते, की त्याही दृष्टीने तिला विरोध करणे शहाणपणाचे ठरले नसते. आपण होऊनच तेही त्यांच्या संभाषणात भाग घेऊ लागले. पहाता-पाहता घरात प्रदीपच्या लग्नाबद्दल चर्चा होऊ लागली. शालिनी आपल्या तटस्थ वृत्तीप्रमाणे शांत होती. एकदा एका मुलीबद्दल चर्चा सुरू होती. ती मुलगी सगळ्यांनाच आवडली होती. प्रदीपचे वडील म्हणाले, "प्रदीप, आपल्याकडे सून म्हणून येणाऱ्या मुलीला पेटी वाजवता यायला हवी बरं का. माझ्या आईला फार नाही पण पट्ट्यांमधून सूर काढण्याइतके स्वरज्ञान होते. तिचा हार्मोनियम तीच घेऊन आली होती. आईची हौस म्हणून मी पण तिचा शब्द मानला. पेटी माहेरून आणली नाही म्हणून काय झालं ! अरे, तुझी आई फार कसबी कलाकार आहे बाबा ! माहित नाही तुला ? मला

वाटलं, एवढ्या तुमच्या गप्पा होतात, सगळंच माहित असेल. मग ती चांगली गायिका आहे, हे तरी ऐकलं आहेस का तू ? नाही ? मग कविता करते तुझी आई, हे पण माहीत नसेलच तुला." "तेवढंच फक्त माहीत आहे मला." प्रदीप बोलला. त्याचा स्वर उदास येत होता. पण तिकडे त्याच्या वडिलांचे लक्षच नव्हते. स्वतःचे बोलणे सुरू झाले, की मधे येणारे अडथळे खिसगणतीत नसत त्यांच्या. त्यांनी म्हटले, "अरे, तुझ्या आईचे काव्यगायनाचे कार्यक्रम चालत लग्नापूर्वी. मी जाणीवपूर्वक मोडीत काढलं ते. घरची बाई सारखी बाहेर असली की घराचे बारा वाजायला कितीसा उशीर ? आता जर तिला कार्यक्रम करायचे असले तर खुश्शाल कर म्हणावं. एवढंच काय प्रदीप तिच्या कवितांचा जर संग्रह काढायचा असेल तिला, तर येईल तो खर्च द्यायला तयार आहे मी. मग, एकूण काय, तुझ्या होणाऱ्या बायकोला पेटी वाजवता यायला हवी. वाजवायची वेळ येवो न येवो. बोटात कला हवी, काय शालिनी ?" प्रदीपच्या वडिलांनी आपले बोलणे आटोपले आणि ते खुशीने हसले.

क्षणभर कुणीच काही बोलले नाही. तिथे नुसती शांतता भरून राहिली त्या शांततेचा भंग करीत प्रदीपचे वडील म्हणाले, "म्हणजे हे ठरलं, असं समजायचं ना ? मुलगी आपल्याला तशी बरी वाटलीये ती. तिला जर का गाण्याचं अंग असलं आणि मुख्य म्हणजे पेटी वाजवता येत असली, की झालं. मग आपण त्यांना होकार कळवून टाकू." बोलता बोलता विषय संपल्यासारखे ते उठून उभे राहिले.

"तसं नाही." प्रदीप आपल्या वडिलांना म्हणाला, "तुम्ही मातृभक्त, म्हणून तुमच्या आईच्या इच्छेप्रमाणे सून आणलीत. आता मीही तुमच्याप्रमाणेच मातृभक्त आहे. तेव्हा यावेळी सून पसंत करायची जबाबदारी आईची आहे. ऐकतेयस ना आई ?" प्रदीप आईजवळ जात म्हणाला. आता हे नक्की चिडले असणार म्हणून शालिनीने धास्तावून ते उभे होते, त्या दिशेने नजर फिरवली. पण प्रदीपच्या आईचा हक्क महत्त्वाचा ठरणे हा आपला पराभव, की अपमान, की उपमर्द समजून तो माणूस, ते प्रदीपचे वडील, केव्हाच तिथून निघून गेलेले होते.

- सौ. शुभदा मुळ्ये

■■■

महाभारताचा कालसंगत अन्वय 'उत्तरायण'

● भास्कर लक्ष्मण भोळे

कोणत्याही साहित्यकृतीच्या आस्वाद प्रक्रियेत ती कोणत्या परिस्थितीत आणि मनःस्थितीत वाचली जाते या संदर्भाचा साहित्यशास्त्रात विचार झालेला आहे की नाही याची मला कल्पना नाही. पण रवींद्र शोभणे यांची उत्तरायण ही महाकादंबरी आजच्या जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वाचल्यामुळे तिची प्रत्ययकारिता वाढली आणि अधिक सखोल झाली असा माझा अनुभव आहे. प्रत्येक पिढीतील प्रतिभावंतांना शतकानुशतके खुणावत राहणे हे जर आर्ष महाकाव्यांच्या चिरंजीवित्वाचे गमक असेल तर त्याबाबतीत महाभारताच्या तुलनेत बहुधा जगातले कोणतेच महाकाव्य टिकणार नाही. उत्तरायणाच्या लेखकाला महाभारत कथेने असेच आकर्षित केले असून त्याने आजच्या दृष्टिकोनातून त्या महाकाव्याचा वेध घेतला आहे.

उत्तरायण वाचताना आजच्या तणावपूर्ण पेचप्रसंगाने समस्त मानवजातीपुढे उभे केलेले अनेक प्रश्न मनःपटलावर वारंवार उभे राहात होते. दहशतवादाचा भस्मासूर आणि त्याला गाडून टाकण्याच्या घोषित हेतूने देशोदेशीच्या निरपराध जनसामान्यांवर अग्निवर्षाव करत सुटलेल्या युद्धखोर महासत्ता हे आजचे भीषण वर्तमान आहे. जीवितवित्ताची अतोनात हानी गेल्या काही दिवसांपासून रोज होत असून आणखी काही काळ तरी ती थांबण्याची चिन्हे नाहीत. माणसांचा माणूसपणा नष्ट करून त्यांचे हिंस्त्र श्वापदांत रूपांतर करणारे दहशतवाद आणि युद्ध हे दुहेरी संकट माणसाला कोठे घेऊन जाणार आहे हे काळच सांगू शकेल.

अनुक्रमणिका

एक निश्चित की त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत, आणि मानवी हिंसेने त्यांच्यापेक्षा भीषण रूप शोधून सापडणार नाही. युद्धाला पर्याय नाही ही भाषा महाभारतातील कृष्णापासून अमेरिकेच्या बुशपर्यंत सर्वच महत्वाकांक्षी राज्यकर्त्यांनी इतिहासात प्रत्येक युद्धाच्या प्रसंगी केली आहे. एवढेच नाही तर प्रत्येक महायुद्धाच्या मुळाशी कोणते तरी नैतिक प्रयोजन असून अखेरी काहीतरी स्वागतार्ह निष्पत्ती झाली असल्याचे हवालेही दरवेळीच दिले गेले आहेत.

पण ती घोषित प्रयोजने आणि फलिते खरी असतात काय ? महायुद्धांकडे युगांताच्या दृष्टीने पाहून त्यातून अनिष्टाचा पाडाव, इष्टाचा विजय झाला आहे आणि मानवतेचा प्रवास उच्चतर व उन्नत अवस्थेपर्यंत झाला असा निर्वाळा देणे वस्तुस्थितीशी कितपत सुसंगत ठरेल ? युद्धाच्या मार्गाने कधीतरी शाश्वत शांतता, मानवी मूल्ये, निकोप समाज आणि न्यायपूर्ण राज्य, जनसामान्यांचे सौख्य आणि प्रतिष्ठा, सृजनशील शक्ती इत्यादी इष्ट तत्वांचा विकास घडून येऊ शकेल काय ? राक्षसी महत्वाकांक्षांना आणि पाशवी प्रवृत्तींना कायमचा पायबंद युद्धातून कधीतरी घालता येईल काय ? युद्धे खरोखरच अटळ, अनिवार्य आहेत काय ; 'धर्मयुद्ध' ही संज्ञा मुळातच वदतोव्याघाताचे उदाहरण आहे हेच महाभारतापासून आजतागायत असंख्य वेळा सिद्ध झालेले नाही काय ? युद्धातील जयपराजयाव्दारे एखादे तत्वज्ञान, एखादी मूल्यप्रणाली किंवा जीवनसरणी जगात प्रतिष्ठापित करता येते काय ? युद्धांत काही व्यक्ती किंवा देश जिंकतात पण माणुसकी मात्र हमखास हारतच असते या विधानाला एखाद्या तरी युद्धाचा अपवाद सांगता येईल काय ? या आणि अशा अनेक प्रश्नांचे मोहोळ उत्तरायण वाचताना मनात घोंगावत होते. पौराणिक कथावस्तू लेखक येथे हाताळत असला आणि तो मनाने त्या काळाशी तद्रूप झाल्याची साक्ष त्याची भाषा, शैली व प्रतिभासृष्टी सतत देत असली तरी त्याने आपले पाय आजच्या सामाजिक-राजकीय भूमीवर पक्के रोवलेले असल्यामुळे अद्भुत रंजनाच्या वा अंधश्रद्धांच्या तो मुळीच आहारी जात नाही. तर तर्ककठोर भूमिकेतूनच तो महाभारतातील पात्र-प्रसंगांना सामोरा जातो. त्यामुळे वर्तमानापासून दूर पळण्यासाठी नव्हे तर वर्तमानाचे सोपपत्तिक आकलन करण्यासाठी त्याचा हा लेखनप्रपंच आहे हे सहज जाणवते. त्यामुळेच उपरोक्त प्रश्नांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष वापर त्याच्याही मनात असल्याने प्रत्ययास येते. महाभारताच्या चौकटीतून आजच्या अनेकांगी जाणिवा व्यक्त करण्याची त्याची धडपडही लक्षात आल्यावाचून राहात नाही. त्यामुळेच आपापल्या काळाच्या परिप्रेक्ष्यातून या महाकाव्याकडे पाहण्याची पूर्वसूरींची परंपरा पुढे चालवत हा लेखक नव्या शतकाच्या दृष्टीने महाभारताचे अवगाहन करतांना येथे दिसतो.

इतिहास, भूगोल, भाषा, सामाजिक संबंध, धारणा, सवयी, संकेत इत्यादींसह

अनुक्रमणिका

महाभारताचा काळ कादंबरीकाराने अचूकपणे चितारला आहे. ज्या सहजतेने तो त्यासंबंधी लिहून जातो, ज्या समग्रतेने सर्व संबंधित तपशील वाचकापुढे ठेवतो त्यावरून कादंबरीच्या आशयद्रव्याशी असलेले त्याचे तादात्म्य दिसून येते. घडीव घोटीव सालंकृत आणि तरीही प्रवाही अशी त्याची भाषा आहे. भवन, प्रासाद, राजपथ, अश्वशाळा, गजशाळा, रत्नदीप, महाव्दारे, गवाक्ष, परकोट, प्रहरी, अग्निकुंड, शस्त्रशाळा वगैरे परिभाषा ते अशी सहजपणे वापरतात की जणू तिने सूचित होणाऱ्या व्यवहार विश्वाशी तो लेखक जवळून परिचित असावा. बीजधर्मी, क्षेत्रधर्मी, नियोग योनिज पुत्र, वंशसातत्य, दासीसंग वगैरे संकल्पना जणू सर्रास आणि स्वाभाविकपणे सभोवताली प्रचलित असाव्यात, नित्याच्या असाव्यात असा बेधडक ते त्यांचा उल्लेख करतात. राजवाड्यांच्या आत-बाहेरचेच नव्हेतर कृषकांच्या आणि सूत समाजाच्या वस्त्यांपर्यंतचे वास्तव-युद्धस्थितीमुळे त्यात उद्‌भवलेले ताणतणावांसह सांगण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. अलौकिक मानल्या गेलेल्या पात्रांना त्यांच्या विभूतितत्वाच्या वलयातून बाहेर काढून माणूसपणाच्या पातळीवर त्यांनी पाहिले आहे. त्यांच्या लोकोत्तरपणापेक्षा चारचौघांत आणून त्यांचे दुःख, जरा, वेदना, क्लेश त्यांनी प्रियजनांच्या मृत्यूने हेलावणे आणि जनरोषाचे लक्ष्य ठरणे, त्यांना अपराध भावनेने व्याकूळ करणे आणि स्वार्थाने अविवेकी करणे हे कादंबरीकाराला महत्वाचे वाटले आहे. त्यामुळे ती पात्रे जमिनीवर वावरताना पाहिल्यावर वाचतांना जवळची आणि विश्वसनीय वाटू लागतात.

महाभारतात इतर अनेक विषयांचा उहापोह प्रसंगवशात आला असला तरी युद्ध हा त्या महाकाव्याचा मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. युद्ध टाळण्याची हितावहता अधूनमधून त्यात सांगितली गेली असली आणि परिणामांव्दारे ती अप्रत्यक्षपणे अधोरेखित झाली असली तरी युद्धाची अटळताही वारंवार आली आहे. स्वाभाविकच युद्धाची तयारी, युद्धाचे नीतिशास्त्र आणि प्रत्यक्ष युद्ध वर्णने यांची त्यात रेलचेल आहे. महाभारतकारांचा कल युद्धाला अनुकूल असल्यामुळे हिंसेचे, पराक्रमाचे व नरसंहाराचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष समर्थन त्यांनी केले आहे. प्रसंगी युद्धाची तुलना ते यज्ञाशी करतानाही दिसतात. 'माणसे मेली तरी आत्मा अमर असतो, कपडे बदलल्याप्रमाणे तो देह बदलतो, मरणाराचे मरण पूर्वनिर्धारित असल्यामुळे मारणारा फक्त निमित्तमात्र असतो, आणि शस्त्रू हा शस्त्रूच असतो त्यात आप्त स्वकीय व परकीय असा फरक नसतो' भगवद् हे गीतेचे तत्त्वज्ञान एकूणच युद्धखोरीस पोषक आहे. शोधण्यांची भूमिका मात्र एकंदरीत युद्धाला प्रतिकूल दिसते. त्यांनी केलेली प्रत्यक्ष युद्ध प्रसंगाची वर्णने अगदी युद्धजन्य परिस्थितीत संपूर्ण समाज जीवनाची त्यांनी सांगितलेली होरपळ यावरून ते सहज लक्षात येते.

अनुक्रमणिका

युद्धातून कधीही शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही किंवा मानवी जगण्याशी संबंधित कोणत्याही प्रश्नांची उत्तरेही मिळू शकत नाहीत. युद्ध सदैव दु:खद क्लेशदायक आणि सर्वसंहारकच असते, आणि मानवी जीवनाच्या सर्वांगीण संपन्नतेच्या मुळावरच ते घाव घालते. युद्ध कधीच मानवी उन्नयनाचे व उर्जस्वलतेचे पूरक ठरू शकत नाही अशी युद्धविरोधी मल्लीनाथी शोभण्यांनी कृष्णाच्या तोंडी घातली आहे. युद्ध टाळण्याचे सारे प्रयत्न अपुरे ठरल्यानंतर युद्ध जेव्हा प्रत्यक्ष सुरू होते तेव्हा रणमैदानावरचे प्रसंग त्यांनी अशा स्वरूपात उभे केले आहेत की कोणालाही युद्धाची शिसारी यावी. तो प्रचंड मोठा नरसंहार, कृमिकीटकांप्रमाणे मारली जाणारी माणसे, स्वजनांचे निर्दय-निर्घृण हत्याकांड, मृत्यूचे भीषण तांडव, रक्ताचे पाट, मांसाचा चिखल, प्रेतांचे ढीग, मानवी तसेच युद्धोपयोगी जनावरांच्या अवयवांचा सडा, रथांची तुटलेली चाके, मोडून पडलेली हत्यारे, भाल्यांची विषारी टोके, जखमी सैनिकांच्या प्राणांतिक किंकाळ्या, मरणासन्न वीरांच्या कण्हण्यांचे आवाज, त्यांना बुडवून टाकणारे ढोल नगाऱ्यांचे ध्वनी, युद्ध नौवती, शंख गर्जना, कुजलेल्या प्रेतांचा आणि मानवी विष्टेची असह्य झालेली दुर्गंधी अशाप्रकारे पंचेंद्रियसंवेद्य स्वरूपात युद्धाचे भीषण वास्तव्य लेखकाने वाचकापुढे ठेवले आहे. केवळ कोणाच्या तरी सत्तापिपासेतून, स्वार्थातून वा आसक्तीतून उद्‌भवलेले हे समर प्रसंग सामान्य सैनिक कोणत्या प्रेरणेतून लढत असावेत ? कोणासाठी आणि कशासाठी ते जीवावर उदार झाले असावेत ? त्यांना या युद्धाच्या जयपराजयातून नेमके काय मिळणार आहे ? असे काही प्रश्नही त्यांनी अधूनमधून उभे केले आहेत.

सामान्य सैनिकांप्रमाणेच इतर जनसामान्यांसाठीही युद्ध किती जाचक असते हे शेतकरी, व्यापारी, वृद्ध, स्त्रिया वगैरेंच्या उदाहरणांतून लेखकाने दाखवले आहे. राज्यातल्या सर्व व्यक्तींवर व वस्तुमात्रावर राजाची मालकी असल्याचे सांगून दुर्योधनाची माणसे प्रजाजनांना कसे वेठीस धरत होते. त्यांच्याकडचे धनधान्य हिरावून घेउन मनमाना शेतसारा आणि करभार ते कसा उकळत होती ते प्रसंग बोलके आहेत. हवालदिल झालेला एक शेतकरी अशाच एका प्रसंगात मेघाला सांगतो की "हे अधर्माचं राज्य आहे. या राज्यात कशाला कोसळतोस ? इथे दुष्काळ पडू दे. भेगाळू दे ही भूमी. तहानेने व्याकुळ होऊन मरू दे इथे सगळे !" सक्तीची सैन्य भरती, बंद पडलेल्या बाजारपेठा, उभ्या पिकांची लूटमार, सैनिकांच्या शय्या सोबतीसाठी पकडून नेलेल्या स्त्रियांचे तळतळाट, या पाशवी शरीर संबंधातून उपजलेल्या कानीन पुत्रांमुळे फुगलेल्या सूतवस्त्या, सैनिकांच्या मृतदेहांवरचे अलंकार ओरबाडून नेण्यासाठी घारी-गिधाडांप्रमाणे युद्धभूमीवर घिरट्या घालणारी माणसे ही सारी युद्धजन्य वास्तव चित्रे अस्वस्था करतात. सर्व मानवी भावभावना करपून टाकणारे, कोरडा जीवघेणा व्यवहार जाणणारे आणि राखेतूनही घुमसणारे युद्ध

अनुक्रमणिका

मानवमात्रासाठी हितावह ठरूच शकत नाही. युद्धाचे जे गोडवे गातात, युद्धाला जे पराभवाचे व पौरुषाचे धर्मक्षेत्र मानतात, बाहुबळाला व शस्त्रसंभाराला सामर्थ्य समजात आणि युद्ध टाळण्याची भाषा करणाऱ्यांना षंढ ठरवतात ते सगळे मानवतेचे शत्रू असतात हा कादंबरीकाराने सुचकपणे दिलेला अभिप्राय आजच्या परिस्थितीत मोलाचा वाटतो.

एक प्रसंग या संदर्भात आवर्जून नमूद करण्याजोगा आहे. रणभूमीवरची मोडकीतुटकी शस्त्रे गोळा करून बैलगाडीत घालून निघालेल्या एका लोहाराला दुर्योधनाचे शिपाई अडवतात. शेतीची औजारे बनवण्याचा आपला धंदा असून सैनिकांसाठी निकामी झालेली ही शस्त्रे वितळवून आपण फाळ, फास, विळे-कोयते, बैलगाडयांच्या चाकांच्या वाटा तयार करू असे तो लोहार नम्रपणे सांगतो. शिपाई हेडलहप्पी करून त्याची गाडी परत फिरवतात. त्यातून दुय्यम दर्जाची का होईनात शस्त्रेच तयार करण्यास त्याला फर्मावतात. प्रसंग तसा साधाच आहे. पण 'शेती की शस्त्रनिर्मिती ?' या चिरंतन प्रश्नाला तो भिडणारा आहे. शेतकी विकासाची उपेक्षा करून आजही जे राज्यकर्ते अण्वस्त्रे तयार करण्यावरच पैसा उधळतात ते दुर्योधनाच्या त्या शिपायांचे वारसदारच शोभतात !

युद्ध हे कधीच 'धर्मयुद्ध' असू शकत नाही. युद्धात ज्यांचे पारडे जड होईल त्या पक्षाच्या स्वार्थानुरूप धर्मयुद्धाच्या व्याख्या बदलत असतात. कौरव आणि पांडव या उभयतांनी जसे धर्मयुद्धाचे संकेत झुगारले होते तसेच जवळपास सर्वत्र युद्धमग्न शक्तींनी सर्व काळात केले आहे. आज अफगणिस्तानवर बॉम्बगोळयांच्या पाठोपाठ अन्नाची पाकिटे विमानातून उधळणाऱ्या अमेरिकेला युद्धग्रस्त जनसामान्यांबद्दल फार आंतरिक कळवळा आहे अशा भ्रमात कोणी राहू नये ! तो ज्यांना असतो ते निरपराध नागरिकांवर युद्धाचे संकट कधी लादतच नसतात. युद्ध पुकारण्यामागची घोषित कारणे वरकरणी आकर्षक व पटणारी असली तरी तद्दन दिशाभूल करणारी असतात हेही एक पूर्वापार प्रत्ययास आलेले सत्य आहे. कधी हिटलरचा आर्यवंश शुद्धीचा दुराग्रह, तर कधी लोकशाहीसाठी हे जग सुरक्षित करण्याच्या दोस्त राष्ट्रांच्या वल्गना, तर आज दहशतवादाचा सार्वत्रिक व कायमचा बंदोबस्त करण्याच्या प्रतिज्ञेने जगावर युद्ध लादण्याचा अमेरिकेचा उपद्व्याप ही सारी युद्धखोरीवर मुखवटे चढवण्याची भाषा आहे ! महाभारत युद्धापासून ही परंपरा सुरू आहे. दुर्योधनालाही आर्यवंश शुद्धीच्या भ्रमाने झपाटले होते. त्याचा पराभव झाल्यानंतर आर्य-अनार्य सहजीवनाच्या उच्चतर स्तरावरील मानवतेचा जय झाल्याची भाषा कृष्णाने केली होती. ती सुद्धा तितकीच भ्रामक होती हे कालांतराने सिद्ध झाले. युगान्ताची भाषा त्यामुळेच युद्धांच्या संदर्भात फारच दिशाभूल करणारी ठरते. युद्धाला पर्याय शोधला तरच खरा युगान्त होवून खऱ्या नवसमाजनिर्मितीची प्रक्रिया वैश्विक पातळीवर सुरू होवू शकते. सैद्धांन्तिक पातळीवर का होईना ही शक्यता महात्मा

युद्धातून कधीही शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही किंवा मानवी जगण्याशी संबंधित कोणत्याही प्रश्नांची उत्तरेही मिळू शकत नाहीत. युद्ध सदैव दुःखद क्लेशदायक आणि सर्वसंहारकच असते, आणि मानवी जीवनाच्या सर्वांगीण संपन्नतेच्या मुळावरच ते घाव घालते. युद्ध कधीच मानवी उन्नयनाचे व उर्जस्वलतेचे पूरक ठरू शकत नाही अशी युद्धविरोधी मल्लीनाथी शोभण्यांनी कृष्णाच्या तोंडी घातली आहे. युद्ध टाळण्याचे सारे प्रयत्न अपुरे ठरल्यानंतर युद्ध जेव्हा प्रत्यक्ष सुरू होते तेव्हा रणमैदानावरचे प्रसंग त्यांनी अशा स्वरूपात उभे केले आहेत की कोणालाही युद्धाची शिसारी यावी. तो प्रचंड मोठा नरसंहार, कृमिकीटकांप्रमाणे मारली जाणारी माणसे, स्वजनांचे निर्दय-निर्घृण हत्याकांड, मृत्यूचे भीषण तांडव, रक्ताचे पाट, मांसाचा चिखल, प्रेतांचे ढीग, मानवी तसेच युद्धोपयोगी जनावरांच्या अवयवांचा सडा, रथांची तुटलेली चाके, मोडून पडलेली हत्यारे, भाल्यांची विषारी टोके, जखमी सैनिकांच्या प्राणांतिक किंकाळया, मरणासन्न वीरांच्या कण्हण्यांचे आवाज, त्यांना बुडवून टाकणारे ढोल नगाऱ्यांचे ध्वनी, युद्ध नौबती, शंख गर्जना, कुजलेल्या प्रेतांचा आणि मानवी विष्टेची असह्य झालेली दुर्गंधी अशाप्रकारे पंचेंद्रियसंवेद्य स्वरूपात युद्धाचे भीषण वास्तव्य लेखकाने वाचकापुढे ठेवले आहे. केवळ कोणाच्या तरी सत्तापिपासेतून, स्वार्थातून वा आसक्तीतून उद्भवलेले हे समर प्रसंग सामान्य सैनिक कोणत्या प्रेरणेतून लढत असावेत ? कोणासाठी आणि कशासाठी ते जीवावर उदार झाले असावेत ? त्यांना या युद्धाच्या जयपराजयातून नेमके काय मिळणार आहे ? असे काही प्रश्नही त्यांनी अधूनमधून उभे केले आहेत.

सामान्य सैनिकांप्रमाणेच इतर जनसामान्यांसाठीही युद्ध किती जाचक असते हे शेतकरी, व्यापारी, वृद्ध, स्त्रिया वगैरेंच्या उदाहरणांतून लेखकाने दाखवले आहे. राज्यातल्या सर्व व्यक्तींवर व वस्तुमात्रावर राजाची मालकी असल्याचे सांगून दुर्योधनाची माणसे प्रजाजनांना कसे वेठीस धरत होते. त्यांच्याकडचे धनधान्य हिरावून घेउन मनमाना शेतसारा आणि करभार ते कसा उकळत होती ते प्रसंग बोलके आहेत. हवालदिल झालेला एक शेतकरी अशाच एका प्रसंगात मेघाला सांगतो की "हे अधर्माचं राज्य आहे. या राज्यात कशाला कोसळतोस ? इथे दुष्काळ पडू दे. भेगाळू दे ही भूमी. तहानेने व्याकुळ होऊन मरू दे इथे सगळे !" सक्तीची सैन्य भरती, बंद पडलेल्या बाजारपेठा, उभ्या पिकांची लूटमार, सैनिकांच्या शय्या सोबतीसाठी पकडून नेलेल्या स्त्रियांचे तळतळाट, या पाशवी शरीर संबंधातून उपजलेल्या कानीन पुत्रांमुळे फुगलेल्या सूतवस्त्या, सैनिकांच्या मृतदेहांवरचे अलंकार ओरबाडून नेण्यासाठी घारी-गिधाडांप्रमाणे युद्धभूमीवर घिरटया घालणारी माणसे ही सारी युद्धजन्य वास्तव चित्रे अस्वस्था करतात. सर्व मानवी भावभावना करपून टाकणारे, कोरडा जीवघेणा व्यवहार जाणणारे आणि राखेतूनही घुमसणारे युद्ध

मानवमात्रासाठी हितावह ठरूच शकत नाही. युद्धाचे जे गोडवे गातात, युद्धाला जे पराभवाचे व पौरुषाचे धर्मक्षेत्र मानतात, बाहुबळाला व शस्त्रसंभाराला सामर्थ्य समजात आणि युद्ध टाळण्याची भाषा करणाऱ्यांना षंढ ठरवतात ते सगळे मानवतेचे शत्रू असतात हा कादंबरीकाराने सुचकपणे दिलेला अभिप्राय आजच्या परिस्थितीत मोलाचा वाटतो.

एक प्रसंग या संदर्भात आवर्जून नमूद करण्याजोगा आहे. रणभूमीवरची मोडकीतुटकी शस्त्रे गोळा करून बैलगाडीत घालून निघालेल्या एका लोहाराला दुर्योधनाचे शिपाई अडवतात. शेतीची औजारे बनवण्याचा आपला धंदा असून सैनिकांसाठी निकामी झालेली ही शस्त्रे वितळवून आपण फाळ, फास, विळे-कोयते, बैलगाडयांच्या चाकांच्या वाटा तयार करू असे तो लोहार नम्रपणे सांगतो. शिपाई हेडलहप्पी करून त्याची गाडी परत फिरवतात. त्यातून दुय्यम दर्जाची का होईनात शस्त्रेच तयार करण्यास त्याला फर्मावतात. प्रसंग तसा साधाच आहे. पण 'शेती की शस्त्रनिर्मिती ?' या चिरंतन प्रश्नाला तो भिडणारा आहे. शेतकी विकासाची उपेक्षा करून आजही जे राज्यकर्ते अण्वस्त्रे तयार करण्यावरच पैसा उधळतात ते दुर्योधनाच्या त्या शिपायांचे वारसदारच शोभतात !

युद्ध हे कधीच 'धर्मयुद्ध' असू शकत नाही. युद्धात ज्यांचे पारडे जड होईल त्या पक्षाच्या स्वार्थानुरूप धर्मयुद्धाच्या व्याख्या बदलत असतात. कौरव आणि पांडव या उभयतांनी जसे धर्मयुद्धाचे संकेत झुगारले होते तसेच जवळपास सर्वत्र युद्धमग्न शक्तींनी सर्व काळात केले आहे. आज अफगणिस्तानवर बॉम्बगोळयांच्या पाठोपाठ अन्नाची पाकिटे विमानातून उधळणाऱ्या अमेरिकेला युद्धग्रस्त जनसामान्यांबद्दल फार आंतरिक कळवळा आहे अशा भ्रमात कोणी राहू नये ! तो ज्यांना असतो ते निरपराध नागरिकांवर युद्धाचे संकट कधी लादतच नसतात. युद्ध पुकारण्यामागची घोषित कारणे वरकरणी आकर्षक व पटणारी असली तरी तद्दन दिशाभूल करणारी असतात हेही एक पूर्वापार प्रत्ययास आलेले सत्य आहे. कधी हिटलरचा आर्यवंश शुद्धीचा दुराग्रह, तर कधी लोकशाहीसाठी हे जग सुरक्षित करण्याच्या दोस्त राष्ट्रांच्या वल्गना, तर आज दहशतवादाचा सार्वत्रिक व कायमचा बंदोबस्त करण्याच्या प्रतिज्ञेने जगावर युद्ध लादण्याचा अमेरिकेचा उपद्व्याप ही सारी युद्धखोरीवर मुखवटे चढवण्याची भाषा आहे ! महाभारत युद्धापासून ही परंपरा सुरू आहे. दुर्योधनालाही आर्यवंश शुद्धीच्या भ्रमाने झपाटले होते. त्याचा पराभव झाल्यानंतर आर्य-अनार्य सहजीवनाच्या उच्चतर स्तरावरील मानवतेचा जय झाल्याची भाषा कृष्णाने केली होती. ती सुद्धा तितकीच भ्रामक होती हे कालांतराने सिद्ध झाले. युगान्ताची भाषा त्यामुळेच युद्धांच्या संदर्भात फारच दिशाभूल करणारी ठरते. युद्धाला पर्याय शोधला तरच खरा युगान्त होवून खऱ्या नवसमाजनिर्मितीची प्रक्रिया वैश्विक पातळीवर सुरू होवू शकते. सैद्धांन्तिक पातळीवर का होईना ही शक्यता महात्मा

गांधींना दिसली होती. त्यामुळेच ते सहस्रकातील द्रष्टे विचारवंत ठरतात ! त्यांच्या आधी गौतम बुद्धाला ती जाणिव झाली होती. कादंबरीकार त्या टप्प्यापर्यंत पोचत नाही ही त्याची मर्यादा आहे. 'उत्तरायण' ची संभाव्य महानता त्यामुळे प्रत्यक्षात येउ शकलेली नाही.

असे होण्याचे एक कारण जाणवते ते या कादंबरीच्या लेखकानेच सांगितलेल्या निर्मितीप्रक्रियेशी निगडीत असावे. मुळात राधेय-कौतेय परंपरेतील 'गांगेय' नामक भीष्म पितामहाच्या जीवनावरची कादंबरी शोभण्यांना लिहायची होती. काही कारणांनी तो प्रयत्न त्यांनी सोडला आणि अधिक व्यापक परिप्रेक्ष्यातून उत्तरायणची मांडणी केली. भीष्म हाच या निवेदनाचा अक्ष त्यांनी मनात बाळगला असला तरी युगान्त संकल्पनेच्या मोहात पडल्यामुळे युद्धाशी संबंधित सामाजिक-वांशिक-राजकीय व आर्थिक पैलूंवर त्यांनी प्रकाश टाकला. यातील ओढाताण कादंबरीच्या संपूर्ण विस्तारात वाचकाला सतत जाणवत राहते. एका बाजूने हस्तिनापूरच्या सिंहासनाच्या सेवेसाठी आयुष्य निष्ठापूर्वक समर्पित करणारा भीष्म लेखकाला धरून ठेवतो तर दुसऱ्या बाजूने कुरुवंशाच्या पाच पिढयांच्या त्या साक्षीदाराला वंशाचा सर्वनाश का थोपवता येत नाही याच्या कारणांचा शोध घेत लेखक निघतो. हतबुद्ध, किंकर्तव्यमूढ, अगतिक, दुभंगलेला, दुःखातिरेकाने अंतर्बाह्यच कोसळलेला, पौष-पोषक भावनेने सतावणारा पांडवांचा पक्षपाती असूनही कौरवांचा सेनापती म्हणून वावरताना धर्माधर्म्य विवेकात गटांगळया खाणारा भीष्म शोभण्यांनी समर्थपणे उभा केला आहे. तसेच वंशशुद्धीची भाषा आणि शंभर टक्के कौरव-पांडवांचे नियोगातून झालेले जन्म यातील अंतर्विरोधही त्यांनी अचूकपणे टिपला आहे. या विपर्यस्त समजुतींचा व प्रथांचा सर्वात दुर्दैवी बळी तत्कालीन स्त्रियांना कसे पडावे लागत होते हे तर त्यांनी असंख्य उदाहरणांसह स्पष्ट केले आहे.

राण्या, राजकन्या असोत, सामान्य घरच्या स्त्रिया असोत की दासी, वारांगना असोत तत्कालीन समाजात स्त्रियांचे स्थान केवळ शोभेच्या बाहुल्यांपेक्षा वरचे नव्हते हे कैक प्रसंगामधून लेखक सांगतो. स्त्रियाच्या संदर्भातील 'बीज क्षेत्रा'ची परिभाषा तिच्या सर्व लक्षितांसह येथे सर्रास वापरली जाते, भावविरहित संभोगाचे प्रसंग केवळ नियोगासाठी परपुरुषांची शय्या सजवणाऱ्या अभागिनीवरच नव्हेत तर पतींच्या पुत्रांना प्रसवणाऱ्या 3सुपीक2 मातांवरही जन्मभर येत असल्याची उदाहरणे येथे अपवादात्मक नाहीत. स्त्री ही वंशवर्धिनी असते किंवा मग पुरुषांची वासनापूर्ती करणारी मादी असते ही धारणा समाजाच्या मनीमानसी पक्की रुजलेली असल्यामुळे सैनिकांना राजरोस बायकांचा पुरवठा करणे, राजघराण्यातील पुरुषांचा कोणत्याही दासीशी संग क्षम्य मानणे किंवा संवादरहित पशुपातळीवरचे संभोगच स्वाभाविक समजणे यात त्यामधे कोणालाच काही गैर वाटत

नसावे ! 'स्वतः दास झालेला पती, पत्नीला कसा काय पटावर लावू शकतो ?' हा द्रौपदीचा प्रश्न अशा समाजात मग अनुत्तरित राहतो यात नवल ते काय ? कर्ण, विदूर, एकलव्यादिकांच्या निमित्ताने तत्कालीन समाजातील आर्य-अनार्य, क्षात्र-सूत, ब्राम्हण-शूद्र या संबंधाचे ताणेवाणे आणि कुमारी मातेचा प्रश्नही चर्चा विषय झाला आहे.

वंशशुद्धीच्या भ्रममूलक तत्वज्ञानाचा निर्णायक पराभव महाभारत युद्धात झाला असून सर्वसमावेशक समाजआदर्शाचा विजय झाला असे खरोखरच म्हणता येईल काय? लेखक कृष्णाच्या तोंडून तसे म्हणताना दिसतो. दुर्योधन आणि त्याचा कौरव पक्ष आर्यांची वंशशुद्धी व वंश-श्रेष्ठत्वाच्या भ्रमाने अविवेकी झाल्यामुळे विनाशाच्या आणि वंशविच्छेदाच्या वाटेने गेले, आणि पांडवांनी मात्र काळाची पावले ओळखून अनार्यवंशीयांशी जवळीक साधली. त्यातून त्यांनी आपली ताकद तर वाढवलीच शिवाय संहारातून सृजनाकडे, व्यायर्तकतेतून सर्वसमावेशतेकडे, ऱ्हासातून उन्नतावस्थेकडे समाजाला घेवून जाण्याचे मौलिक महत्वाचे कार्यही पार पाडले असा अभिप्राय कृष्णाने दिला आहे. लेखकाला तो मान्य असावा असे त्यांच्या मांडणीवरून दिसते. पण त्याचबरोबर भीष्माचार्यांच्या मृत्यूनंतर जे घडले ते पाहता कृष्णाच्या अभिप्रायावर प्रश्नचिन्ह लागल्याचेही त्याला जाणवते. अशा शृंगापत्तीत लेखक सापडल्यामुळे इतक्या उत्तम कादंबरीचा तिच्या साक्षेपाला साजेसा शेवट तो करू शकलेला नाही असे म्हणणे क्रमप्राप्त ठरते.

भीष्माला कादंबरीचा अक्ष ठेवण्यावर लेखक ठाम राहिला असता तर भीष्माच्या निधनाच्या प्रसंगावरच त्याने कादंबरी संपवली असती तसे न करता एक स्वतंत्र अध्याय त्यापुढे जोडून लेखकाने अश्वत्थाम्याच्या भळभळत्या जखमेच्या प्रतीकातून सूड वैराग्नीचे सातत्य सूचित केले आहे. पण त्याचवेळी संहारसत्रातही स्वतःची सृजनशक्ती झाकून ठेवलेल्या युयुत्सूच्या 'सुपीक भूमी कसली जावो' या प्रार्थनेला लेखकाने कृतिशीलतेची डूबकी दिली आहे. जोडीलाच मोडून पडलेल्या पिकांकडे पाहून खचून न जाता पुन्हा भूमी नांगरण्यास कंबर कसणाऱ्या कृषिवलाचाही हवाला दिला. यादवांमध्ये माजलेली दुही आणि चौफेर पेटलेल्या वणव्यांच्या आगेमागेच ऋतुस्नान झालेल्या कुरुक्षेत्राच्या भूमीचे आणि तिथल्या राखेतून इवल्याशा नाजूक पानांच्या रुपाने अंकुरलेल्या जीगिषायुक्त बीजाचे वर्णन करून लेखकाने ही कादंबरी संपवली आहे. हा त्याचा प्रयत्न ओढूनताणून आशावादी सुरावटीवर थांबण्याचा तर वाटतोच, शिवाय त्या धावत्या व त्रोटक वर्णनांमधून कादंबरीचे भरतवाक्यच हरवून बसते ! पुढच्या आवृत्तीत जमल्यास लेखकाने यावर विचार करावा असे सुचवावेसे वाटते.

- डॉ.भा.ल.भोळे, नागपूर

■■■

स्मरण - मालतीबाई बेडेकरांचे

● डॉ. सौ. मालती निमदेव

मालतीबाई बेडेकर हे नाव मराठी वाङ्मयाच्या इतिहासात एखाद्या तेजस्वी दीपस्तंभाप्रमाणे तळपणारे आहे. मराठी साहित्यावर त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा पृथगात्म ठसा उमटला आहे.

बाळूताई खरे - विभावरी शिरूरकर - मालतीबाई बेडेकर या तीनही नावांनी विविध प्रकारचे लेखन करणारी एकच स्त्री. बाळूताई खरे व मालतीबाई बेडेकर या नावांनी वैचारिक व संशोधनात्मक लेखन व नाट्यलेखन केले तर विभावरी शिरूरकर या नावाने कथा, कादंबऱ्यांचे लेखन केले. या तीनही नावाने केलेल्या लेखनामागे त्यांची जीवनानुभवाला थेट भिडण्याची वृत्ती, समाजाप्रती जिव्हाळा, स्त्रीजीवनाबद्दल वाटणारा विलक्षण कळवळा आणि त्याचं द्रष्टेपण दिसून येतं. बाळूताई खरे, विभावरी शिरूरकर, मालतीबाई बेडेकर या तीनही नावांनी केलेल्या लेखनात एक अनुबंध दिसून येतो. त्यांचे लेखन समाजाला विचार करायला लावणारे होते. मग तो कथासंग्रह असो, कादंबरी असो की वैचारिक लेखन असो.

१९३३ साली आजच्या तुलनेत अतिशय पारंपारिक, रूढिप्रिय काळातल्या समाजाला 'कळ्यांचे निःश्वास' या पहिल्याच पुस्तकाने खडबडून जागे करण्याचा 'मान' विभावरी शिरूरकरांनी मिळविला. त्या धक्क्यातून पुरते सावरण्यापूर्वीच हिंदोळ्यावर (१९३४) चा दुसरा बॉम्ब समाजावर टाकला आणि मग विभावरी शिरूरकरांच्या कथा कादंबऱ्या येतच राहिल्या. समाजातल्या नव्या

प्रश्नांना घेऊन. विभावरी शिरूरकर या नावाबरोबर जोडला गेला आहे तो स्त्रीमुक्तीचा आद्य हुंकार आणि त्यासाठी त्यांनी केलेली साहित्यविश्वातील बंडखोरी.

विभावरी शिरूरकर म्हणजे स्त्रीजीवनाविषयीचं काही लिहिणाऱ्या लेखिका असा समज होत चालला असतानाच 'बळी' (१९५०) ही नितांतसुंदर कादंबरी लिहून त्यांनी मराठी साहित्यात नवेच दालन खुले केले. तोपर्यंत कोणालाही न दिसलेले पशुवत् जीवन जगणाऱ्या मांगगारुडी समाजाचे दुःख लिहिताना त्यांचे अंतःकरण त्या दलित समाजाप्रती वाटणाऱ्या करुणेनं ओतप्रोत भरलेलं होतं. वर्ण-जातीच्या कुंपणापलीकडे जाऊन व्यापक अनुभवातून लिहिलेली त्यांची ही पहिलीच नायकप्रधान कादंबरी 'बळी'. दलित वाङ्मय नावाचा प्रवाह उदयाला यायचाच होता. त्यावेळी एका दलितेतर स्त्रीने मांग-गारुडी समाजातील आबाची ओळख समाजाला करून दिली. 'बळी' ने मराठी कादंबरीतील मानाचे स्थान कायम केले.

विभावरी शिरूरकरांनी आपल्या वडिलांच्या जीवनावर खरे मास्तर (१९९३) ही कादंबरी वयाच्या ८८ व्या वर्षी लिहिली. आणि या वयातही आपली प्रतिभा तेजस्वी असल्याचे सिद्ध केले. त्यात अनेक सामाजिक व त्या त्या काळाविषयीचे संदर्भ आहेत. ही चरित्रात्मक कादंबरी म्हणजे एका सामान्य माणसाच्या ध्येयवेडाने पछाडलेल्या जीवनाचा संघर्ष.

'कळ्यांचे निःश्वास' या विभावरी शिरूरकर हे टोपणनाव घेऊन लिहिलेल्या पहिल्याच पुस्तकातून त्यांचे द्रष्टेपण दिसते. आज ७० वर्षे उलटून गेली तरी कळ्यांचे निःश्वास तेवढेच प्रस्तुत आहे. त्या काळातील स्त्रीजीवन-विषयक जे ज्वलंत प्रश्न होते त्यालाच त्यांनी हात घातला. प्रौढ, कमावत्या मुलींच्या मनातल्या भावना आईवडीलच समजू शकत नाहीत; मग समाज फक्त बंधने घालण्यापुरताच उरला तर नवल कसले ? ही तेव्हाची सामाजिक वस्तुस्थिती असूनही समाजाने झापडे बांधली होती. अशा वेळी अत्यंत धैर्याने स्त्रीबद्दलचा कैवार घेऊन आणि कळ्यांच्या एकाकीपणाच्या दुःखाला चिरून जाणारी कुशल लेखणी विभावरी शिरूरकरांच्या रूपाने लाभली. मातृदेवोभव 'पितृदेवोभव' च्या विश्वासाला तडा गेला. समाज कळ्यांच्या निःश्वासांनी हादरला.

मुलींच्या दाखवण्याचे कार्यक्रम, प्रत्येक वेळी बघायला येणाऱ्या व्यक्तीबद्दल वाटणारी ओढ आणि अखेर अपयश. यातून मुलींची तेव्हाही सुटका नव्हती आणि ७० वर्षांनंतर आजही ते दुष्टचक्र तसेच चालू आहे.

मग समाजात एखादी अंतःकरणाचे रत्नदीप मधली यमू बंडखोरी करून परजातीच्या मुलाशी प्रेमविवाहाचा मार्ग स्वीकारते आणि हिंदु लग्नाची सट्टेगिरी उघडून लावते 'शेकडो तऱ्हांची मनःशल्ये अशी आहेत की ती नष्ट करण्यास कोणताही

मानवनिर्मित कायदा असमर्थ ठरणार.' असे 'कळ्यांचे निःश्वास' च्या सुरवातीच्या अभिप्रायात लेखिकेने म्हटले आहे. त्या दृष्टीने कुठल्याही कायद्याने नाहीसे न होणाऱ्या दुःखाची जाणीव विभावरी शिरूरकरांनी समाजाला करून दिली. स्त्रीच्या अशा भावनिक दुःखाला त्यांचे मन अनेक वर्षांपासून टिपत होते.

मालतीबाई बेडेकरांनी जवळ जवळ एक शतक पाहिले. समाजातील स्त्रीपुरुषांच्या जीवनाचे सूक्ष्म निरिक्षण करताना त्यांची भूमिका समाजकल्याणाची तर होतीच त्याचबरोबर एखाद्या कठोर शिक्षकाचीपण होती. स्त्रीच्या भावनांची समाजाने कदर करावी असे सांगत असतानाच स्त्रीने तिला मिळालेल्या स्वातंत्र्याचा गैरफायदा घेऊन स्वैराचाराकडे झुकू नये हा महत्त्वाचा इशाराही त्यांनी वेळोवेळी दिला. 'दर्शनी परिणामावर जर समाजाचं नीतिशास्त्र अवलंबून आहे तर ते पाहूनच समाजरचना बदलेपर्यंत स्त्रियांनी मोहाला बळी पडण्यापूर्वी शंभर वेळा विचार करावा.' (त्यांचा शाप पृ.११)

अलिकडे झपाट्याने बदलत चाललेले समाजातले वातावरण, स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या अवास्तव कल्पना, तरुणींचे देहप्रदर्शन करणारे पोशाख हे पाहून मालतीबाई विलक्षण व्यथित होत होत्या. नाराजी व्यक्त करीत होत्या. अधोगतीला जाणाऱ्या समाजाबद्दल चिंता व्यक्त करीत होत्या.

अस्पृश्यता-निर्मूलनाचे धडे बाळूताई खरेंनी श्री.म.माट्यांकडून घेतलेले, पुरोगामित्वाचे धडे वडील अनंत महादेव खरे यांच्याकडून घेतलेले तर कष्टाचे धडे त्या काळात म्हैस विकत घेऊन डेअरीचा व्यवसाय करणाऱ्या स्वतःच्या आईकडूनच घेतलेले. या सगळ्या संस्कारांनी त्यांचा पिंड बनला. त्याला सखोल चिंतनाची, समाजशास्त्रीय दृष्टिकोणाची आणि प्रगल्भ प्रतिभेची जोड मिळाली. आयुष्यभर मालतीबाई बेडेकरांनी माणुसकीचीच कामे केली. स्वतःच्या घरी अनेक जातीच्या अनेक मुलींना त्यांनी लहानाचे मोठे केले. त्यांची लग्ने लावून दिली. त्यामुळे घरात कधी कधी वाद होत असत. पण मालतीबाई आपल्या भूमिकेशी ठाम असत. विश्राम बेडेकरांनी 'एक झाड दोन पक्षी' मध्ये पुढील प्रसंग सांगितला आहे.

'हा माणूसघाणा. त्यांना हव्यास गावं गोळा करण्याचा. कुणी अनाथ मुलगी असल्याचे त्यांना कळले तर तिला घरात आणून ठेवीत, वाढवीत, तिच्या डोक्यातल्या उवा काढण्यापासून सगळे करीत. शेवटी तिचे लग्न लावून देत. सातआठ बाहेरची अनेक जातींची मुले यांच्या घरात बाळूताईंनी आपल्या मुलाला सोबती म्हणून वाढविली. त्यांची शिक्षणे सोपी केली. मुलींची लग्ने लावून दिली. याला वाढत्या वयाच्या मुलींच्या वागण्याचा अनुभव नव्हता. एकदा एका मुलीने बाहेरच्या मुलाशी मैत्री केली. त्याने तिला प्रेमाने काही भेटी दिल्या. मग मुलीने त्या मुलाला तोडून टाकले. तेव्हा त्या मुलाने

आपल्या वस्तूंची हिने चोरी केली म्हणून पोलिसात तक्रार गुदरली ! हा चिडून गेला. मुलगी सांगितलेले ऐकेना. तेव्हा याने बायकोला (मालतीबाईंना) सांगितले, "हे तुझे उद्योग उद्यापासून बंद कर आणि या मुलीला जायला सांग. आता एक ती तरी इथं राहील नाहीतर मी !" बाळूताई ताडकन् म्हणाल्या, "तीच राहील घरात. नाहीतरी तू घरात नसतोसच ! तिला बाहेर काढलं तर ती कदाचित वेश्यागृहात जाऊन पडेल !"

सामाजिक जीवन आणि वैयक्तिक जीवन यांमधून विभावरीबाईंनी घेतलेल्या अनुभवांचा प्रवास एकाच दिशेने होताना दिसतो. त्यांचे अनुभवविश्व पीडितांचे, शोषितांचे असल्याने त्यात हुंदके आणि उसासे आहेत. उपेक्षित जीवांना शोधून काढून त्यांना आपल्या साहित्यातून चित्रित करण्याची किमया मालतीबाईंना साधली होती. 'बळी' तील मांग-गारुड्यांच्या व्यक्तिचित्रणाबरोबरच 'मोरणी', 'चंद्रा भिकारीण' यांनाही त्यांनी शब्दबद्ध केले. 'जाई' ही तर सोनार जातीतील शिकलेल्या स्त्रीची करुण कहाणी आहे. जाई स्वतःच्या अपत्याचे जीवन सुसंस्कारित व्हावे म्हणून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जो संघर्ष करते तो बघितला म्हणजे जाई स्त्रीशक्तीचे प्रतीकच वाटू लागते.

'अनलेस आय ब्लीड आय डोण्ट राईट' हे विभावरी शिरूरकरांचे तत्त्व असल्यामुळे त्यांचे सर्व ललितलेखन जिव्हाळ्यांच्या स्पर्शाने फुलल्याचे जाणवते. स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने 'हिंदोळ्यावर' या कादंबरीचे स्थान फार श्रेष्ठ दर्जाचे ठरते. कारण त्यातील नायिका परित्यक्ता असूनही आपल्या आई होण्याच्या नैसर्गिक भावनेच्या पूर्तीची मागणी करते. त्यासाठी जबरदस्त मानसिक संघर्ष करते. धड सधवा नाही की धड विधवा नाही अशा अवस्थेत जीवन जगणाऱ्या परित्यक्तांना घटस्फोटाच्या कायद्याची काहीच सोय नव्हती. 'हिंदोळ्यावर' ची नायिका अचलाच्या निमित्ताने परित्यक्तेला घटस्फोट हवा या विचाराचे मंथन समाजात सुरू झाले. घटस्फोटाचा कायदाही यानंतरच झाला.

ज्या काळात पुरुषप्रधान आदर्शांचीच पूजा साहित्यातून होत होती. त्या काळात अत्यंत वास्तववादी, परंपरेला धक्का देणारे, खरेखुरे, तरीही संयत असे स्त्रीजीवनातील समस्या उलगडून दाखविणारे लेखन करणे अत्यंत धाडसाचे होते. म्हणूनच हे धाडस करतांना बाळूताई खरे यांना 'विभावरी शिरूरकर' या टोपणनावाची गरज पडली आणि झालेही तसेच. विभावरी शिरूरकर या लेखिकेला शोधून ठार मारण्यापर्यंत टीकाकारांची आणि समाजातील संस्कृतिरक्षकांची मजल गेली. वादळे उठली आणि शमलीही पण १९५० पर्यंत म्हणजे तब्बल १७ वर्षे मालतीबाई बेडेकर प्रकट झाल्या नाहीत. १९५० साली 'साखरपुडा' चित्रपटाच्या पटकथा लेखिका म्हणून त्यांनी सही केली. मालतीबाई बेडेकर उर्फ विभावरी शिरूरकर आणि अचानक गौप्यस्फोट झाला.

मालतीबाईंनी त्यांच्या प्रकृतिधर्माशी जे अनुभव जुळले त्याचाच आविष्कार

अनुक्रमणिका

आपल्या साहित्यातून केला. जे-जे उत्कटपणे जाणवले ते अत्यंत सहृदयतेने, प्रभावीपणे, प्रांजलपणे त्यांनी लिहिले. त्यांची अस्वस्थता, हुरहूर आणि तळमळ थेट वाचकांच्या मनापर्यंत पोहोचते. म्हणूनच विभावरींच्या वाङ्मयाचे विषय आजही जिवंत आणि ताजे वाटतात.

आपल्या वैचारिक आणि संशोधनात्मक लेखनातून मालतीबाईंनी समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले असून शासनाने आणि समाजाने त्याचा विचार करायला हवा. 'घराला मुकलेल्या स्त्रिया', 'संकटमुक्त स्त्रियांचे पुनर्वसन' यामागे त्यांनी परिश्रमपूर्वक केलेला अभ्यास एकूण सोळा संस्थांची पहाणी करून काढलेले निष्कर्ष आणि बहुमोल सूचना समाजशास्त्राच्या अभ्यासकांसाठी महत्त्वाच्या ठरतील. 'मनःस्थितीचे चिंतन' मध्ये तर अक्षरशः हजारो विचार स्पष्ट करून सांगितले आहेत.

मराठी साहित्यात वैचारिक, संशोधनपर आणि अनेकविध प्रकारचे ललितलेखन करून आपले फार मोठे योगदान मालतीबाई बेडेकरांनी दिले आहे. विभावरी शिरूरकर नावाने केलेल्या लेखनात माणुसकीचा गहिवर आहे म्हणूनच त्यांचे साहित्य उदात्ततेला स्पर्श करणारे झाले.

'कळ्यांचे निःश्वास', 'हिंदोळ्यावर', 'बळी' आणि 'खरे मास्तर' या त्यांच्या कलाकृतींतून त्यांनी उच्चप्रतीची कला ही रंजनवादातून निर्माण होत नसून मानवी जीवनासंबंधीच्या विशाल चिंतनातून निर्माण होते हे दाखवून दिले. मराठी माणूस त्यांच्याप्रती सदैव कृतज्ञ राहील.

- डॉ. सौ. मालती निमदेव

■■■

। क । वि । ता । ● डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

उरलेले सारे जळून खाक

ज्या फुलांची वाट बघितली
त्या कळ्याच आल्या नाहीत
फुलली, ती फुले
आला तो गंध
झाले ते धुंद
वाहिले ते वारे
लुकलुकले ते तारे
पोकळ ते आभाळ
पेटला तो जाळ
विझली ती राख
उरलेले ते सारे
जळून खाक.

आभार, स्वकीयांचे

दु:ख आहे
याचा आनंदही आहे
अन्यथा ते मिळवायला
कुठे गेले असतो?
आभार स्वकीयांचे
ज्यांना ते आयतेच दिले
त्यासाठी त्यांना पडलेल्या कष्टांचेच
तेवढे वाईट वाटते...

कथानक

परस्परांना कंटाळवाणे वाटू लागले
म्हणजे पडदा टाकूनच द्यावा
अन्यथा
पुढचे नाटक म्हणजे व्यभिचारच
एकमेकांना खेचत नेणारा
दूर सारून सारून
काय सारणार त्यातले आपण ?
मूळ कथानक तर शेवटी
तेच आहे.

कविता ● उल्हास मनोहर

आशय

फुटून गेलेल्या प्रत्येक क्षितीजाला
आशयाची किरणे फुटतील असे नाहीच.
कुणी याव इथ? आणि जोपासावी
कुणीही पोरे अनाथसारखी
असच असत आयुष्य
कुणीही पेटवाव रान आणि जाळत रहाव लाकडांनी
आशय निघायचाच नाही.

● प्रफुल्ल शिलेदार कविता

मातीचे अभंग

१

शरीराच्या हाती अखेरीस माती।
पुन्हा उगवाया मूठभर।

केली झटपट मोठ्या असोशीने।
कोष कसोशीने सांभाळला।

चरित्राचा पट त्यात ताणेबाणे ।
तंतूमय जीणे कवितेत।

२

भाजताच माती वीट धरी अंग।
तुटे तिचा संग मृद्‌गंधाशी।

भाषेपलीकडे अर्थाअलीकडे।
मातीचे साकडे पडलेले।

कधी अधेमधे हाती गवसतो।
पुन्हा निसटतो ऋतुभार।

३

विटेवरी वीट उभारली भिंत ।
पैस तो जिवंत जगण्यास ।

तीवर लिहिले अभंग शतकोटी ।
पुन्हा कोरी पाटी उरतेच ।

वाहो भिंतीतून झुळझुळ प्रवाह ।
होवो शांत दाह चिरकाल ।

४

शुभ्र विटेवर काळी इमारत ।
आभाळाशी रत चैतन्याने

दु:खाची पोकळी इंद्रियां आकळी ।
तरीही पाकळी उमलेच ।

चंद्रभागेतून वाहे गलवला ।
विठ्ठल एकला काठावर ।

कविता ● कु.संजीवनी कावळे

कुणीतरी हवं

कुणीतरी हवं
आपलं म्हणून होणार
वादळ वाऱ्यातही
थोडं सामर्थ देणार...

कुणीतरी हवं
ह्यदयात राहणारं
आयुष्याच्या अंतापर्यंत
आपली वाट पाहणारं...

कुणीतरी हवं
सोबत चालणारं
शब्द संपुन गेल्यावर
काहीतरी बोलणारं...

कुणीतरी हवं
अश्रुंना झेलणारं
आकाशा एवढं दु:ख
मुठीत पेलणारं...

अनुक्रमणिका

शासनाचे मराठी विषयक धोरण आणि विदर्भसाहित्य संघाचे काही कार्य

■ गोंदियाला झालेल्या विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. वि.भि.कोलते होते. त्यावेळी शासकीय महाविद्यालयात मराठीचे ते प्राध्यापक होते. शासकीय सेवेत असूनही त्यांनी मध्यप्रदेशाच्या अर्थमंत्र्याच्या उपस्थितीत राज्यात होणाऱ्या मराठीच्या गळचेपीची तक्रार निर्भयपणे व ठणठणीतपणे मांडली होती.

■ नागपूर आकाशवाणी केंद्राच्या मराठी विरोधी धोरणाचा निषेध म्हणून विदर्भ साहित्य संघाच्या पुढाकाराने नागपूरस्थ साहित्यिकांच्या व नागरिकांच्या पुढाकाराने डॉ. वि.भि. कोलते यांच्या नेतृत्वाखाली लाक्षणिक उपोषण केले गेले होते. एवढेच नव्हे तर विदर्भ साहित्य संघाने डॉ. कोलते व विदर्भ साहित्य संघाचे तत्कालीन अध्यक्ष प्रा. राम शेवाळकर यांच्यासह मराठी भाषाभिमानी नागरिकांचा एक मोर्चा विधानसभेवर नेऊन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांना निवेदन दिले होते. परिणामी आकाशवाणी नागपूर केंद्रावरून क्रिकेटच्या खेळाचे केवळ हिंदी व इंग्रजीतच तोवर चालणारे समालोचन मराठी भाषेतून प्रक्षेपित करायला सुरूवात झालेली होती. या मराठी भाषाभिमानींच्या मोर्चात नागपुरातील हिंदी भाषिक सामाजिक नेतृत्वाने देखील हिरीरीने पुढाकार घेतलेला होता.

■ मराठी भाषेसंबंधाने मौलिक कार्य करणाऱ्या अमराठी साहित्यिकांचाही विदर्भ साहित्य संघाने वेळोवेळी दखल घेतली आहे.

■ विभागीय मराठी साहित्य संस्थाचा एक प्रतिनिधी त्या विभागातील विद्यापीठांच्या सिनेटवर नेमण्यात येण्याची तरतूद विद्यापीठ कायद्यात करावी, असा प्रयत्न डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी विदर्भ साहित्य संघाने केलेल्या तशा अर्थाच्या ठरावाप्रमाणे चालविला आहे.

■ शासनाचे राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचारी यांना मराठी भाषा अवगत असणे आवश्यक केल्यानंतर ९ वी व १० वी परीक्षांना समकक्ष असलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षांना (मराठी प्रवीण व मराठी प्राज्ञ शासनाने त्यांच्या अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी) मान्यता प्रदान केलेली होती. त्याला उत्तम प्रतिसादही होता. त्यासाठी नियमित वर्गही घेतले जात असत. शासनाने मान्यता काढून घेतली असली तरी अमराठी भाषकांसाठी मार्गदर्शन आजही सुरू आहे.

अनुक्रमणिका

■ विदर्भ साहित्य संघाच्या मराठी प्रचार-प्रसाराच्या हेतूच्या अनुषंगाने १९५१ पासून मराठीच्या परीक्षा घेण्यात येतात. याची संपूर्ण विदर्भात एकूण १५० केंद्रे आहेत. इयत्ता ५ वी ते साहित्यवाचस्पती (डि.लिट्. समकक्ष) पर्यंतच्या परीक्षा घेण्यात येतात. त्यात मराठी भाषकांच्या सह अन्य भाषकांसाठीही परीक्षा घेण्यात येतात. प्रतिसादाचा आलेख हा प्रतिवर्षी उंचावत गेलेला आहे. आज या सर्व परीक्षांना २५,००० च्या जवळपास विद्यार्थी बसतात. मराठी विषयाची गुणवत्ता वाढविण्यासाठी 'भाषा शिबीरा'सारखे अनेक उपक्रम विदर्भ साहित्य संघातर्फे राबविण्यात येतात.

■ महाराष्ट्र राज्य मराठी विकास संस्था स्थापण्याच्या शासनाच्या निर्णयाचे स्वागत करून या संस्थेचे मुख्यालय नागपूरला असावे अशी मागणी विदर्भ साहित्य संघाने एका ठरावान्वये केलेली होती. तसेच महाराष्ट्रात अन्यत्र या संस्थेची प्रादेशिक मुख्यालये स्थापण्याची देखील मागणी करण्यात आलेली होती.

■ १ मे हा दिवस महाराष्ट्र शासनाने राजभाषा दिन म्हणून घोषित केल्या प्रीत्यर्थ शासनाचे विदर्भ साहित्य संघाने अभिनंदनही केले.

■ मराठी भाषेतून निकालपत्र दिल्या बद्दल संबंधित न्यायाधीशांचे विदर्भ साहित्य संघाने अभिनंदन केले होते.

■ महाराष्ट्र शासनाच्या मराठीची गळचेपी करणाऱ्या व मराठी ऐवजी प्राथमिक स्तरावरील शिक्षणापासून इंग्रजीची सक्ती करणाऱ्या निर्णयाचा महाराष्ट्र शासनाने फेरविचार करावा या मागणीचा पाठपुरावा विदर्भ साहित्य संघाने केला.

■ नुकताच महाराष्ट्र शासनाने जो मराठी भाषेला विकल्प म्हणून माहिती तंत्रज्ञान हा विषय घेण्याची मुभा देऊन मराठी सक्तीची करण्याऐवजी उलट ती वैकल्पिक करून अशास्त्रीय असा निर्णय घेतला त्या निर्णयाचा विदर्भ साहित्य संघाने एक परिचर्चा आयोजित करून व ठराव करून निषेध केला.

■ या साऱ्या प्रयत्नांच्या परिणामी महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत या विषयावर अडीच तासांची चर्चा घडवून आणली गेली.(डिसेंबर २००१)

■ या चर्चेला उत्तर देतांना शासनाने निर्णय फिरवला नसला तरी मराठी विषय घेऊन ११ वी, १२वी, उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना ५ टक्के जादा गुण देण्याचा मराठीच्या संवर्धनाचा निर्णय जाहीर केला.

मनोहर म्हैसाळकर
कार्याध्यक्ष,
विदर्भ साहित्य संघ,नागपूर

■■■

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त

ऑक्टोबर / नोव्हेंबर / डिसेंबर २००१

सांस्कृतिक समिती

■ **दि. ३० ऑक्टोबर २००१**

विदर्भ साहित्य संघ आणि लक्ष्मी प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुनंदा पाटील वैद्य यांच्या 'तू आणि मी' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन समारंभ सांस्कृतिक संकुलात आयोजित करण्यात आला होता. 'दै. तरुण-भारत' चे संपादक सुधीर पाठक हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. ज्ञानेश वाकुडकर यांनी काव्यसंग्रहाचे प्रकाशन केले. याप्रसंगी माधुरी अशिरगडे यांचे प्रमुख भाषण झाले.

■ **दि. ५ नोव्हेंबर २००१**

विदर्भ साहित्य संघातर्फे सांस्कृतिक संकुलात मराठी रंगभूमी दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी नटराज पूजनना नंतर वामनराव तेलंग यांच्या अध्यक्षतेखाली नागपूरचे प्रसिध्द नाटककार यांचे 'एकांकिका - एक स्वयंभू नाट्यप्रकार' या विषयावर उत्कृष्ट भाषण झाले.

■ **दि. ११ व १२ डिसेंबर २००१**

विदर्भ साहित्य संघातर्फे प्रतिवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या कै. एस. एम. जोशी व्याख्यानमालेचे आयोजन सर्वोदय आश्रम सभागृहात झाले. प्रसिद्ध विचारवंत व अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष डॉ. य. दि. फडके हे यंदाचे प्रमुख व्याख्याते होते. दि. १० रोजी 'भारतीय घटना आणि महिलांचा सहभाग' व दि. ११ रोजी 'महिलांसाठी आरक्षण' या विषयावर डॉ. फडके यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भा. ल. भोळे होते. व्याख्यानमालेचे संचालन मेघना वाहोकार यांनी केले. महिला सबलीकरण वर्षाच्या प्रीत्यर्थ या विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन झाले.

अनुक्रमणिका

■ **दि. ११ डिसेंबर २००१**

महाराष्ट्र शासनाने यंदाच्या शैक्षणिक सत्रापासून कनिष्ठ महाविद्यालयात माहिती व तंत्रज्ञान यांना मराठीचा पर्याय म्हणून मान्यता दिली व तसेच प्राथमिक शाळेपासून इंग्रजीची सक्ती केली आहे. शासनाच्या या धोरणाचा निषेध करण्यासाठी विदर्भ साहित्य संघाने 'शासनाकडून होणारी मराठीची गळचेपी' परिचर्चा आयोजित केली. परिचर्चेच्या अध्यक्षस्थानी डॉ. य. दि. फडके होते. या परिचर्चेत प्राचार्य राम शेवाळकर, डॉ. भा. ल. भोळे, डॉ. दमयंती पांढरीपांडे, दीपक गोखले, व डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी आपले विचार व्यक्त केले. या परिचर्चेत शासनाच्या मराठी विरोधी धोरणाचा एकमुखी निषेध करण्यात आला. सभेच्या शेवटी निषेधाचा ठराव एकमुखाने पारित करण्यात आला.

■■■

शाखावृत्त

उमरेड शाखा

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृति दिनानिमित्त ६ डिसेंबर ते ८ डिसेंबर या काळात तीन दिवसीय व्याख्यानमाला आयोजित केले. दि. ६ डिसेंबरला कु. किरण भिवगडे यांच्या अध्यक्षतेखाली 'स्त्री-पुरुष समानता' या विषयावर श्रीमती यामिनी चौधरी यांचे व्याख्यान झाले. दि. ७ डिसें रोजी प्रा. अशोक थोरात यांच्या अध्यक्षतेखाली मराठी साहित्यातील विनोद या विषयावर प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांचे आणि ८ डिसेंबर रोजी श्री. ना.वा.सपाटे यांचे अध्यक्षतेखाली 'संत तुकाराम - व्यक्तित्व व कवित्व' या विषयावर प्रा. डॉ. किशोर सानप यांचे व्याख्यान झाले. सर्व कार्यक्रमांना रसिकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

दि. १४ आक्टोबर रोजी श्री जालंदर सोनुने यांनी 'याद करो कुर्वानी' हा व्याख्यान आणि स्लाईड शो चा देशभक्तीपर कार्यक्रम सादर केला.

दि. १४ आक्टोबर रोजी शाखेची आमसभा श्री अरुण रंधे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. पुढील कार्यक्रमासाठी नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

पुसद शाखा

दि. २८ व २९ नोव्हेंबर रोजी कै. देवराव पाटील चोंढीकर स्मृती व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. दि. २८ नोव्हेंबर रोजी 'नवे शैक्षणिक धोरण' या विषयावर प्रा. अरविंद खांडेकर यांचे आणि दि. २९ नोव्हेंबर रोजी 'ज्ञानोबा व विनोबा' या विषयावर

अनुक्रमणिका

प्रा. डॉ गोविंद देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. अनंत अडावतकर यांचे व्याख्यान झाले. रसिकांच्या सहभागाने कार्यक्रम यशस्वी झाला.

लाखनी शाखा

दि. ६ ऑक्टोबर रोजी संस्थेचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने मराठी वाङ्मय, चित्रकला, यात प्राविण्य प्राप्त व्यक्ती तसेच माध्यमिक शाळेच्या गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात आले.

वर्धा शाखा

दि. १३,१४,१५ डिसेंबर

डॉ. वि.गं. कावळे स्मृतिव्याख्यानमाला

गत सात वर्षापासून सातत्याने विदर्भ साहित्य संघ वर्धा शाखा आणि कावळे परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने उपरोक्त व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. यावर्षीही वेदविद् डॉ. विजय माधव पागे यांनी ही त्रिदिवसीय व्याख्यानमाला गुंफली. विषय होता 'नारदभक्ति सूत्र' या प्रसंगी प्रा. राम शेवाळकर यांनी अध्यक्षस्थान भूषविले. अष्टभुजा मंदिराच्या सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमास रसिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

■■■

'युगवाणी' च्या वर्गणीचे दर

वर्गणीचे दर खालीलप्रमाणे राहतील.

वार्षिक वर्गणी : रु. १००/- (सर्वांसाठी)

साहित्य संघाच्या सभासदांसाठी सवलत वर्गणी : रु ६०/-

एका अंकाची किंमत रु.२५/-

सौ. शोभा उबगडे,

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

पत्ता : संपादक, 'युगवाणी', द्वारा विदर्भ साहित्य संघ,
झाशी राणी चौक , वर्धा मार्ग, नागपूर : ४४००१२

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र ' युगवाणी' स्पार्क असोसिएटस्, नागपूर येथे मुद्रीत करुन शोभा उबगडे, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांनी प्रकाशित केले.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ
विक्रीस तयार असलेली प्रकाशने

१) तीन भाषणे गणेश व्याख्यानमाला १९७७ : डॉ. र. श. केळकर..........................रु. ४/-
२) "प्रातिभ" लघुकथा संग्रह (१९८०)..रु. २०/-
३) समग्र वजावा...रु. २०/-
४) हिंदी मराठी भाषा प्रवेशिका श्रीमती मालतीबाई श्रीखंडे..................................रु. ४/-
५) ज. के. उपाध्ये यांची १८८३-१९१३ कविता : संपादन आशा सावदेकर......................रु. ३०/-
६) दक्षिणेतील दोन आचार्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.....................................रु. ५/-
७) मराठी गद्य प्रा. श्री. गो. काशीकर..रु. ३/-
८) संपूर्ण गडकरी भाग - १ व २ (म. रा. सं. मं.)..रु. ७५/-
९) युगवाणी साहित्य सूची (संपादन केशव जोशी)..रु. ७०/-
१०) कविता विदर्भाची डॉ. सौ. आशा सावदेकर..रु. ५०/-
११) छंदशास्त्र : एक अध्ययन कुंदन दिवाण...रु. १०/-
१२) वसंत वैभव डॉ. सौ. कुंदा केळापुरे/डॉ. मदन कुळकर्णी..................................रु. ८०/-
१३) धन्यतेची थाप डॉ. वि.भि.कोलते..रु. १००/-
१४) वक्ता दशसहस्रेषु (प्रा. राम शेवाळकर)संपादक : डॉ. वि. स. जोग......................रु. १२५/-
१५) अध्यक्षीय भाषणे, खंड २ : संपादक : डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी..........................रु. २५०/-
(विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनाध्यक्षांच्या भाषणांचे संकलन)
१६) अध्यक्षीय भाषणे, संपादक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी...................................रु. २००/-
(विदर्भ साहित्य संघाच्या विविध प्रवाही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांचे संकलन)
१७) युगवाणी साहित्य सूची, खंड २ (संपादन केशव जोशी)...................................रु. ५०/-
१८) वैदर्भीय मराठी प्रबंध सूची (१९३९-९८) संपादक : डॉ. व. वि. कुलकर्णी..................रु. १००/-
१९) विदर्भ साहित्य संघ -अमृत महोत्सवी स्मरणिका- १९९९.................................रु.२००/-
२०) सांजदिव्याचे हंवर -शिवा राऊत (निवडक कविता)..रु. ६०/-
संकलन /संपादन डॉ. आशा सावदेकर, वामन तेलंग


। संमेलन स्थळी ।
एकूण १००/– रु किंमतीच्या पुस्तकावर १० % सूट.

शाळा / महाविद्यालय / ग्रंथालये / विक्रेत्यांकरिता
२०% सूट.

पत्रव्यवहाराचा पत्ता :

विदर्भसाहित्यसंघ,

सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सिताबर्डी, नागपूर : ४४००१२, दूरभाष : ५२३९२९



दीपावली विशेषांक

(छापील मजकुर)

पुस्त-प्रेष

प्रति,

प्रेषक -

संपादक,

'युगवाणी' विदर्भ साहित्य संघ,

सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक ,

सीताबर्डी, नागपूर - १२

दूरध्वनी : (०७१२) ५२३९२९